श्री स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय

देवगड

# रत्नराज

१९८७–८८

" रसराज " ला हार्दिक शुभेच्छा !

# दिर्बा इंजिनिअरिंग वर्क्स

दत्तात्रय वाडी, तारामुंबरी, देवगड. फो. नं. ४१

दिर्बा उद्योग, इब्राहिम युसुफ चाळ, खो. नं. ८, मरोळ मरोशी रोड,
मरोळ–मुंबई - ४०० ०५९.

प्रो. जितेंद्र काशीनाथ उपरकर

**पिक फॅब्रीकेटर्स अँड इरेक्टर्स**

नॉव्हेल्टी सिल्क मिल कंपाऊड
स्वामी विवेकानंद रोड,
**दहिसर (पूर्व) मुंबई–६८**
फोन : ६५२९७४, ६५२६२९

**दिर्बा मेकॅनिकल अँड स्ट्रक्चरल वर्क्स**

७ गणेश इंडस्ट्रियल इस्टेट,
प्लॉट नं. ४
**गोरेगांव (पूर्व) मुंबई ६३**
फोन : ६९०७०२, ६८६९९२

सर्व प्रकारची फॅब्रीकेशन, इरेक्शन अँड मशीन बिल्डिंग केमिकल प्लँट, हेवी लाईट स्ट्रक्चर्स, मशिनींग, प्रेशर व्हेसल्स, पाईपींग क्वाईल शिटमेटल, प्रोफाईल कटींगची कामे केली जातील.

**एन्. के. उपरकर**
कन्सलटन्स, कॉन्ट्रॅक्टर्स अँड इंजिनिअर्स

शिक्षण विकास मंडळाचे

श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

# रसराज वार्षिक

**१९८७-८८**

**अंक ८ वा**

संपादक मंडळ

**प्राचार्य आर. ए. कुलकर्णी** – अध्यक्ष

**प्रा. विनायक पाटील** – कार्यकारी संपादक

सहाय्यक संपादक

**प्रा. आनंद जरग**
**प्रा. लता वळसंगकर**

–० संपादन सहाय्य ०–

| वरिष्ठ विभाग | | कनिष्ठ विभाग |
|---|---|---|
| मिलिंद देशपांडे | शैलेश सावंत | विद्या नलावडे |
| रविकांत झरकर | कामिनी जोशी | वर्षा जोशी |
| मनिषा नलावडे | | अपर्णा कुलकर्णी |
| माधुरी जोशी | | संजय पांचाळ |

श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

## स्थानिक नियामक समिती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. वसंतराव साटम | अध्यक्ष |
| २) | " अमृतराव राणे | सदस्य |
| ३) | " भा. गो. पाटणकर | " |
| ४) | " गु. शां. शिरसाट | " |
| ५) | " द. बा. भिडे | " |
| ६) | " स. ज. पारकर | " |
| ७) | " डॉ. अरुण खाडिलकर | " |
| ८) | " प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | कार्यवाह |
| ९) | " प्रा. सुरेश सोनटक्के | प्राध्यापक प्रतिनिधी |
| १०) | " प्रा. भारत भोसले | " |
| ११) | " एम्. व्ही. लेले | कर्मचारी प्रतिनिधी |


'रसराज' वार्षिकांकाच्या स्वामित्वाबद्दल व तपशीलाबद्दल निवेदन व नमुना - ४ (नियम ८)

| | |
|---|---|
| १) प्रकाशन स्थळ | श्री स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड |
| २) प्रकाशन कालावधी | वार्षिक |
| ३) मुद्रकाचे नाव | श्री. गोविंदराव महादेव चौगले |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | आनंद प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर |
| ४) प्रकाशकाचे नाव | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | श्री स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड |
| ५) संपादकाचे नाव | प्रा. विनायक पाटील |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | श्री स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड |
| ६) नियतकालिकाची मालकी | श्री स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड |

☆ वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

☆ या अंकातील लेखकांच्या मतांशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच, असे नाही.

☆ केवळ खाजगी वितरणासाठी.

आर. ए. कुलकर्णी

प्रकाशकाची सही

# - अंतरंग -

चित्रमुद्रा–मास ॲडव्हरटायझींग, कोल्हापूर छाया–रामदास छाया कलागृह, देवगड

## वरिष्ठ विभाग


| | | |
|---|---|---|
| शून्याधारित अर्थसंकल्प | रघुनाथ चव्हाण | १ |
| देशाची विचारशक्तीच सती गेली ! | माधुरी जोशी | ३ |
| बालगंधर्व : रंगभूमीचे देणे | विनायक ठाकूर | ६ |
| विजय मर्चंट गेले ! | प्रकाश पाटणकर | ९ |
| अद्वितीय पार्श्वगायक – किशोरकुमार | मनोजकुमार खाडये | ११ |
| जी. ए. : एक शोध | अनघा कुलकर्णी | १३ |
| मराठ्यांची आरमारी राजधानी : विजयदुर्ग | रवींद्र करंदीकर | १५ |
| कोकणातील दशावतार | द्वारकानाथ वाडकर | १७ |
| पोटगी | मीना चव्हाण | १९ |


## कविता


| | | |
|---|---|---|
| चक्रव्यूह / चाफेकळी | संजय धुरी | २१ |
| असो ह्यो चाकरमानी / कालचक्र | दत्तात्रय प्रभू | २२ |
| जखम | विनायक ठाकूर | २३ |
| भावना | प्रकाश पाटणकर | २३ |
| लाट | संजय घाडी | २४ |
| विकास करुन घेऊया | श्रीकांत गावकर | २४ |
| ग्रहण | संजय घाडी | २५ |
| प्रवासी / अमृताचा स्वाद | पंढरीनाथ शिरवडकर | २५ / २६ |
| सत्याच्या शोधात | श्रीकांत गावकर | २६ |


## कनिष्ठ विभाग


| | | |
|---|---|---|
| हवेचे प्रदूषण | वर्षा जोशी | २७ |
| पाण्याचे प्रदूषण | गीता मेस्त्री | ३० |
| जमिनीची धूप | विद्या नलावडे | ३२ |
| केल्याने होत आहे रे | दया खाडिलकर | ३३ |
| एडस् : एक महाभयंकर रोग | मधुबाला मुणगेकर | ३४ |
| अंधश्रध्दा : एक यक्षप्रश्न | निमा काळे | ३८ |
| काळा पैसा अर्थव्यवस्थेचा कर्करोग | सुचेता परब | ४१ |
| 'लोपला पक्षितज्ज्ञ' डॉ. सलीम अली | वर्षा बिडये | ४३ |
| हास्याचे उपचारातील स्थान | मनिषा वेलणकर | ४५ |


## कविता


| | | |
|---|---|---|
| माझी मशाल पेटती ठेवणार का ? | वहिदा खान | ४८ |
| जगजीवन | दयाळ पुरळकर | ४८ |
| ये मेघराजा ये ! / कुहू कुहू | भगतसिंग माने | ४९ |
| श्रावणमास | विमल बापट | ४९ |
| फूल / धुंद | चेतना साटम | ५० |
| गुन्हा ? | राजाराम आडकर | ५१ |
| शोधण्यासाठी | व्ही. एम. दुधवडकर | ५१ |

श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

## विद्यार्थी महामंडळ १९८७–८८

वरिष्ठ विभाग

| | |
|---|---|
| १) जनरल सेक्रेटरी | दत्तात्रय प्रभू |
| २) विद्यार्थिनी प्रतिनिधी | पिरोज जाचक |
| ३) क्रीडा विभाग | जितेंद्र उपरकर |
| ४) 'रसराज' भित्तीपत्रक | मिलिंद देशपांडे |
| ५) सांस्कृतिक मंडळ | वैभव विडये |
| ६) आस्वाद, विविधा, | पिरोज जाचक<br>दत्तात्रय प्रभू |
| ७) सहल, प्लॅनिंग फोरम | खेमराज परब |
| ८) इतिहास मंडळ, वाङमय मंडळ | संतोष कुलकर्णी |

कनिष्ठ विभाग

| | |
|---|---|
| १) जनरल सेक्रेटरी | उमेश वाडेकर |
| २) विद्यार्थिनी प्रतिनिधी | विद्या नलावडे |
| ३) सांस्कृतिक मंडळ | राजेश पोकळे |
| ४) वाङमय, आस्वाद, विविधा | उमेश वाडेकर<br>विद्या नलावडे |
| ५) क्रीडा | सुरेंद्र मणचेकर |
| ६) 'रसराज' भित्तीपत्रक | विद्या नलावडे |

# संपादकीय

'रसराज' चा हा आठवा अंक आपणास सुपुर्द करताना मन आनंदाच्या अमृतात न्हाऊन शुचिर्भूत होत आहे. महाविद्यालयाने ह्यावर्षी यशाची कीर्तीपताका अत्युच्च शिखरावर विराजमान केली. ही यशोगाथा चाळताना काही अधोरेखिते म्हणूनच लक्ष वेधून घेतात. महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन ' प्रियदर्शनी वार्षिकांक ' स्पर्धा गेल्या वर्षी नागपूर येथे आयोजिली होती. या स्पर्धेत आमच्या 'रसराज'ने विशेष बहुमानाचा पुरस्कार मिळवून राज्यमान्यता मिळविली. शैक्षणिकदृष्ट्या तर हे वर्ष महाविद्यालयास दृष्ट लागण्याइतके धवल यशदायी गेले. बारावी कला व वाणिज्य शाखेत १३ विद्यार्थी तर पदवी कला व वाणिज्य शाखेत ६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. एवढेच नव्हेतर या वर्षीही बी. ए. पदवी परीक्षेत इतिहास विभागात कु.कमल बनकर ही मुंबई विद्यापीठात सर्वप्रथम आली तर कु. माधुरी साटम ही सदर विभागातच दुसरी आली. मुंबई विद्यापीठात सलग दोनही वर्षे प्रथम येण्याचा बहुमान मिळविणारे केळकर कॉलेज हे एकमेव असावे. अलका मालशे हिने बारावी परीक्षेत मुंबई विभागात वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनींत प्रथम येऊन महाविद्यालयाच्या गौरवशाली परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला. अशी ही यशोमालिका लिहावी तेवढी थोडीच. 'रसराज' चे पान नि पान या यशोगंधाने धुंदावलेले दिसेल. क्रीडाक्षेत्रात सलग दुसऱ्यांदा मनोहर जोईल हा उंच उडीत विद्यापीठात तृतीय येऊन त्याने ब्राँझ पदक मिळविले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी गीता मेस्त्री, विनिता खाडिलकर व वंदना बिडये या तिघींची राज्यपातळीवर बीड येथील स्पर्धेसाठी निवड झाली. गुणी विद्यार्थी निर्माण करण्यासाठी गुणी शिक्षकही असावे लागतात. प्रा. सुरेश सोनटक्के, प्रा. शिवाजी पाटील व प्रा. लता वळसंगकर हे अनुक्रमे एम. फील व पी. एच. डी. साठी संशोधन करीत आहेत. हा यशोरथ सतत दौडत रहावा म्हणून की काय कुणास ठाऊक, मुंबई विद्यापीठाची कायमची संलग्नता आमच्या महाविद्यालयास मिळाल्याने आता यापुढे विद्यापीठ अनुदान मंडळाचे आर्थिक पाठबळ महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासास प्रेरक ठरणार असून महाविद्यालयाच्या ह्या इवल्याशा रोपट्याला विज्ञान शाखेची फांदी लवकरच फुटेल – असे कितीतरी अमृतकण इथे विखुरलेले आहेत. चकोरीच्या पिलाच्या हळुवारतेने त्यांचा आस्वाद घ्या. जीवनाचा आस्वाद घेत असतानाच आमचे विद्यार्थी वस्तुस्थितीकडे डोळेझाक करीत नाहीत. हे या अंकातील वैचारिक लेख पटवून देतील. 'जुने जाऊद्या मरणालागूनि' म्हणत असताना त्या जुन्याचेच किळसवाणे दर्शन कोठे घडत असेल तर त्याला त्याने प्रखर विरोध दर्शवून आपली युवकाची भूमिका पार पाडली आहे. शोधक व संवेदनाक्षम दृष्टीने देशाच्या अर्थकारणात झालेल्या परिवर्तनावर लिहिलेले विश्लेषणात्मक लेख, बिघडत चाललेल्या पर्यावरणामुळे निसर्गाचा समतोल ढळत आहे याचीही दखल घेतलेला लेख आहे. 'एडस्' सारख्या महाभयंकर रोगाचा प्रादुर्भाव कसा होत आहे हे सांगणारे लेख प्रभावी झाले आहेत. आपल्या अलौकिक वैशिष्ट्याने जनमानसात स्थान मिळवून काळाच्या पडद्याआड गेलेल्या व्यक्तींबद्दल त्याला आदर आहे. म्हणूनच तो लेखांद्वारे आपल्या सद्भावनाही प्रकट करतो. अशा अनेकविध विषयांत त्याने दाखविलेली अभिरुची व प्रगल्भता निश्चितच प्रशंसनीय आहे, याचा आम्हांस सार्थ अभिमान वाटतो. अंकातील कवितांनीही आपले असेच वेगळेपण राखले आहे. सामाजिक जाणिवेतून झालेल्या या कवितांचे लेखन सदोष असेल, नेमके विचार व्यक्त करताना अचूक शब्दांची योजना करता आली नसेल, तरी त्या मागील त्यांची भावना प्रामाणिक आहे. शब्दांचा काथ्याकूट करत बसण्यापेक्षा शब्दांमागील या भावना समजून घेतल्यास हा डोळस विद्यार्थी आपल्या दृष्टीस गवसेल. हा अंक अधिक दर्जेदार व्हावा यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असलो तरी, त्याची अपेक्षित परिपूर्ती झाली आहे असे वाटत नाही. अशावेळी कुसुमाग्रजांच्या त्या ओळी डोळया समोर येतात ' ध्येय, प्रेम, आशा यांची होतसे का कधी पूर्ती ! वेड्यापरी पूजतो या आम्ही भंगणाऱ्या मूर्ती।।' 'रसराज' चे स्वरुप देखणे व दर्जेदार ठेवताना सर्वांचे सहकार्य लाभले. नेहमीच नाविन्याची कास धरणारे प्राचार्य आर. ए. कुलकर्णी यांचे डोळस मार्गदर्शन 'अंक' वेधक ठरण्यास सहाय्यभूत ठरले. त्याच प्रमाणे संपादक मंडळ व सहकारी प्राध्यापक यांचे सहकार्य व मार्गदर्शन अमूल्य आहे. कोल्हापूरचे आनंद प्रेसचे मालक व त्यांचे कामगार या सर्वांच्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ आभारी व ऋणी आहे.

**प्रा. विनायक पाटील**

शिक्षण विकास मंडळ, देवगड

# नियामक समिती

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. | शां. कृ. पंतवालावलकर | | अध्यक्ष |
| २ | ,, | कृ. ज. ठाकूर | | उपाध्यक्ष |
| ३ | ,, | अ. अ. नलावडे | | ,, |
| ४ | ,, | रा. गो. मिराशी | | ,, |
| ५ | ,, | व. स. साटम | | कार्यवाह |
| ६ | ,, | गु. शां. शिरसाट | | सहकार्यवाह |
| ७ | ,, | भा. गो. पाटणकर<br>( भाऊसाहेब केळकर यांचे प्रतिनिधी ) | | ,, |
| ८ | ,, | अ. गं. राणे | | सभापती, नियामक समिती |
| ९ | डॉ. | अ. रा. खाडिलकर | | कोषाध्यक्ष |
| १० | श्री. | स. ज. पारकर | | सदस्य |
| ११ | ,, | य. द. राणे | | ,, |
| १२ | ,, | ह. अ. नलावडे | | ,, |
| १३ | ,, | ल. य. कोयंडे | | ,, |
| १४ | ,, | डॉ. मा. रा. नेने | | ,, |
| १५ | ,, | य. ग. पोकळे | | ,, |
| १६ | ,, | स. भि. जामसंडेकर | | ,, |
| १७ | ,, | रा. धों. पारकर | | ,, |
| १८ | ,, | द. बा. भिडे | | ,, |
| १९ | ,, | के. एन्. बोरफळकर | | ,, |
| २० | ,, | आ. ल. गोरे | | ,, |
| २१ | ,, | रा. वि. कदम | | ,, |
| २२ | ,, | ना. बा. तेली | | ,, |
| २३ | ,, | प्र. वा. आपटे | | ,, |
| २४ | ,, | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | | निमंत्रित |
| २५ | ,, | आ. गो. बांबुळकर | | ,, |
| २६ | ,, | श. ज. कुलकर्णी | | ,, |
| २७ | प्र. | प्राचार्या सौ. प. रा. राजेशिर्के | | ,, |

# सहवेदना

प्रकाशाचे महादान काळोखाच्या रात्री
मरणा मरण आणी अमृताचा यात्री !

थोर राष्ट्रवादी व महात्मा गांधींच्या अहिंसा मार्गाचे पाईक, भारतरत्न खान अब्दुल गफारखान, पक्षितज्ज्ञ डॉ. सलीम अली, तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री श्री. एम्. जी. रामचंद्रन, थोर मराठी लेखक श्री. जी. ए. कुलकर्णी, माजी पंतप्रधान श्री. चौधरी चरणसिंग, मराठीतील समीक्षक डॉ. भीमराव कुलकर्णी, गीतकार राजेंद्र कृष्ण, क्रिकेटपटू श्री. विजय मर्चंट, पार्श्वगायक श्री. किशोरकुमार, क्रीडासंघटक व अर्थमंत्री श्री. शेषराव वानखेडे, नामवंत अर्थतज्ज्ञ श्री. एल. के. झा, कॉ. वसंतराव तुळपुले, विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. बापूजी साळुंखे, सत्यवादीकार पद्मश्री श्री. बाळासाहेब पाटील, क्रीडामहर्षि श्री. नागेशकर, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री. पारिसाण्णा इंग्रोळे आणि शांतीसेनेतील धारातीर्थ पडलेले जवान यांना

**आमची भावपूर्ण श्रद्धांजली.**

श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड


## आमचा प्राध्यापक वर्ग १९८७-८८

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | वरिष्ठ | इंग्रजी, मराठी |
| २) | प्रा. पुरुषोत्तम शां. गोठोस्कर | | इंग्रजी |
| ३) | " ल. दा. गोलतकर | | इतिहास |
| ४) | " मधुकर म. गावडे | | भूगोल |
| ५) | " हेरंब ल. पटवर्धन | | अकौटन्सी |
| ६) | " सुरेश मु. सोनटक्के | | अर्थशास्त्र |
| ७) | " दत्तात्रय बा. बलवान | | कॉमर्स |
| ८) | " भारत ना. भोसले | | संख्याशास्त्र |
| ९) | " अरुण श्री. गोगटे | | कायदा |
| १०) | " श्रीकृष्ण शं. बोराटे | | भूगोल |
| ११) | " एम्. व्ही. पाटील | | कॉमर्स |
| १२) | " रवींद्र ज. बोरसे | | भूगोल |
| १३) | " विनायक अ. पाटील | | इतिहास |
| १४) | " शिवाजी शा. पाटील | | अर्थशास्त्र |
| १५) | " आनंद जरग | | इंग्रजी |
| १६) | " आर. जी. जाधव | | अर्थशास्त्र |
| १७) | " प्रा. कु. मंदा चौकेकर | | मराठी |
| १) | " प्रकाश म. उपाध्ये | कनिष्ठ विभाग | इंग्रजी |
| २) | " शाम सा. पाटील | | कॉमर्स |
| ३) | " बजरंग म. माळी | | इतिहास |
| ४) | " एम्. जी. शिर्के | | कॉमर्स |
| ५) | " प्रवीण बी. सकटे | | भूगोल |
| ६) | " लता वळसंगकर | | मराठी |
| ७) | " बी. एस्. पोवार | | भूगोल |
| ८) | " मोरेश्वर ना. जोशी | | कॉमर्स |
| ९) | " पी. बी. पाटील | | अर्थशास्त्र |
| १०) | " दीपक पाटील | | अर्थशास्त्र |
| १) | श्री. एस्. एस्. पाटील | ग्रंथालय | ग्रंथपाल |
| २) | " यशवंत तुकाराम देऊलकर | | ग्रंथालय – मुख्य शिपाई |

कार्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गणेश भालचंद्र गोडबोले | अधीक्षक |
| २) | " महेश्वर वा. लेले | मुख्य लिपिक |
| ३) | कु. मंदा चौकेकर | लिपिक |
| ४) | श्री. डी. जी. किरकिरे | लिपिक |
| ५) | " बा. वि. पेडणेकर | लिपिक |
| १) | श्री. चंद्रकांत यशवंत महाडीक | शिपाई |
| २) | " वसंत वासुदेव धोपटे | " |
| ३) | " नामदेव दामाजी केतकर | " |
| ४) | " चंद्रकांत सावाजी कदम | " |
| ५) | " अरुण कृष्णा बाणे | रखवालदार |


## आमचे स्फूर्तीस्थान




**माननीय श्री. शां. कृ. तथा**
**बापूसाहेब पंतवालावलकर**
अध्यक्ष
शिक्षण विकास मंडळ, देवगड.

# विद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धा - विभागीय


**मनोहर जोईल** | **प्रदीप खवळे** | **श्रीकांत बिडये**



ब्राँझपदक-उंच उडी
विद्यापीठ




प्रथक क्रमांक–भालाफेक
विद्यापीठ विभागीय




धावणे, रिले व लांबउडी
विद्यापीठ विभागीय

**राजेंद्र मुंबरकर** | **जितेंद्र उपरकर**



२० कि. मी. चालणे–द्वितीय
विद्यापीठ विभागीय





४×४०० मी. रिले–प्रथम
विद्यापीठ विभागीय

**सुजाता राणे** | **विनिता खाडिलकर** | **वर्षा बिडये**




उंच उडी–द्वितीय
विद्यापीठ विभागीय





महिला कब्बडी स्पर्धा राज्यपातळीवर निवड

# कीर्तीपताका



कमल बनकर　माधुरी सातम　सदानंद चव्हाण　राजन ढोके　लक्ष्मण पवार　माधुरी नेने

तृतीय वर्ष कला प्रथम श्रेणीत उत्तीर्ण　तृतीय वर्ष वाणिज्य प्रथम श्रेणी



हेमलता दामले　संगीता नेने　सचिन खवळे　अशोक साईम　उमेश राऊत　गणेश रानडे　लक्ष्मण वळंजू

बारावी कला प्रथम श्रेणीत उत्तीर्ण




श्रीकांत बर्वे　अरविंद गावकर　सीमा वझे　विजय राणे　प्रदीप कोयंडे　उज्वला भिडे

बारावी वाणिज्य प्रथम श्रेणीत उत्तीर्ण


# नेतृत्व . . .

**दत्तात्रय प्रभू**




जनरल सेक्रेटरी

**पिरोज जाचक**




विद्यार्थिनी प्रतिनिधी

**वैभव बिडये**




विद्यापीठ प्रतिनिधी

**उमेश वाडेकर**




जनरल सेक्रेटरी
(कनिष्ठ विभाग)

**विद्या नलावडे**




विद्यार्थिनी प्रतिनिधी
(कनिष्ठ विभाग)

**खेमराज परब**




सिनियर जनरल चँपियनशिप
१५०० मी धावणे-प्रथम

**ज्योती तानवडे**




सिनियर जनरल चँपियनशिप

**विठोबा गोलतकर**



ज्यूनियर जनरल चँपियनशिप


**गीता मेस्त्री**



ज्यूनियर जनरल चँपियनशिप
महिला स्पर्धेत राज्यपातळीवर निवड
(कब्बडी व खो-खोसाठी)


## वर्ग प्रतिनिधी विद्यार्थी महामंडळ

| मिलिंद देशपांडे | वैभव बिडये | पिरोज जाचक | दत्तात्रय प्रभू | खेमराज परब | संतोष कुलकर्णी | जितेंद्र उपरकर |
|---|---|---|---|---|---|---|



| तृतीय वर्ष कला | तृतीय वर्ष वाणिज्य | तृतीय वर्ष वाणिज्य | द्वितीय वर्ष कला | द्वितीय वर्ष वाणिज्य | प्रथम वर्ष कला | प्रथम वर्ष वाणिज्य |
|---|---|---|---|---|---|---|

| दामोदर जोशी | उमेश वाडेकर | सुरेंद्र मणचेकर | राजेश पोकळे | विद्या नलावडे |
|---|---|---|---|---|



| बारावी कला | बारावी वाणिज्य | अकरावी कला | अकरावी वाणिज्य | बारावी कला |
|---|---|---|---|---|


## राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी समिती



| पिरोज जाचक | सरिता नाईक साटम | चारुशीला रानडे | राजेश खानविलकर | सुरेंद्र लांबोरे | दत्तात्रय प्रभू |
|---|---|---|---|---|---|

## रसराज संपादक मंडळ

### वरिष्ठ विभाग – विद्यार्थी संपादक समिती




मिलिंद देशपांडे  रविकांत झरकर  शैलेश सावंत  मनिषा नलावडे  कामिनी जोशी  माधुरी जोशी

### कनिष्ठ विभाग




विद्या नलावडे  वर्षा जोशी  अपर्णा कुलकर्णी  संजय पांचाळ

### संपादक मंडळ



प्रा. विनायक पाटील  प्रा. आनंद जरग  प्राचार्य कुलकर्णी  प्रा. लता वळसंगकर

## यशोगाथा . . .




**कमल बनकर**
मुंबई विद्यापीठात बी. ए. परीक्षेत इतिहास विभागात सर्वप्रथम



**माधुरी साटम**
मुंबई विद्यापीठात बी. ए. परीक्षेत इतिहास विभागात द्वितीय




**अलका मालशे**
बारावी वाणिज्य शाखेत मुंबई विभागात विद्यार्थिनीत सर्वप्रथम




**रसराज**
नागपूर येथील महाविद्यालयीन 'प्रियदर्शनी वार्षिकांक' स्पर्धेत विशेष पुरस्कार

देवी ज्ञानेश्वरी करी जिथें भक्तीचा खेळ !
तिथेंच गीता रहस्य बसवी बध्दीचा मेळ ! !



महाविद्यालयाची आकर्षक वास्तू

शब्दांसाठी ज्यांनी कधी वेदना भोगल्याच नाहीत
त्यांच्या वांझ लालसेला कशा कळतील
माणसांच्या ओटीपोटातील कळा ?
रस्त्याने ठुमकताना ज्यांना घामही फुटत नाही
त्यांनी नयेच शिपू भावनांचा गर्द मळा,
त्यांनी आपल्याच नामघोषांत रमावे
त्यांना काय सांगावे, कसे सांगावे ?

–केशव मेश्राम

# वरिष्ठ विभाग

# शून्याधारित अर्थसंकल्प

**रघुनाथ चव्हाण**

द्वितीय वर्ष वाणिज्य

शून्याधारित अर्थसंकल्पाचा वापर करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे. विकास खर्च आणि राज्याला मिळणारे उत्पन्न यांची सांगड घालण्याकरिता महाराष्ट्र राज्याने टाकलेले हे उत्कृष्ट पाऊल आहे.

१९८७–८८ सालाचा शून्याधारित अर्थसंकल्प महाराष्ट्राचे वित्तमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी दिनांक २५ मार्च १९८७ रोजी विधानसभेत सादर केला. हा अर्थसंकल्प अर्थखात्याचे राज्यमंत्री डॉ. श्रीकांत जिचकार यांनी विधानपरिषदेत मांडला. १९८७–८८ सालाकरिता मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पात १५४ कोटी रु. ची तूट निघते. परंतु, ही तूट अर्थसंकल्पात सांगितलेल्या मार्गांनी कमी करणे शक्य आहे. अर्थसंकल्पामधील प्रस्तावित कर, उत्पादनाच्या विक्रीकरांच्या दरात कमीजास्त योग्य प्रमाणात फेरफार करून आणि शून्याधारित अर्थसंकल्पातून होणारी बचत याद्वारे ही १५४ कोटी रु. ची तूट कमी होऊन ती फक्त १८ कोटी रु. पर्यंत येईल असे शून्याधारित अर्थसंकल्पात सूचविण्यात आले आहे.

शून्याधारित अर्थसंकल्प याचा अर्थ राज्याला ज्या अनेक मार्गांनी एकूण उत्पन्न मिळणार आहे त्याच्यापेक्षा राज्यातील सार्वजनिक अगर इतर बाबींवर जास्त खर्च न करता उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ साधने होय. थोडक्यात, राज्याला मिळणाऱ्या एकूण उत्पन्ना एवढाच खर्च करणे हा शून्याधारित अर्थसंकल्प अंमलात आणण्याचा महत्त्वाचा उद्देश होय.

शून्याधारित अर्थसंकल्पामध्ये सुधारित लेखापद्धती अनुसरण्यात आली आहे. राज्याला निरनिराळ्या बाबींवर होणारा खर्च व त्यानंतर त्याचा परिणाम म्हणून घडून येणारा विकास, याची या अर्थसंकल्पात अत्यंत उत्कृष्टपणे सांगड घालण्यात आलेली आहे. यामुळे खर्चाची पद्धतशीर आखणी करणे तसेच उत्पन्न व खर्चावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

महाराष्ट्र शासनाचा शून्याधारित अर्थसंकल्पाचा अवलंब करण्याचा विचार एक वर्षापूर्वीपासूनच होता. या अर्थसंकल्पाची अंमलबजावणी करण्याची योजना ऑक्टोबर १९८६ पासूनच चालू होती. मात्र १९८७–८८ पासून ती कार्यान्वित झाली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर शून्याधारित अर्थसंकल्पाचा अवलंब करणारे देशातील महाराष्ट्र हे पहिलेच राज्य असून या योजनेच्या बाबतीत आघाडीवर राहील असे वाटते.

बऱ्याच कालावधीपासून आवश्यक असलेल्या प्रशासकीय सुधारणेच्या कार्यक्रमाची निश्चिती करणे तसेच, शासनाच्या विकास योजना, कार्यक्रमाचा क्रम–अग्रक्रम ठरविणे, तसेच पूर्वी ज्या योजना राबविण्यात आल्या आहेत, त्यापैकी कोणत्या योजना आता उपयोगात येत नाहीत, कोणत्या अकार्यक्षम झाल्या आहेत, यावरही लक्ष केंद्रित करणे हे या अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट आहे. विकासाकरिता कोणत्या योजना अत्यंत कार्यक्षम, परिणामकारक आहेत, त्यापैकी कोणत्या योजना राबवाव्यात, कोणत्या योजना पर्यायी म्हणजे कमीतकमी खर्चाच्या, जास्त उत्पन्नाच्या आहेत, याचा

विचार या अर्थसंकल्पात केला गेला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, ज्या योजना अनावश्यक आहेत, परिणामकारक नाहीत, त्यांचे इतर योजनांत विलिनीकरण करणे अथवा त्या योजना रद्द करणे, यासारखे पर्याय सुद्धा शोधून काढलेले आहेत. लोकांना कार्यक्षमपणे उत्कृष्ट आणि स्वस्त सेवा उपलब्ध करुन देणे हे या अर्थसंकल्पाचे आणखी महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

भारताचे पंतप्रधान राजीव गांधी हे आपल्या एका भाषणात म्हणतात– " आपला खर्च आपल्या आवाक्यात ठेवण्यासाठी काही कठीण निर्णय घेणे आवश्यक असते. आपल्या खर्चविषयक धोरणाचा आढावा घेण्याची वेळ आलेली आहे. केवळ वरवरचे व जुजबी स्वरुपाचे उपाय योजल्याने कायम स्वरूपाची फल निष्पत्ती होऊ शकत नाही. अपव्यय, दिखाऊपणा आणि अनुत्पादक खर्चाला येथे थारा नाही. आपल्याला आता आपण गुंतविलेल्या प्रत्येक रुपयातून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करायला हवेत. केवळ पैसा खर्च करण्यापेक्षा कार्यलक्ष्ये साधणे हे अधिक महत्त्वाचे आहे. खर्चाकडे त्याची परिणामकारकता किती आहे, या दृष्टिने पाहिले पाहिजे. निरनिराळ्या सेवा पुरविण्यांवर अवाजवी खर्च होता कामा नये." माननीय पंतप्रधानांनी सांगितलेले हे विचार शून्याधारित अर्थसंकल्पाचा सारांश आहे.

१९८७–८८ पासून शून्याधारित अर्थसंकल्पाचा अवलंब केल्याने खर्चात कपात करण्यासाठी अनावश्यक कर्मचारी वर्ग काढून टाकण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. मात्र, जे कर्मचारी कायम होण्यास पात्र आहेत त्यांना नोकरीतून काढून न टाकता, त्यांचा व इतर अर्थसाधनांचा वापर इतर ठिकाणी करून घेता यावा याकरिता महाराष्ट्र राज्यशासन प्रयत्नशील राहिल.

१९८७–८८ च्या शून्याधारित अर्थसंकल्पामुळे ५० कोटी रु. ची बचत होत आहे. १९८७–८८ च्या अंदाज पत्रकानुसार महाराष्ट्र शासनाच्या उत्पन्नामध्ये खर्चापेक्षा १५४.४६ कोटी रु. ची तूट पडते. ही तूट मोटार सायकली व तीन चाकी वाहनांवरील एकावेळी भरावयाचा कर (५९ कोटी रु.) विक्रीकर आणि व्यवसाय करात सवलती धरुन प्रस्तावित फेरफार (२७ कोटी रु.) व शून्याधारित अर्थसंकल्पामुळे झालेली बचत (५० कोटी रु.) यामुळे फक्त १८.४६ कोटी रु. इतकी शिल्लक रहाते. ही किरकोळ तूट भरून काढणे सहज शक्य आहे.

महाराष्ट्र सरकारला जंगलापासून मोठ्या प्रमाणावर कर व महसूल मिळत आहे. परंतु, सध्याच्या कायदयानुसार जो महसूल रुपाने कर महाराष्ट्र राज्याला मिळत आहे, त्यावर बारकाईने लक्ष ठेवल्यास आणि कर चुकविण्याच्या ज्या काही पळवाटा आहेत, त्या बंद केल्यास आणि तशा प्रकारच्या सुधारणा कायद्यामध्ये घडवून आणल्यास पुढील काही वर्षात महाराष्ट्र सरकारला हे एक अधिक उत्पन्न देणारे साधन होईल.

शून्याधारित अर्थसंकल्पामध्ये विविध प्रकारचे फरक सूचविण्यात आले आहेत. कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा घडवून आणण्याचा म्हणजेच राज्यशासनाने आपल्या कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाची वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच जो माल विक्रीकरिता पाठविला जातो त्यावरही केंद्रशासनाने कर बसविणारा कायदा (Consignment Tax Act) करावा असेही सूचविण्यात आले आहे. काही उत्पादक व विक्रेते त्यांचा माल एका शाखेतून दुसऱ्या शाखेत पाठवून कर चुकवित असतात. यापुढे अशा विक्रेते व उत्पादकांना ही कर चुकविण्याची पळवाट बंद होईल. तसेच महाराष्ट्रातील रोजगार हमीसाठी आवश्यक अर्थ पुरवठ्याकरिता व्यवसाय कर सुद्धा निश्चित करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पानुसार गुंतवणुकीच्या पद्धतीत बदल घडवून आणण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

शून्याधारित अर्थसंकल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता तसेच, उत्पन्न व खर्चाची सांगड घालण्याकरिता राज्यशासनाने जकात करात वाढ मोटार सायकली व तीचाकी वाहनांवर एक रकमी कर,

तयार कपड्यांवरील करात वाढ, विणकामाच्या वस्तूंवर कर तसेच काच सामान व मातीच्या वस्तू यावरील योग्य त्या ठराविक किंमतीच्या प्रमाणात कर यांचा वापर केला आहे. शिवाय साबण आणि डिटर्जन्टस् यावरील करात वाढ, दुग्धजन्य पदार्थांवरिल करात वाढ, पानमसाला कराच्या प्रमाणात वाढ, कृत्रिम व लांब धाग्याचे सूत या कच्च्यामालांवरिल करात वाढ करण्याचे अर्थसंकल्पात सुचविण्यात आले आहे. सध्या अस्तित्वात असलेला व्यवसाय कर नवीन कायद्यान्वये बदलून त्यात वाढ घडवून आणून राज्यशासनाला उत्पन्न मिळू शकेल, असे या अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आले आहे.

अर्थसंकल्पात काही करांच्या बाबतीत जशी वाढ घडवून आणण्याचे सूचविण्यात आले आहे, त्याचप्रमाणे काही नवीन सवलतीही जाहीर करण्यात आल्या आहेत. मानवी रक्त आणि यासारखे पदार्थ यांचा उपयोग जीवरक्षणासाठी होत असल्याने या वस्तूंवर असणारा विक्रीकर रद्द करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

शासन प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना म्हणून काही तरतुदी करत असते. पाटबंधारे, रस्ते, सार्व. आरोग्य, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व यांसारख्या इतर काही गोष्टी याकरिता तसेच प्राथमिक शिक्षण, भू-सर्वेक्षण आणि खेड्यांमध्ये विद्युतीकरणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी शासन अनेक तरतुदी करते. दारिद्र्य निर्मूलन, सामाजिक-आर्थिक विषमता दूर करणे, तसेच उत्पादनशीलतेत वाढ यासारख्या समाजहितासह विकास साधण्याच्या या महत्त्वाच्या राष्ट्रीय कार्यात महाराष्ट्र या अर्थसंकल्पाच्या अंमल बजावणीने सदैव आघाडीवर राहील, असे खात्रीने वाटते.

थोडक्यात, शून्याधारित अर्थसंकल्पाच्या अंमल बजावणीचे महाराष्ट्राने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. जर महाराष्ट्राने उचललेले हे पाऊल योग्य जागेवर पडले, अपेक्षित परिणाम घडून आला, तर भारतातील इतर राज्येही या धोरणाचा विचार करून हे धोरण अंगिकारण्याचा प्रयत्न करतील याची खात्री आहे.

---

# देशाची विचारशक्तीच सती गेली !

**माधुरी जोशी**
तृतीय वर्ष कला

देशातील दुष्काळापेक्षाही मानवतेला लांच्छनास्पद वाटेल अशा तऱ्हेची घटना राजस्थानच्या सिक्कार जिल्ह्यात देवराळा या गावी दि. ४ सप्टेंबर १९८७ रोजी घडली. या घटनेमुळे भारतीय लोक २१ व्या शतकात विचाराने पदार्पण करतील की नाही याबाबत संदेह निर्माण झाला आहे. कारण रूपकुंवर नांवाची १८ वर्षे वयाची विवाहित तरुणी आपल्या पतीच्या निधनानंतर सती गेली. ही घटना एक तरुण व तरुणी यांच्या केवळ मृत्यूशीच संबंधित नाही तर कदाचित आपण अजूनही १५-१६ व्या शतकातच वावरतो आहोत की काय असे वाटू लागले आहे. कारण रूपकुंवर ही एक सुशिक्षित तरुणी, तिचा नवरा उच्चशिक्षित व तिचा सासरा उच्च माध्यमिक शाळेत शिक्षक आहे, ही गोष्ट विसरता कामा नये. अर्थात, ही घटना जेव्हा

वृत्तपत्रांनी उचलून धरली तेव्हा सुद्धा राजस्थान सरकार मूग गिळून बसले. कारण त्यानंतर तेराव्या दिवशी झालेला ' चुनरी महोत्सव ' शासनाचा बंदी हुकूम डावलून व पोलिसांना न जुमानता हातात नंग्या तलवारी घेऊन तीन लाख लोकांनी साजरा केला ही बाब देशातील कायदा, सुव्यवस्था व संरक्षण यंत्रणा किती कमकुवत झाली आहे हे दर्शविते.

अर्थात, रूपकुंवर स्वखुशीने सती गेली की, जबरदस्तीने तिला सरणावर बसवले गेले, याबाबत मतभेद आहेत. काही वृत्तपत्रांच्या मते, रूपकुंवरचा नवरा मालसिंग याच्यावर पौरूषत्व नसल्याबद्दलचे उपचार चालू होते. रुपकुंवरचे लग्न १७ जानेवारी १९८७ रोजी झाले आणि ४ सप्टेंबर ८७ रोजी ती सती गेली. एवढ्या काळात ती फक्त १० दिवस नवऱ्याच्या घरी होती. ती लग्नानंतर माहेरी आली, तेव्हा माळी जातीच्या एका तरूणाच्या प्रेमात पडली आणि ८ दिवसपर्यंत ती त्याच्याबरोबर पळूनही गेली होती. या घटनेमुळे तिने नवऱ्यावरील प्रेमापोटी सती जायचे ठरविले हे म्हणणे खरे वाटत नाही. कारण, ती व तिचा पती यांच्यात एकमेकांबद्दल आकर्षण नव्हते. अशा परिस्थितीत ती पतिव्रतेचे ' लेबल ' घेऊन सती जाईल हे संभवत नाही.

रुपकुंवरचे सती जाणे ही घटना सामाजिक संदर्भात लक्षणीय आहे. कारण तिच्या ' चुनरी ' महोत्सवाला लक्षावधी लोक हजर रहातात, ते शासनाचा आदेश डावलतात आणि सरकार त्याबाबत उदासिन रहाते या गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. देशातील इतर लोकांची प्रतिक्रिया सुद्धा चिंतनीय आहे. राजस्थानातील जिल्हा जनता पक्षाध्यक्ष श्री. कल्याणसिंग कलवी जेंव्हा ' रूपकुंवरचे सती जाणे हा धार्मिक समारंभाचा एक भाग आहे व तो तिचा मूलभूत हक्क आहे ' असे म्हणतात आणि सती बंदीसाठी वटहुकूम काढणे हा ' लोकशाहीचा अवमान आहे ' असे जेव्हा पुरीचे शंकराचार्य म्हणतात, इतकेच नव्हे तर, या देशाचे पंतप्रधान चक्क २४ दिवसानंतर या घटनेवर प्रतिक्रिया व्यक्त करतात तेव्हा या घटनेचे सामाजिक संदर्भ आणि त्यांची कारणे शोधणे हे क्रमप्राप्त ठरते. कारण ही प्रथा अंदाजे १५ व्या शतकापासून समाजात फोफावलेली दिसून येते. त्यावेळी स्त्री पतीशिवाय पूर्णपणे निराधार होती. आणि असुरक्षितही होती. म्हणून पतिनिष्ठा व तत्कालीन सामाजिक परिस्थिती यांच्या दडपणाने सती जात होती. त्यानंतर ब्रिटिशांच्या काळात पाश्चात्य शिक्षण घेत असलेल्या भारतीयांना या प्रथेतील अतिरेक व अमानुषता प्रत्ययाला आली. म्हणून राजा राममोहन रॉय यांनी सती बंदीचा कायदा करण्याची ब्रिटिशांकडे विनंती केली. त्यावेळी सुद्धा केवळ उच्च वर्णियांमध्येच ही प्रथा रुढ होती, असे मानायला खूप पुरावा उपलब्ध आहे. अर्थात, ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड बेंटिक यांनी ही अमानुष प्रथा बंद करण्याचा कायदा केला. इथे ब्रिटिश हे परकीय होते, ते आपल्यावर राज्य करत होते, तरीही लोकमताचा मुलाहिजा न करता त्यांनी कायदा केला. आणि आज भारतीय लोक भारतीयांवर राज्य करीत आहेत, तरीसुद्धा ब्रिटिशांनी केलेल्या कायद्याची अंमलबजावणी होत नाही ही केवळ खेदाची गोष्ट नव्हे तर या देशाच्या लोकशाही प्रक्रियेची सर्वात मोठी शोकांतिका आहे. कारण आपण निकोप लोकशाही राबवत असताना धर्म व राजकारण यांची फारकत अजूनही केलेली नाही. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने शहाबानो प्रकरणात दिलेला निर्णय राज्यकर्त्यांनी फिरविला.

त्याचबरोबर जनता पक्षाचेच शहाबुद्दीन मुस्लिम शरीयत कायद्याच्या बाजूने बोलले व आज श्री. कल्याणसिंग कलवी हे सती पद्धतीचे समर्थन करीत आहेत. याचा अर्थ एकच आहे, तो म्हणजे—मतांच्या गठ्ठयांचे राजकारण ! केवळ निवडणुकींवर डोळा ठेवून धर्मात हस्तक्षेप न करणे हे राज्यकर्त्यांचे धोरण सती प्रकरणातही जाणवते. त्याचप्रमाणे सरकार अल्पसंख्यांक लोकांचा जो अनुनय करते, त्याचीदेखील ही प्रतिक्रिया आहे हे लक्षात घ्यावे. मुस्लिम शरीयत कायद्यात हस्तक्षेप नको म्हणूनच सती प्रथा हा वैयक्तिक प्रश्न आहे अशी ही प्रतिगामी प्रतिक्रिया उमटताना दिसते. दुसरे कारण म्हणजे सर्व जगातच धार्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळी निर्माण होत आहेत. भारतातही त्या प्रवृत्ती उफाळून वर येत आहेत.

तिसरे कारण म्हणजे भारतात फॅसिस्ट प्रवृत्ती धर्मांच्या नावाखाली डोके वर काढत आहेत. आणखी या सर्व बाबतीत भारतीय समाजाचे अज्ञान व अंधश्रद्धासुद्धा कारणीभूत आहेत.

तथापि, भारतातील वृत्तपत्रे आणि अल्पसंख्य परिवर्तनवादी लोक यांनी या घटनेकडे जेव्हा देशाचे लक्ष वेधले तेव्हा नाकर्त्या केंद्रसरकारने वटहुकूम काढला व सतीसाठी प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीला देहदंडाची सजा आणि त्याला मदत करणाऱ्यास ७ वर्षापर्यंत सजा अथवा दंड करण्यात येईल, अशी तरतूद केली आहे. त्यामुळे इथून पुढे सती जाणे अथवा त्याचे उदात्तीकरण करणे यास कायद्याने प्रतिबंध झाला आहे. तरीसुद्धा हा उपाय केवळ मलमपट्टी करण्याचाच आहे. यामुळे धार्मिक पुनरुज्जीवनाचा रोग बरा होईल असे नव्हे त्यासाठी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व वैधानिक स्वरुपाची उपाययोजना करणे देशाच्या वैचारिक व सामाजिक आरोग्याच्या दृष्टिने हिताचे ठरेल.

उदाहरणार्थ, देशातील लोकशाही संस्थाचा निकोप व निरपेक्ष राजकीय बुद्धीतून वापर होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर राजकारणासाठी धर्ममध्ये हस्तक्षेप करण्याचे टाळणे चुकीचे आहे, म्हणूनच धर्म व राजकारण याची फारकत व्हायला हवी. धर्माचा, गठ्ठामतांचा राजकारणासाठी वापर करणे टाळले पाहिजे. त्यापेक्षाही विशेष उपाय म्हणजे, या देशातील सर्व नागरिकांना ' समान नागरी कायदा ' लागू केला पाहिजे. कारण सामाजिक रुढी व अंधश्रद्धा केवळ कायद्यानेच नष्ट होणार नाहीत तर त्यासाठी मतपरिवर्तनाचीही आवश्यकता आहे व त्यांची सुरूवात या देशाचे राज्यकर्ते व सर्व धार्मिक नेते यांच्यापासून व्हायला हवी. कारण कायदा करून केवळ कागदी घोडे नाचविणे ही या देशातील परंपरा होऊ पहात आहे. त्याची अंमलबजावणी होत नाही. म्हणूनच कामगार–शेतकऱ्यांच्या चळवळी चिरडण्यासाठी त्यांच्यावर जे सरकार बेछूट गोळीबार करते तेच सरकार राजस्थानातील सिन्नार जिल्ह्यात कायदाभंग करूनही होणारा ' चुनरी महोत्सव, केवळ राजकारणासाठी डोळेझाक करुन पहाते. एकंदरित समाजाचे प्रबोधन व मतपरिवर्तन महत्त्वाचे आहे. त्यासाठी महात्मा गांधी यांनी श्रीमती जानकीदेवी बजाज ह्या पती निधनानंतर सती जात असताना त्यांना विचारलेला प्रश्न महत्त्वाचा आहे–'केवळ शरीर जाळून काय फायदा ? आपल्या दुर्गुणांचा होम करणे हेच खरे सतीत्त्व होय.' या उपदेशाने महात्माजींनी श्रीमती जानकीबाईना सती जाण्यापासून परावृत्त केले होते. म्हणून अशाप्रकारचे मनपरिवर्तन करणारी माणसं जेव्हा या देशात निर्माण होतील, तेव्हाच या देशातील सतीसारख्या अनिष्ट रूढी सहज नष्ट होतील. अन्यथा, आपण अणूबाँब बनवितो, उपग्रह सोडतो, कॉम्प्युटर वापरतो आणि लोकशाही राबवतो या गोष्टी केवळ कर्मकांडच ठरतील व या देशातील शाळा-महाविद्यालये केवळ ' अक्षर ओळख ' करुन देणाऱ्या इमारती होतील आणि रुपकुंवरची परंपरा कुरवाळत या देशाची विचारशक्ती सती जात राहील!

## अशानाच जीवन कळण्याची शक्यता आहे.

" साहित्य ही दिसायला सर्वात सोपी पण कमवायला अत्यंत कठीण अशी कला आहे. 'जो जे वांछिल तो ते लाहो' हा आशीर्वाद मोठा उत्तेजनपर आहे. पण तो यथाचित अंमलात आणण्यासाठी लेखक स्वधर्म सुर्ये पाहो' हेही साहित्यिक प्राणीजातीला परखडपणे सांगितलेच पाहिजे. साहित्यिकाला आपल्या धर्माचा म्हणजे – कर्तव्याचा विसर पडता कामा नये... कवी म्हणजे केवळ गणमात्रा जुळणारा जुळारी नव्हे. त्याला मानवी जीवन कळले पाहिजे. पण जीवन कोणाला कळते. ? जो जीवनाचे सखोल नि सर्वांगीण निरीक्षण करतो; मग ज्यांनी असे पूर्वीच केले आहे त्या श्रेष्ठ पूर्व सूरीचे साहित्य वाचतो, ते मनन, चिंतनाने पचवितो अशांनाच जीवन कळण्याची शक्यता आहे."

**विद्याधर गोखले**

# बालगंधर्व : रंगभूमीचे देणे

**विनायक ठाकूर**
द्वितीय वर्ष कला

रतीचे जया रुप लावण्य लाभे
कुलस्त्री जसे हास्य ओठान शोभे
सुधेसारखा साद स्वर्गीय गाणे
असा बालगंधर्व आता न होणे ।।

महाकवी ग. दि. माडगुळकरांनी नटसम्राट बालगंधर्वांचे केलेले हे वर्णन खरोखरच बालगंधर्वांना शोभून दिसते. अशा प्रकारचे 'प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट' या उक्तीला साजेसे बालगंधर्वांचे वर्णन केवळ माडगुळकरांसारखा महाकवीच करु जाणे ! वरिलप्रमाणे माडगुळकरांनी ज्यांचे यथार्थ वर्णन केले, त्या नटसम्राट–स्वरसम्राट बालगंधर्वांची जन्मशताब्दी ह्या वर्षी आपण साजरी केली. त्या निमित्ताने त्या स्वर्गीय गंधर्वाचे पुण्यस्मरण करावे हेच या लेखाचे प्रयोजन.

### असा झाला 'बालगंधर्व'

आपल्या असामान्य अष्टपैलू अभिनयाने व स्वर्गीय गाण्याने पुढे मराठी रंगभूमीवर सुवर्णयुग निर्माण करणाऱ्या व लाखो रसिकांना आपल्या स्वरगंगेत न्हाऊ घालणाऱ्या बालगंधर्वांचा जन्म मंगळवार दि. २६ जून १८८८ रोजी सायंकाळी ६ वाजून २ मिनिटांनी महाराष्ट्राच्या 'पुण्यभूमीत' झाला. लहानपणापासूनच मिळालेल्या आवाजाच्या निसर्गदत्त देणगीमुळे साहजिकच गायनाकडे त्यांचा कल होता. बालवयात आपले गाणे इतरांना ऐकविण्याची हौस त्यांना होती. गाणे ऐकून लोक त्यांचे कौतुक करीत. अशाच प्रकारे एकदा नरकेसरी लोकमान्य टिळकांसमोर गाणे म्हणण्याचा मणि–कांचन योग त्यांच्या बाबतीत जुळून आला. १० वर्षाच्या त्या बालकाचे गाणे ऐकून टिळकही प्रभावित झाले व त्यांनी शाबासकी दिली. पुढे मिरज येथे किर्लोस्कर नाटक मंडळी असताना योगायोगाने टिळकही तेथेच होते. तेव्हा कुणीतरी टिळकांना विचारले, "या मुलाला ओळखलं का ?" त्यावर लोकमान्य चटकन उद्गारले, "अरे हा तर आपला बालगंधर्व !" अशा प्रकारे लोकमान्यांच्या मुखातून प्रविष्ट झालेले हे सहजोद्गार नारायण श्रीपाद राजहंस यांना एका क्षणात 'बालगंधर्व' ही अजरामर व सन्माननीय बिरुदावली देण्यास समर्थ ठरले. त्या वेळेपासून अखिल महाराष्ट्र नारायणरावांना बालगंधर्व म्हणूनच ओळखू लागला. 'बालगंधर्व' हे नाव आता इतके परिचयाचे झाले आहे की, आजही त्यांचा उल्लेख नारायण श्रीपाद राजहंस ऐवजी 'बालगंधर्व' असाच करावासा वाटतो. हे सामर्थ्य बालगंधर्वांच्या गानप्रतिभेच्या अलौकिक कर्तृत्वाचे आणि लोकमान्यांच्या लोकोत्तर वक्तव्याचे !!

### नादब्रह्माचे संस्कार

१९०५ साली मिरज येथे किर्लोस्कर नाटक मंडळीमध्ये प्रवेश केल्यानंतर नारायणरावांच्या जीवनाप्रमाणेच मराठी रंगभूमीनेही एका वेगळ्या पर्वात प्रवेश केला. याच सुमारास नारायणरावांना पं. भास्करबुवा बखले यांच्याकडून गायनाची तालीम मिळू लागली. बखले बुवांनी नारायणरावांकडून गायनाची अतिशय उत्तम

तयारी करून घेतली. या 'राजहंसाला' संगीत शिकविताना बुवांनी नीर-क्षीर विवेक करायला शिकविले.नारायणरावांना बालगंधर्व ही पदवी देणाऱ्या टिळकांनीच बरवले बुवांचा ' देवगंधर्व ' म्हणून गौरव केला होता. यावरूनच बालगंधर्वांना किती असामान्य महत्तेचे ' गुरुवर्य ' लाभले होते याची कल्पना येते. अभिजात संगीत आणि नाट्य संगीत यांचा सुवर्णमध्य साधून बरवले बुवांनी गंधर्वांच्या गळ्यावर नादब्रह्माचे संस्कार केले. आणि ह्या राजहंसाच्या स्वररत्नाला पैलू पाडले. आंब्याला जशी निसर्गत:च अवीट गोडी तसाच गंधर्वांचा गळा होता. त्या नैसर्गिक नाद माधुर्याला बाधा न आणता बुवांनी त्यावर योग्य संस्कार करून नारायणरावांना ' स्वरसम्राट ' बनविले. अशा प्रकारे बालगंधर्वांच्या गाण्याला अभिजात संगीताचा भरभक्कम पाया लाभला.

नारायणरावांनी मेहबूब खाँसाहेब यांच्याकडे संगीताचे प्राथमिक धडे घेतले होते. त्यांच्या आवाजात मधाचे माधुर्य आणि बुद्धीने एखादी गोष्ट चटकन् आत्मसात करण्याचे चातुर्य होते. त्यांच्या दैवी स्वरतरलतेला पुरक ठरेल अशाच प्रकारची तालीम बरवले बुवांनी त्यांना दिली. यमन-बिहाग-भीमपलास सारंग-भैरवी अशा सहजसुंदर परंतु, बहारदार रागांचा रत्नहार बुवांनी या राजहंसाच्या कंठी चढविला.

बुवांकडे गाणे शिकण्यासाठी गंधर्वांप्रमाणेच मास्तर कृष्णाराव फुलंब्रीकर हेही येत असत. मास्तर कृष्णाराव व बालगंधर्व या दोन्ही शिष्यवरांचे भिन्न भिन्न कंठ धर्म लक्षात घेऊनच बुवा प्रत्येकाला योग्य तालीम देत असत, जी त्याच्या गळयाला झेपेल. मास्तर कृष्णारावांचा आवाज मैफिलीला साजेसा गवयी थाटाचा. यामळे बुवा कृष्णारावांना एखाद्या कठीण किंवा अनवट रागांची तालीम देत असत. एकदा अशीच तालीम झाल्यावर बुवा तेथून बाहेर पडले. तोच नारायणरावांनी कृष्णरावांना शिकविलेल्या तानांचे पलटे घेण्यास सुरुवात केली. हे ऐकताच बुवा चटकन परत आले व त्यांनी कडक शब्दांत नारायण रावांची कान उघडणी केली.

'नारायण, कृष्णाचे गाणे तुला पेलायचे नाही आणि तू ते गायचेही नाहीस. कोकिळेने कोकिळे सारखेच गायचे असते." यावरून बुवांच्या शिष्याविषयीच्या अचूक दृष्टिकोनाची व कटाक्षाची कल्पना येते.

संगीत रंगभूमीवरील आपल्या पन्नास वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीमध्ये या नटसम्राटाने सिंधू, रुक्मिणीसारख्या अनेक भूमिकांना अजरामर केले. गायनाच्या बाबतीत शृंगाररसांप्रमाणेच नवरसांचा राजा जो करुणरस तोही बालगंधर्वांचा मांडलीक होता. म्हणूनच त्यांनी गायिलेली गाणी आजही आपल्यासाठी 'अभंग' बनून राहिली आहेत. बालगंधर्वांचे करुण रसातले गाणे ऐकल्यावर यशवंतांसारखा 'यशवंत' कवी सहज म्हणून गेला -

'शब्द न ते अश्रुहार देत गुंफुनी'

## मधुर संगम

बालगंधर्वांच्या ठिकाणी अभिनय आणि नाद माधुर्याचा सुंदर संगम झाला होता. त्या काळच्या समाजातील संस्थानिक, सरदार इ. उच्चभ्रू, श्रीमंत व खानदानी स्त्रिया गंधर्वांच्या केशभूषा, वेषभुषा, अलंकार परिधान करण्याची पद्धत, गजगतीने चालणे, हृदयाचा ठोका चुकविणारी जीवघेणी हालचाल इ. कृतींचे अनुकरण करण्यात स्वत:ला धन्य मानीत. 'गंधर्व' हा स्त्रीयांच्या रुपसौंदर्याचा आदर्श होता. त्याचप्रमाणे कॉलेज युवक युवती आपापल्या परिने बालगंधर्वांचे अनुकरण करीत असत. हे सर्वसामान्यांचे झाले. पण त्या वेळच्या निरनिराळ्या कंपन्यांही आपल्या उत्पादनांच्या जाहिरातीसाठी बालगंधर्वांच्या नावाचा उपयोग करून घेत असत. गंधर्व-साबून, गंधर्व कॅप, गंधर्व किचेन, गंधर्व फेस पावडर अशी अनेक उदाहरणे याबाबत देता येतील. यावरून सर्वच क्षेत्रांत गंधर्वांच्या व्यक्तिमत्त्वाचा किती गहिरा प्रभाव होता हे लक्षात येते.

## बालगंधर्वांचा गौरव

बालगंधर्व नावाच्या आश्चर्याने त्यावेळी व आजही निरनिराळ्या क्षेत्रांतील मातब्बरांना प्रभावीत केले होते. विद्वान समीक्षक, प्रतिभावान साहित्यिक, अनेक थोर गायक, दिग्दर्शक तसेच संस्थानिक, सरदार

हे सर्वच प्रतिष्ठित लोक गंधर्वांचे केवळ नाव ऐकताच एकदम नम्र होत असत. असे गंधर्वांचे एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व होते.

कर्नाटकाचे विद्वान साहित्यिक, ज्ञानपीठ पारितोषिक विजेते डॉ. कोटी शिवराम कारंत यांनी बालगंधर्वांच्या असामान्य अभिनयाविषयी म्हटले आहे– 'अभिनय म्हणजे काय याची जाणीव झाल्यापासून मी ज्या मोठ्या नटांना पाहिले त्यात बालगंधर्वांच्या तोडीचा अभिनय पुन्हा दिसला नाही.' त्यांच्या गाण्याबद्दल लयभास्कर खाप्रूमामा पर्वतकर म्हणायचे,

'लय पहावी ती गंधर्वांच्या गाण्यातच''

आपल्या अभिजात संगीतामृताने व अभिनयाने केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर कर्नाटक व गोमंतकालाही बालगंधर्वांनी वेड लावले होते.

'जरा मरणयातुनी सुटला कोण प्राणिजात?<br>
दुःख मुक्त जगला कारे कुणी जीवनात?<br>
वर्धमान ते ते चाले मार्ग रे क्षयाचा' ॥

गीतरामायणामध्ये महाकवी माडगुळकरांनी वरील तत्त्वज्ञान पुरुषोत्तम श्रीरामाच्या मुखातून वदविले आहे, बालगंधर्व तरी या उक्तीला कसे अपवाद असणार?

## भूमिका जगले

आयुष्यातील अनेक गौरवशाली सुवर्णमयी क्षणांप्रमाणेच सर्वसामान्यांच्या जीवनामधील चढ–उताराचे, दारिद्र्याचे, आजारपणाचे असे अनेक वाईट क्षणही त्यांच्या जीवनात उन्हाळा–पावसाळ्याप्रमाणेच आले. कर्जबाजारी झाल्यावर त्यांची नाट्यकंपनी सावकाराच्या ताब्यात गेली. स्वकष्टाने त्यांनी ती पुन्हा कर्जमुक्त केली. उत्तर आयुष्यात स्वर व शरीर नीट साथ देत नव्हते. तरीही त्यांनी पूर्वीच्याच भक्तीभावाने रंगभूमीची सेवा केली. सत्तावीस नाटकांमध्ये त्यांनी एकूण छत्तीस भूमिका केल्या. प्रत्येक भूमिका तितकीच समर्थपणे आणि तितकीच गुणवत्तापूर्ण ! दर्जेदार !! अभिनय किंवा गाण्याचा दर्जा हा प्रेक्षकांच्या कमी जास्त होणाऱ्या संख्येवर कधीच अवलंबून नव्हता. दोन प्रेक्षक असले तरी तोच सकस अभिनय आणि 'वन्समोअर'चे आव्हान पेलण्यात दाखविलेली तत्परता कायम असायची. नाटक हे उमेदीप्रमाणेच वृद्धत्वातही तीच नम्रता, प्रेक्षकांना माय–बाप म्हणण्याची आदब कायम होती. रंगभूमीची सेवा करण्याचे व्रत त्यांनी आमरण पाळले! विकलांग अवस्था व दारिद्र्याने ग्रासल्यामुळे गोहरबाई या मुस्लीम स्त्रीचा त्यांनी आधार घेतला. दैवगतीच्या अगाध लीला म्हणतात त्या अशा. शेवटपर्यंत बालगंधर्व तिच्याच आधाराने राहिले.

## राजनगरीतून गंधर्वनगरीत

४ जून १९५५ साली बालगंधर्वांनी 'एकच प्याला' या नाटकात केलेली सिंधूची भूमिका हीच त्या नटसम्राटाच्या ५० वर्षांच्या प्रदीर्घ नाट्यमैफिलीच्या शेवटी घेतलेली आर्तभैरवी होय ! हीच त्यांची रंगभूमिला अखेरची मानवंदना !!

यानंतर त्यांच्या वार्धक्यातील दोन चांगल्या घटना म्हणजे फेब्रुवारी १९६४ मध्ये झालेला त्यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवसाचा सोहळा आणि २६ जानेवारी १९६४ रोजी 'पद्मभूषण' हा किताब देऊन सरकारने त्यांच्या शीरपेचात मानाचा तुरा खोवला तो दिवस होय.

नंतरच्या तीनच वर्षांनी बालगंधर्वांनी १५ जुलै १९६७ रोजी ह्या जगाचा निरोप घेतला. मर्त्य लोक सोडून ते स्वर्गातील इंद्राच्या गंधर्वनगरीत गेले !! बालगंधर्वांना जाऊन आज सुमारे २० वर्षे झाली. आजची पिढी जरी त्यांना पाहू शकली नाही तरी अक्षय्य कीर्तीच्या स्मारकरुपाने आणि आपल्या ध्वनीमुद्रित गाण्यांच्या रुपाने आजही ते आपल्यात आहेत. बालगंधर्व गेले ते फक्त रुक्ष व्यावहारिक जगाच्या दृष्टिने. तुमच्या माझ्यासारख्या असंख्य रसिकांच्या मनोविश्वात आजही ते हृदयसिंहासनावर अढळपदीच विराजमान झालेले आहेत.

# विजय मर्चंट गेले!

**प्रकाश पाटणकर**
द्वितीय वर्ष कला

' क्रिकेटवीर ' ही विजय मर्चंट यांच्या जीवनातील प्रमुख भूमिकांपैकी ( क्रिकेटपटू, उद्योगपती, समाजसेवक ) एक भूमिका होती. या तीन भूमिका परस्परांविरुद्ध आहेत, असे वाटण्याचा संभव आहे. पण विजय मर्चंट यांनी या तीन भूमिका एकमेकांना पुरक होतील अशा रीतीने वठविल्या.

## क्रिकेटचा श्रीगणेशा

क्रिकेटपटू या त्यांच्या भूमिकेबद्दल सांगायचे झाल्यास विजय मर्चंट हे जुन्या पिढीतील नामवंत क्रिकेटपटू क्रिकेटवर निरतीशय प्रेम करणारे जाणकार आणि उदयोन्मुख खेळाडूंचे मार्गदर्शक होते. १९३३ ते १९५२ या काळात विजयभाईंनी क्रिकेट जगताच्या कानाकोपऱ्यात आपले नाव झळकावले होते. १२ ऑक्टोबर १९११ साली मुंबईमध्ये विजयभाईंचा जन्म झाला. या शहरातच त्यांना क्रिकेटचे धडे मिळाले. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी शतक झळकावून आपल्या आगमनाची चाहूल दिली होती.

मुंबईच्या भारडा हायस्कूलमध्ये शिकत असताना शाळेच्या ज्येष्ठ संघातून त्यांनी एकाच सामन्यात १३४ आणि ११० अशा धावा काढल्या होत्या. १९३३ साली डॅग्लस जॉर्डीनच्या इंग्लिश संघाविरूद्ध विजयभाई पहिली कसोटी खेळले. १९३६ साली इंग्लंडमधील पहिल्या दौऱ्यात विजयभाईंनी ५१ धावांच्या सरासरीने १७४५ धावा जमवून ' विस्डेन ' वार्षिकातील ५ सर्वश्रेष्ठ क्रिकेटर्समध्ये स्थान मिळविले.

## परदेश दौरा गाजविला

विजयभाई या काळात भारतीय क्रिकेटसंघाचे आधारस्तंभ होते. त्या काळात आजच्यासारखे कसोटी सामने वारंवार होत नसत. त्यामुळें फक्त १० कसोटी सामने त्यांना खेळावयास मिळाले होते. त्यामध्ये विजयभाईंनी १८ डावांमध्ये ४७.७२ धावांच्या सरासरीने ८५९ धावा जमवल्या होत्या. त्यामध्ये त्यांची तीन शतके होती. १९४५ साली इंग्लंडमधील दुसऱ्या दौऱ्यात विजयभाईंनी २३८५ धावा जमवल्या. एवढेच नव्हे तर त्यांनी या दौऱ्यात एक गोलंदाज म्हणून छोटीशी भूमिका वठविली होती. या दौऱ्यात त्यांनी ९ षटके टाकून ४० धावा दिल्या होत्या. १९५१–५२ मध्ये इंग्लंड विरुद्धच्या दौऱ्यामध्ये त्यानी १५४ धावा पटकावून कसोटी क्रिकेटमधील आपली सर्वोच्च धावसंख्या नोंदविली व क्रिकेटमधून निवृत्ती पत्करली. वैभवाच्या शिखरावर असताना निवृत्ती पत्करण्याचा पायंडा त्यांनीच पाडला.

## आणि रणजी करंडकही

विजयभाई रणजी करंडक स्पर्धेत ४७ डाव खेळले आणि ३६३९ धावा जमविल्या. त्याची सरासरी होती तब्बल ९८ ! रणजी चषक स्पर्धेत मर्चंट आणि मोदी यांनी मुंबईतर्फे अनुक्रमे प. भारत व महाराष्ट्र संघाविरुद्ध तिसऱ्या विकेटसाठी ३७३ आणि सहाव्या विकेटसाठी ३७१ धावांची भागिदारी केली होती. हे दोन विक्रम अजूनही अबाधित आहेत. १९४३–४४ साली मुंबईमध्ये महाराष्ट्र विरुद्ध विजयभाईंनी ३५९

(नाबाद) धावा काढल्या होत्या. ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या होती. त्यांच्या एकूण २० वर्षाच्या कारकिर्दीत ते जगातील एक सर्वोत्तम फलंदाज होते.

## अष्टपैलू क्रिकेटर

विजयभाई अष्टपैलू खेळाडू होते. ते सलामीला खेळण्यास यायचे आणि शैलीदार क्रिकेटचे प्रदर्शन घडवायचे. विजयभाई कसोटी सामन्यांमध्ये उजव्या हाताने मध्यमगती गोलंदाजी करायचे. 'ऑफ स्पिन' वरही त्यांचे प्रभुत्व होते.

नाजूक ' लेट कट ' हा फटका त्यांनीच क्रिकेटला बहाल केला. तसेच 'ग्लान्स' या फटक्यावरही त्यांचे प्रभुत्व होते. विजयभाईंची क्रिकेटविषयक मते आदराने मानली जातात. १९६६ साली विल्डेनच्या संपादकांनी त्यांना ब्रॅडमन आणि जॅक हॉब्ज यांच्या बरोबरीने L. B. W. या वादग्रस्त मुद्यावर आपली मते देण्यासाठी निमंत्रित केले होते. १९६९ साली भारतीय क्रिकेट मंडळाने निवड समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक करुन या थोर क्रिकेटवीराचा सन्मान केला. १९७१ साली इंग्लंडच्या विजयी दौऱ्यानंतर प्रकृतीच्या कारणास्तव त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.

निवड समितीच्या अध्यक्षपदी असताना विजय मर्चंट यांनी गुंडाप्पा विश्वनाथ, एकनाथ सोलकर, मोहिंदर अमरनाथ आणि सुनील गावसकर या क्रिकेटपटूंना पुढे आणले. विश्वनाथ शैलीदार फलंदाज, सोलकर जगातील सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक, मोहिंदर अमरनाथ कठीण फलंदाज आणि सुनील गावसकर 'प्रति ब्रॅडमन' म्हणून नंतर प्रसिद्धीस आले. त्याचप्रमाणे ते एक तज्ज्ञ समालोचक होते. खेळाचे वर्णन करण्याची खुबी आणि मार्मिक टिप्पणीमुळे ते लोकप्रिय झाले. याबाबतीत सुनील विषयी तो कसोटी पदार्पण करण्यापूर्वी विजय मर्चंट म्हणाले होते की, "जर हा मुलगा सलामीचा फलंदाज म्हणून पुढे आला नाही तर मला क्रिकेट काहीच कळत नाही असे मी समजेन." इतक्या प्रांजळपणे मतप्रदर्शन करणारा विजयभाई सारखा दुसरा क्रिकेटपटू सापडणे अवघड.

## अपंगाचे पितृत्व

विजयभाईच्या समाजसेवा या भूमिकेबद्दल सांगायचे झाल्यास त्यांना अपंगांचा मित्र व पालक म्हटले पाहिजे. चांगल्या गोलंदाजीला चांगल्या फलंदाजाने तोंड दिले तरच जोडी टिकते, खेळ रंगतो आणि यश मिळते. विजय मर्चंट यांनी हाच क्रिकेटचा संकेत आपल्या समाजिक सेवेच्या क्षेत्राला लावला. आपल्याहून कमी असलेल्या समाजातील दुर्बल घटकांना आपण संरक्षण दिले पाहिजे या जाणिवेने मर्चंट 'अपंगांचे पुनर्वसन' या क्षेत्राकडे वळले. त्यांच्या अपंगाच्या व्याख्येची व्याप्ती व्यापक होती, "ज्याला दुसऱ्यांची मदत लागते तो अपंग. परिस्थितीमुळे सुद्धा मनुष्य अपंग होवू शकतो. खूप बुटका मनुष्य, खूप उंच मनुष्य यांनाही मी अपंग समजतो. कारण त्यांनाही मदतीची गरज असते. " ही मर्चंट यांची अपंगाची व्याख्या. अपंगांना वा भिकाऱ्यांना पैसे देणे म्हणजे त्यांना कायमचे भिकारी बनविणे होय. अपंगांचे पूनर्वसन करणे म्हणजे त्यांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनवून त्यांना समाजात स्थान देणे होय. हे त्यांच्या कामाचे एक महत्वाचे सूत्र होय.

मंगळवार व गुरुवार हे दोन दिवस त्यांनी अपंगांच्या कामासाठी राखून ठेवले होते. त्या दोन दिवशी आलेल्या अपंगांना भेटणे, त्यांना सल्ला देणे, आवश्यकता भासल्यास त्यांना डॉक्टरकडे घेऊन जाणे इ. कामे ते करीत असत. अपंगांना केवळ आर्थिक दृष्टिने स्वावलंबी करून भागणार नाही, तर त्यांची लग्ने लावून देणे आवश्यक आहे. कारण त्याशिवाय त्यांना समाजात स्थान मिळणार नाही, याबद्दल त्यांची निश्चिती होती. अपंगाची अपंगांशीच लग्ने लावून दिली तरच ती खऱ्या अर्थाने यशस्वी होतात असा त्यांना अनुभव होता. अशी लग्ने लावून देताना पुष्कळदा वधू पित्याची भूमिकाही त्यांनी स्वीकारून कन्यादान केले.

१९८० पर्यंत त्यांनी २५०–३०० अपंगांचे पुनर्वसन केले. त्यानंतर हा आकडा कितीतरी पटीने वाढला असेल. सत्तरीच्या घरात असलेले विजय मर्चंट अपंगासाठी जास्तीत जास्त काही करावे यासाठी झटत

होते. हे काम करता येईल तोपर्यंत जगावे अशी त्यांची इच्छा होती. हृदयविकाराचे चार झटके आले तरी मर्चंट अपंगासाठी काम करीतच होते. पाचवा झटका आला, तेव्हा मात्र परमेश्वराने त्यांची इच्छा पूर्ण केली.

### एकमेव शतकवीर

क्रिकेटच्या सामन्यात विजय मर्चंट यांनी अनेक वेळा शतके काढली हे महत्वाचे आहेच पण अपंगांच्या पूनर्वसनाच्या क्षेत्रात त्यांनी जी अनेक शतके काढली त्याचे मोल करता येणे शक्य नाही. क्रिकेटच्या क्षेत्रात मर्चंट प्रमाणे शतकवीर ठरलेले अनेक आहेत, पण अपंगांच्या पूनर्वसनाच्या क्षेत्रात शतकवीर ठरलेले विजय मर्चंट एकमेवाद्वितीयच असतील.

विजय मर्चंट हे एक प्रसिध्द उदयोगपती होते हा उदयोगाचा प्रचंड व्याप सांभाळूनही विजय भाईंनी क्रिकेटसाठी शेवटपर्यंत स्वत: ला वाहून घेतले होते. तसेच त्यांनी अंध आणि अपंग व्यक्तीसाठी केलेले कार्य जनतेला चिरंतन प्रेरणादायी ठरेल. या थोर समाज सेवकास आमचे विनम्र अभिवादन.

❀ ❀ ❀

---

# अद्वितीय पार्श्वगायक : किशोरकुमार

**मनोजकुमार खाडये**
द्वितीय वर्ष कला

' धन्य ती गायनी कला ' च्या जीवनानंदात कोटी-कोटी भारतीयांना वर्षानुवर्षे विहरत ठेवणारा कंठ कधी थांबेल, त्याच्या गाण्याला कधी खीळ पडेल हा विचार कोणाच्या दु:स्वप्नातही आला नसेल आणि येणे शक्यही नव्हते. कारण किशोरकुमार आम्हांला हसवीत रहाणार, डोलवीत रहाणार, रिझवीत रहाणार, आनंदाच्या डोहात तरंगत ठेवणार – – त्याला अंत नाही – – – त्यात खंड नाही, असे आम्ही गृहीत धरून चाललो होतो आणि कारणही तसेच होते. "गाता रहे मेरा दिल – – – कहीं बीते ना ये राते, कहीं बीते ना ये दिन " असे आव्हान त्यानेच देवून ठेवले होते, अन् त्या आवाजावर आम्ही एवढे प्रेम केले की कधीकाळी त्या स्वराला कराल मृत्यूचा छेद जावू शकेल हे मनातच आले नाही. आणि अशा या अद्वितीय निर्माता, दिग्दर्शक, नट, छायाचित्रकार, संगीतकार, संकलक इ. पडद्यावरील व पडद्या मागील सर्व भूमिका सांभाळणाऱ्या अव्वल दर्जाच्या कलावंताला काळाने अचानक आपल्यांतून हिरावून नेले.

किशोरकुमार भारताचा सर्वाधिक लाडका महान गायक होता, असे विधान करणे म्हणजे बावनकशी सोन्याला ' मुलामा चांगला चढलाय ' असे म्हणून त्याच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. मुळातच किशोरला गायकाच्या चौकटीत बंदिस्त करू नये, कारण तो फक्त गायकच नव्हता! किशोरकुमार काय नव्हता, असा प्रश्न पडावा इतका तो ' सबकुछ ' होता. वास्तविक दिलीप–राज–देव अशोक ही चौकडी अभिनयाच्या अधिराज्यावर कब्जा करून बसली होती, तेव्हाच किशोरही त्यातला पाचवा भिडू व्हायला हवा होता, पण किशोरला कोणी गांभिर्याने पाहिले नाही. वास्तविक 'सकलकलानिधी' हा किताब या कलंदराला शोभावा पण स्वत:च घेतलेल्या भूमिकेमुळे रसिकांनीही त्याला 'बहुरुपी' मानले अन् विनाकारणच त्यांचे अवमूल्यन केले. प्रत्यक्षात तो उत्कृष्ट अभिनेता होता. उत्तम गीतलेखक, संगीतकार, दिग्दर्शक, पटकथा लेखक, निर्माता असा सर्वगुणसंपन्न होता

खांडव्याचे बॅ. कुंजविहारी गांगुली यांच्या घराण्यातील अशोक, अनुप आणि किशोर हे तीनही पुत्र चित्रपटक्षेत्रात प्रवेशणार असे जर १९३० च्या सुमारास कोणी भाकीत केले असते तर बॅ. गांगुलींनी धक्के मारुन त्याला घालवून दिले असते, कारण त्यांना आपले तिन्ही पुत्र उच्च विद्याविभूषित व्हावे असे वाटत होते. हे तिन्ही बंधू आपल्या शाळेत स्नेह संमेलनात भाग घेत पण अविश्वसनीय बाब अशी की ह्या संमेलनातील बक्षिसे अनुपकुमार जिंकी नि बुजरा किशोर दखलपात्र वाटतच नसे.

सचिनदेव बर्मन म्हणजे किशोरचे एक दैवत, 'धीरे से आना बगीयन मे रे भँवरा' हे बर्मनदादांचे गीत अगदी थेट त्यांच्याच धाटणीत किशोरने त्यांना गावून दाखविले नि सचिनदादा थक्क झाले. 'आंदोलन' या चित्रपटात किशोर अभिनेता बुजत बुजत आला नि 'मुकद्दर'मध्ये प्रथम गायकांचा सिकंदर बनला. तरीही 'कसूर आपका न मेरा नाम न लेना न मेरे बापका' ह्या धमाल गाण्यातून किशोर काय धमाल करु शकतो याचे प्रत्यंतर रसिकांना आले. विनोदी अभिनेता म्हणून शिक्का किशोरवर बसला तो कायमचा, इतका की खाजगी जीवनात त्याच्यावर आलेल्या आपत्तीदेखील रसिकांनी क्षुल्लक मानल्या. किशोर आणि विनोद हे समीकरण इतके दृढ झाले की, 'ढाके की मलमल' या चित्रपटातील त्याची अत्यंत गंभीर भूमिकाही रसिकांनी विनोदाच्या रुपात स्वीकारली आणि या अष्टपैलू हिऱ्यावर धडधडीत अन्याय केला. हिरा अष्टपैलू बनवायला मुळात त्याला पैलू पाडणारा कारागिर, रत्नपारखी लागतो. इथे तर सगळाच स्वयंभू कारभार होता.

ना गाण्याला कोणी गुरु, ना कोणाकडून धडे घेतलेले, किशोरकुमार जन्मदत्त कलावंत होता. पाश्चात्य व भारतीय कोणतेही संगीत त्याला अगम्य नव्हते. पाश्चात्य संगितातले 'यॉडलिंग' चिरस्थायी रुपाने भारतीय चित्रसृष्टीत एकट्या किशोरनेच आणले. भारतीय संगीतात अमीर खाँ आणि सैगल पासून सचिनदादांचा अनुनासिक ढंग निर्दोषरित्या उचलण्याची कुवत त्याच्यात होती. त्याची गाणी पाहता त्याच्या कंठाचा आवाका ध्यानात यावा. 'लाल पत्थर' मधील 'गीत गाता हूँ मैं' हे गाणे संपूर्णतः एकाच वरच्या पट्टीत गाताना भल्याभल्या गायकांचा श्वास अडकेल, पण किशोर त्या सुरात रसिकांना पकडून गेला.

लष्कराच्या 'लेफ्ट–राईट' कवायतीच्या ठेक्यावरील 'फुलों के रंगसे दिल की कलमसे' हे गाणे किशोरने असे पेश केले की डोळ्यापुढून स्टेनगनधारी जवानांचे संचलन जावे असा भास व्हावा. मदभरी, नशिली, फुलती, उडती, हसरी गीते देण्याच्या ह्या आवाजाचा गुण होताच, पण त्याचबरोबर दुःखार्त गीतांचे शब्द ओले करुन गाण्याचा त्याचा पल्ला अफाट होता. स्टेजवर 'किशोरकुमार नाईट' व 'हेल्प ८७' अशा कार्यक्रमांतून बेभान नाचणाऱ्या किशोरला आम्ही दाद दिली. पण त्यावेळी लक्षात घेतली नाही त्याची एकलव्याची साधना! जीमी केली, डॅनी के आणि फ्रेड अॅस्टेर यांच्या तोलाचा तो टॉप डान्सर होता. त्याचप्रमाणे सॅमी डेव्हीस ज्युनिअरच्या बरोबरीचा तो एक कुशल संचालक होता नि गुरु शिवाय त्याने हे सर्व साधले होते. कारण चौसष्ट कलांची अधिदेवता त्याच्यावर वरदहस्त ठेवून होती.

किशोरला 'विनोद' हे बिरूद आम्ही रसिकांनी चिटकवले ते एवढे घट्टपणे की त्याच्या मनोवेदनांचाही 'वल्ली' अशी विशेषणे लावून त्याचे हसे केले. वास्तविक रूमादेवी गुहा आणि किशोरकुमार हा विवाह म्हणजे जणू सुर आणि साज यांचा मिलाफ! पण रुमादेवी किशोरला सोडून अभी भट्टाचार्यांबरोबर विवाह करुन निघून गेल्या आणि किशोरने सौंदर्यवती मधुबालाशी विवाह केला. विवाहापेक्षा त्याला परिचर्या म्हणणे योग्य ठरावे. कारणे किशोरने हृदरोगी मधुबालेची अहोरात्र सेवा केली, पाण्यासारखा पैसा खर्च केला आणि ती अकाली निधन पावल्यावर किशोरकुमार एवढा उध्वस्त झाला की, सांताक्रुझ जुहुच्या परिसरातील मंडळींना तो कित्येकदा वेळी–अवेळी जुहुच्या खिस्ती दफनभूमित एकाकी बसलेला दिसला होता. त्याने असाही एक समज करून घेतला होता की गेल्या शतकातील कोणा 'फादर मार्टीन' ह्या मिशनऱ्याने १९२९ मध्ये किशोर कुमार गांगुली ह्या व्यक्तीच्या रुपाने पुनर्जन्म घेतला होता.

खार– वांद्रयाच्या परिसरात ज्यांनी बर्माशेल व कॅल्टेक्स पेट्रोल पंपावर 'चलती का नाम गाडी' चे चित्रीकरण दंग होवून पाहिले होते, 'पाँच रुपैया बारा आना' एक लडकी भीगी भीगी सी' ह्या गाण्यांतील स्पॅनरमधून काढलेला ठोका प्रत्यक्ष ऐकलेला होता, त्यांना हा हरवलेला किशोरकुमार अस्वस्थ करुन गेला. पण, लिना चंदावरकरच्या रुपाने किशोरला हरवलेली गृहस्थी, घर, संसार पुन: मिळाला नि मग पुनश्च रसिकांच्या भेटीला माणसात आलेला किशोर लाभला·

शमशाद बेगम (हो चुके हम तुम्हारी मुहोब्बत में गुम) पासून रेखापर्यंत सर्वांबरोबरच गाणारा, धमाल करणारा, ' पडोसन ' मध्ये सुनील–मेहमुदची छुट्टी करणारा बिलंदर – – – त्याच्या विनोदातील करूण झालर आम्हांला दिसलीच नाही – – – त्याचे कारुण्य ' दूर गगनकी छाँव में ' पाहूनही आम्ही समजून घेतले नाही, कारण आम्ही सरावलो ते " हरफन मौला, खंडवावासी, कुंजीबाबूका पुत्र, दादामुनीका भाई" किशोरकुमार पहायला – – – 'तेरी दुनियासे बहोत दूर चला ' म्हणत हरफन मौला एक्झिट घेवून गेला नि आम्ही रसिक म्हणतोय– " बेकरारे दिल अरे तू गाये जा – – – !"

किशोरकुमारचे वाचन अफाट होते. जशी एखाद्या वकिलाच्या ऑफीसमध्ये कायद्याची पुस्तके ओळीने लावलेली असतात तशी त्याच्या घरी दिवाणखान्यात वेगवेगळया विषयांवरील हजारो पुस्तके, दुर्मिळ फिल्मस्, व्हिडिओ कॅसेटसच्या स्वरूपात ठेवलेली आहेत. किशोरकुमारचे अलिकडील शेवटचे त्याने निर्मिलेले चित्रपट आपण पाहिल्यास तो त्या विषयांचा किती गाढा अभ्यासक होता, हे आपल्या लक्षात येईल. किशोरकुमारचे एक वैशिष्टय असे होते की, ज्या गावात कार्यक्रम असायचा तिथला विशिष्ट पोषाख करून तिथल्या विशिष्ट वाहनातूनच तो जनसमुदयासमोर येत असे.

किशोरसारखा निर्माता, नट, दिग्दर्शक, छायाचित्रकार, संगीतकार, संकलक इत्यादी पडद्यावरील व पडद्यामागील सर्व भूमिका सांभाळणारा अव्वल दर्जाचा कलावंत पुन्हा होणार नाही. आचार्य अत्रेंच्या भाषेत सांगायचे म्हणजे, 'गेल्या हजार वर्षांत झाला नाही आणि येत्या हजार वर्षांत होणार नाही. अशा या अष्टपैलू कलावंतास कोटी कोटी प्रणाम.

❁ ❁ ❁

# जी. ए.–एक शोध

**अनघा कुलकर्णी**
तृतीय वर्ष वाणिज्य

मराठी लघुकथा लेखक जी. ए. कुलकर्णी यांचे ११ डिसेंबर १९८७ रोजी निधन झाले. साहित्य विश्वात अेक वेगळे स्थान निर्माण करणारे जी. ए.–लोक त्यांना 'जी. ए.' या नावाने ओळखायचे. सर्व प्रकारच्या प्रसिद्धि माध्यमांपासून मग ते साहित्य संमेलन असो अथवा वर्तमानपत्र, मासिके यांच्यासाठी मुलाखत असो, ते नेहमीच कटाक्षाने दूर राहिले. आपले छायाचित्रसुद्धा कुठे प्रसिद्ध होवू नये म्हणून खबरदारी घेणारे जी. ए. झगमगाटी जगापासुन अलिप्त होते. परंतु आपल्या कथासंग्रहांतून जीवनाचे यथायोग्य दर्शन मात्र त्यांनी घडविले.

' निळा सावळा ' हा त्याचा पहिला कथासंग्रह १९५९ मध्ये प्रसिद्ध झाल्यावर 'पारवा' 'हिरवे रावे' 'रक्तचंदन' असे तीन कथासंग्रह पाच सहा वर्षांच्या कालावधीतच प्रकाशित झाले. १९७३ साली 'काजळमाया' या

त्यांच्या पुस्तकास साहित्य अकादमीचा पुरस्कार देऊन बहुमानीत केले. परंतु त्यांनी तो नम्रपणे परत केला. 'निळा सावळा' व 'रक्तचंदन' या पुस्तकांनाही राज्य सरकारचा उत्कृष्ट मराठी ग्रंथ म्हणून पुरस्कार मिळाला. जी. ए. एक ज्येष्ठ कथालेखक म्हणून जगन्मान्य पावले. 'काजळमाया' या कथासंग्रहाने तर त्यांना कीर्ती शिखरावर नेलें. कारण त्यांची वैशिष्टयपूर्ण लेखनशैली ! 'चार पायांची स्वामीनिष्ठा हवी असेल तर कुत्रा घ्यावा, तीन पायांची मनःशांती हवी असेल तर केशरयुक्त चंदनाचा त्रिपुंड भाळी धारण करावा, दोन पायांचा द्रोह हवा असेल तर स्त्रीचा स्वीकार करावा आणि एका पायाचे सामर्थ्य हवे असेल तर हातात लोहदंड असावा.' यासारख्या संवादांनी लेखकांच्या परिपक्व मनोभूमिकेचे वाचकांना दर्शन झाले.

जी. ए यांच्या कथा सहजपणें वाचून समजणाऱ्या नसतात. आपल्या कथांतून त्यांनी आधुनिक जेट युगातील केविलवाण्या माणसाचे दर्शन घडविले आहे. जी. ए. नी कुणाचे अनुकरण केले नाही, त्यांचे अनुकरण कुणालाही करता येणार नाही. "जगातील सारी वैभवे हस्तगत करूनही ती मिळाल्याचे समाधान लाभत नाही, कसली तरी कीड त्या वैभवाला लागलेली एकीकडे दिसते आणि दुसरीकडे ते वैभव प्राप्त न झाल्यामुळें सुखापासून वंचित व्हावे लागते." अशा माणसाच्या स्थितीच्या कथा जी. ए. नी लिहिल्या. पत्र लेखनाचा शौक जी. ए. ना फार होता. महाराष्ट्रातील साहित्य अभ्यासकांकडे त्यांची प्रदीर्घ पत्रे आहेत. जी त्यांच्या अस्तित्वाचा वारसा आजही सांगतील. परंतु आपली खाजगी पत्रे प्रकाशित करु नयेत अशी त्यांची इच्छा होती. ते लिहितात– "मी ज्या तऱ्हेने लेखनाचा प्रयत्न केला त्यात कसल्याही प्रकारे तडजोड केली नाही, की वाचकांना अदबीने वागविले नाही. मग त्यांनी का म्हणून माझ्या पुस्तकांना मानावे ? त्याचसाठी मी प्रसिध्दी माध्यमांपासून दूर राहिली. जर मी वाचकांसाठी एक पायरी उतरायला तयार नाही, तर त्यांच्याकडून त्यांची आपुलकी मिळविण्याचा काडीचाही अधिकार मला नाही."

जी. ए. यांची कथा आपले रुप न टाकता व वाचकाला न फसवताच ती इतर वाङमय प्रकारांचे बळ आत्मसात करुन जाते त्यांच्या कथेमध्ये अमूक एक आशयकेंद्र, तमूक विषय, अमूक तपशील, तमूक वातावरण असा काही प्रकारच नाही. शब्दांतून तपशील, तपशीलांतून प्रतिमा, प्रतिमेतून आशय अशी घडण होत जाते. आणि तरीही प्रत्येक घटक आपला मूळ स्वभाव कायम ठेवून असतो. श्री. ग. प्र. प्रधानांना लिहिलेल्या एका पत्रात जी. ए. म्हणतात – "तुम्ही भागवत गीतेचा अभ्यास करत आहात हे वाचून मला एकदम फार स्वार्थी अशी एक उत्सुकता वाटू लागली. सध्या मी Formal philosophy वाचायचे सोडून दिले आहे. शिवाय तत्वज्ञानात काय, सौंदर्यशास्त्रात काय, जे मला महत्वाचे वाटले, ते त्या पुस्तकांतील चर्चेच्या रुपाने कधी जाणवले नाही. मला आसपास रक्तामांसाची माणसे असल्याखेरीज स्वस्थ वाटत नाही. हे सारे प्रश्न महत्त्वाचे, कारण ते माणसाला जाणवतात म्हणून ! पण त्या जाड विद्वत्तापूर्ण पुस्तकात माणसांना आत जायलाच मुळी बंदी असते. विशेषतः गीतेच्या बाबतीत तर मी पूर्ण गोंधळलेला, अज्ञच राहिलो."

मराठी साहित्यात जी. ए. असे आगळे-वेगळे होते, तसेच त्यांचा इंग्रजी साहित्याचा अभ्यासही खूप होता. त्यांचे इंग्रजी साहित्यावर प्रभुत्व होते.

जी. ए. समाजात न राहता त्या समाजाचे अलिप्तपणे अवलोकन करीत राहिले, ते आयुष्यभर एकाकीच राहिले. आपल्या वैशिष्टयपूर्ण लेखनाने मराठी साहित्यांत कथालेखक म्हणून जी. ए. चे स्थान अजरामर राहिल.

# मराठ्यांची आरमारी राजधानी : विजयदुर्ग

**रवींद्र करंदीकर**
द्वितीय वर्ष कला

विजयदुर्ग हा किल्ला सन १२०० च्या सुमारास शिलाहार राजा भोज याने बांधला. विजयदुर्ग या किल्ल्याला पूर्वी 'घेरिया' हे नाव होते. शिवाजी महाराजांच्या अगोदर येथे विजापूरच्या अदिलशाहीची सत्ता होती. पूर्वी हा किल्ला पूर्णपणे पाण्यात होता परंतु आता एका बाजूला जमीन आहे. अदिलशाहीमध्ये पूर्वेच्या बाजूने खंदक खणून त्यात पाणी अडविले जात असे. दिवसा त्या पुलावरून ये-जा केली जाई. आता तेथे पक्का रस्ता बांधून पाणी बंद केले आहे. त्यामुळे एका बाजूला जमीन व तीन बाजूला पाणी आहे.

जवळ जवळ १२५ वर्षे विजापूरकरांची येथे सत्ता होती. त्यानंतर १६५३ साली शिवाजी महाराजांनी हा किल्ला जिंकून घेतला आणि स्वत:च्या हाताने मध्यभागी निशाणाच्या टेकडीवर भगवा झेंडा रोवला. २०० वर्षांची मुसलमानांची सत्ता नाहीशी झाली. किल्ला सर करताना महाराजांचे फारसे नुकसान झाले नाही. थोड्याशा प्रतिकारानंतर किल्लेदार शरण आला. शिवभक्त शिवाजी महाराजांचे स्मारक म्हणून किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर मारुतीचे मंदिर उभारले गेले आहे. अजूनही ते जागृत देवस्थान समजले जाते. तेथील ग्रामस्थ आजही उत्साहाने तेथे 'हनुमान जयंती' साजरी करतात.

विजयदुर्ग हा किल्ला पश्चिम किनाऱ्यावर पसरला आहे. येथून मुंबई सुमारे २२५ कि. मी. अंतरावर व गोवा सुमारे १५० कि. मी. अंतरावर आहे. विजयदुर्ग ही खाडी असून ती पूर्व-पश्चिम ४० कि.मी. आहे. भरतीचे पाणी तिथपर्यंत वरती येते. शिवाजी महाराजांनी ज्यावेळी हा किल्ला जिंकला, त्यावेळी हिंदू पंचांगाप्रमाणे 'विजय' हे त्या वर्षाचे नाव होते. म्हणूनच राजांनी 'घेरिया' हे नांव बदलून 'विजयदुर्ग' हे नाव दिले. हा किल्ला पूर्वी फार मोठा नव्हता. सुमारे ५ हेक्टर क्षेत्र व्यापले होते. किल्ल्याच्या मध्यभागी असलेल्या टेकडीच्या सभोवती तटबंदी करून किल्ल्याचे क्षेत्र मर्यादित केले गेले. नंतर महाराजांनी किल्ल्याभोवती तीन उंच, भक्कम व मजबूत भिंती बांधल्या. चारही बाजूंनी किल्ला मजबूत केला. किल्ल्याच्या तटावरती संरक्षणासाठी, शत्रूवर मारा करण्यासाठी २० बुरूज उभे केले. त्यामुळे किल्ल्याचे क्षेत्र ७ हेक्टर एवढे झाले.

किल्ल्यातील वीस बुरुजांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) गणेश बुरुज | ११) शिवाजी बुरुज |
| २) राम बुरुज | १२) गगन बुरुज |
| ३) हणमंत बुरुज | १३) मनरंजन बुरुज |
| ४) दर्या बुरुज | १४) गोविंद बुरुज |
| ५) तुटका बुरुज | १५) सदाशिव बुरुज |
| ६) सिखरा बुरुज | १६) खुब लढा तोफा बारा बुरुज |
| ७) शिंदे बुरुज | १७) धनत्री बुरुज |
| ८) सहा बुरुज | १८) पाण बुरुज |
| ९) व्यंकट बुरुज | १९) पडकोट खुष्की बुरुज |
| १०) सर्जा बुरुज | २०) जर बुरुज |

समुद्रालगतच्या भिंतीची उंची ६ मीटर आहे. या तीन भिंतीमुळे किल्ला मजबूत व अभेद्य आहे. किल्ल्याच्या आतील विस्तीर्ण पटांगणावर नवे वाडे, हत्ती व घोडे यांच्या पागा व लष्करासाठी घरे होती. ती आज अस्तित्वात नाहीत. शंकराचे व भवानी मातेचेही देवालय होते. महाराजांनी आरमाराची स्थापना १६६४ साली केली. त्यावेळी इब्राहीम दौलतखान हा आरमार प्रमुख होता. लढाऊ जहाजे बंदरामध्ये जागता पहारा ठेवीत असत. स्वराज्याच्या संरक्षणाची जबाबदारी व चाचेगिरीपासून बचाव ही कामे विजयदुर्गावरती सोपविली होती. १७९३ पर्यंत हे काम विजयदुर्गाने व्यवस्थित पार पाडले. शिवाजी नंतर राजाराम महाराज येथील सत्ता, कारभार पहात होते. त्यांनीच कान्होजी आंग्र्याना मराठी आरमाराची 'सरखेल' ही पदवी दिली. कोकण किनाऱ्यावरती मराठी आरमाराचा फार मोठा दरारा होता. कान्होजी आंग्रेनी १७०५ साली देवगडचा किल्ला तसेच जयगड, पूर्णगड हे किल्ले (गढी) बांधले.

मराठ्यांचे हे सामर्थ्य परकीय सत्तेला मान्य झाले नाही. १७२० साली डचांनी विजयदुर्गावर स्वारी केली. त्यामधे ते पराभूत झाले. परंतु १७२८-२९ साली कान्होजी निधन पावले. कान्होजी नंतर त्यांचा दुसरा मुलगा संभाजी आंग्रे आरमार प्रमुख बनला. तो शूर होता. पण अल्पावधीतच (१२ऑक्टोबर १७४२) विजयदुर्ग किल्ल्यावर तो मरण पावला. गिर्ये रामेश्वर येथे त्यांची समाधी बांधलेली आहे. संभाजीच्या निधनानंतर विजयदुर्ग आरमाराची सत्ता कान्होजोचा अनौरस पुत्र तुळोजी आंग्रे यांच्याकडे आली. तोही संभाजीप्रमाणेच पराक्रमी होता. त्याने आपल्या कारकिर्दीत इंग्रजांची अनेक लढाऊ जहाजे पकडून बंदरात ठेवली होती. ती जहाजे अशी–

१) डर्बी २) ज्युपीटर ३) चारलोटी ४) विल्यम् ५) ऑगस्टा ६) ॲनी ७) दादाभाय ८) सेव्हर्न ९) रोज १०) नेपच्यून ११) गोंगीमोळी १२) रिस्टोरेशन १३) फत्ते दौलत १४) पायलट

१७४५ मध्ये तुळाजीने सिद्दिचा 'अंजनवेल' हा किल्ला घेतला. अशा प्रकारे १७४२ ते १७५४ या १२ वर्षांत त्याने आरमारात भरघोस यश संपादन करून इंग्रज व डच यांना शह दिला आणि आपली सत्ता बळकट केली. इंग्रजांच्या डोळ्यांत तो नेहमी सलत असे. कारण त्याची १४ लढाऊ जहाजे तुळाजीच्या नजरकैदेत होती. व त्यावरील सैनिक किल्ल्यातील कोठडीत बंदिस्त होते. परंतु, पुढे त्याचे व पेशव्यांचे वैमनस्य झाले. तुळाजीला धडा शिकविण्यासाठी नानासाहेबांनी इंग्रजांचे सहाय्य घेण्याचे ठरविले. त्यानुसार सन १७५५ (मार्च) मध्ये बेत पक्का करून त्याबद्दल एक करार केला. नानांच्या या कृत्यामुळे इंग्रजांना तुळाजीवर सूड उगविण्याची संधीच मिळाली. दि. १२।२।१७५६ रोजी आरमारी लढाईस तोंड फुटले. सायंकाळी इंग्रजांकडील तोफेचा एक गोळा विजयदुर्ग बंदरातील, तुळाजीच्या ताब्यात असलेल्या इंग्रजांच्याच एका जहाजावर येऊन फुटला व आग लागली. नंतर सर्वच आरमार जळून खाक झाले. यानंतर तुळाजी शरण गेला. पुढे तुळाजीवर संकटांची मालिकाच उभी राहिली. दुसरेच दिवशी दारुगोळ्याच्या गुदामास आग लागली.

नंतर १४।२।१७५६ रोजी सकाळी सैन्यासह क्लाईव्हने किल्ल्यात प्रवेश केला. सर्व ऐवज ताब्यात घेतला. तुळाजी आंग्रे पेशव्यांच्या कैदेत असतानाच १७८६ साली मरण पावले. १२ ऑक्टोबर १७५६ मध्ये इंग्रज व पेशवे यांच्यात तह होऊन किल्ला पेशव्यांच्या ताब्यात गेला. आंग्र्यानंतर आनंदराव धुळप किल्लेदारी पहात. पोर्तुगीजांच्या एका जहाजावर एक मोठी घंटा व डोलकाठी सापडली. आज ही घंटा रामेश्वर मंदिराच्या प्रवेशद्वारात आहे. किल्ल्यात एक विहीर आहे. तिचे वैशिष्ट्य म्हणजे लगतच समुद्र असूनही पाणी गोड आहे. आज किल्ल्यामधे पोलिस ठाणे, कस्टमचे ऑफिस, धर्मशाळा, विश्रामगृह या इमारती आहेत. मधून मधून तट कोसळले आहेत. १९७५ साली ते बांधण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर त्याकडे दुर्लक्षच केले गेले आहे. परंतु अजूनही 'कोकणचे भूषण' असलेला हा विजयदुर्ग किल्ला पहाण्यासारखा आहे. पुरातत्व खात्याने या किल्ल्याच्या संरक्षणाचे काम हाती घेणे आवश्यक आहे.

❁ ❁ ❁

# कोकणातील दशावतार

**द्वारकानाथ वाडकर**
तृतीय वर्ष कला

दशावतारी नाटक ही एक कोकणातील श्रेष्ठ दर्जाची कलाकृती आहे. साधारणतः माझ्या या मायभूमीमध्ये म्हणजे दक्षिण कोकणमध्ये ही कला फार जुनी, पारंपारिक पद्धतीची व लोकांचे करमणूक करण्यास श्रेष्ठ दर्जाची अशी कला आहे. आणि याची सुरुवात दिवाळीनंतर होते. प्रत्येक गावांमध्यें जत्रेसारखा मोठा व सार्वजनिक उत्सव होतो. त्या करिता खास लोकांच्या मनोरंजनासाठी दशावतारी नाट्य कलाकृती सादर केली जाते. गावामध्ये, शाळेतूनही चर्चेत चालणारा हाच महत्त्वाचा विषय असतो. कडाक्याच्या थंडीत रंगीबेरंगी, फॅशनेबल कपडे परिधान करून स्त्री–पुरुष मोठ्या संख्येने नाटकास येतात आणि एकदा का त्यांनी नाटक बघण्यास रस घेतला की ते नाटक पूर्ण पाहिल्याशिवाय परतत नाहीत.

ही दशावतारी कलाकार कंपनी म्हणाल तर त्या प्रत्येक कलाकारांचे केस लांब, डोक्यावर काळी गोल टोपी, मिशीशिवाय गुळगुळीत चेहरा, पान खाऊन रंगलेले तोंड, हातामध्ये काळी हॅंडबॅग, सर्वसाधारण पांढराच पोशाख, पायांमध्ये चामड्याच्या चप्पला व सोबत एक हमाल अशा थाटात हे कलाकार साध्याच पद्धतीने प्रवास करताना दिसतात. परंतु हेच लोक रात्री चमत्कार करुन दाखवितात.

दशावतार हे आपली कला रसिकांच्यासमोर सादर करीत असताना त्यांना रंगमंच लागतो तो देवळातील सभामंडपामध्ये. तर कांही देवळाच्या समोर खास रंगमंच बनविलेला असतो. व त्यावर माडांच्या झावळ्यांचा मंडप उभारून मंडपाच्या पाठीमागच्या बाजूला एक पडदा लावलेला असतो. रंगमंचावर एक लांबट बाक असते की ज्यास टेकून बसता येईल असा. हार्मोनियमवाल्याकरिता एक खुर्ची व दोन स्टुले, एक तबलजीकरिता व एक झांझ वाजविणाऱ्याकरिता असा स्टेजचा थाट असतो. दशावतारी कलाकार त्यावर आपली बहुमोल अशी भूमिका रसिकांच्यासमोर सादर करतात. दशावतारी नाटक कलाकार आपली नाट्यकला नेहमीच गणेश प्रार्थनेने सुरु करतात. जत्रेच्या प्रसंगी शंकासुर हा विनोदी पुकार फारच मोहक असतो.

दशावतारी कलाकारांमध्ये स्त्री कलाकार हा प्रकार नसतो. सर्वच पुरुष कलाकार असून ते आपापल्यापरिने सर्व भूमिका वठवित असतात. त्यात कुणी मुख्य राजा, प्रधान, सेनापती, राजपती, युवराज, राजकन्या, कुणी नर्तिका, कुणी दानव, कुणी ब्राम्हण, कुणी ऋषी तर कोण नारद अशा भूमिका करतात. पौराणिक अगर ऐतिहासिक घटनेवर आधारित अशी ही अलिखित कला असते.

ही कला सादर करणारे कलावंत आणि ती पहाणारे प्रेक्षक नाटक पाहताना एकरूप होवून जातात. नाटकाचे स्वरुप सर्वसाधारण असे असते– राजाने प्रवेश केल्यानंतर राज्याचा सर्वसाधारण वृत्तांत व प्रजेबद्दलची कळकळ व नंतर धर्मपत्नींशी भेट, राजाने शिकारीस जाणे अगर शत्रूची स्वारी व नाटक सुरु होते. शेवटी नाटकाच्या सर्व घडामोडीतुन सत्याचा

विजय होतो. मध्येच युवराज व राजकन्या यांची जंगलात भेट व त्यांचा प्रेम प्रसंग, त्यामुळे भरपूर मनोरंजन होते. शेवटी आनंदी वातावरण असे नाटकाचे स्वरुप असते.

नाटकात कुठलाच फिरता रंगमंच, सुसज्ज नाट्यगृह, झगझगीत रंगीत लाईट असे दृश्य नसूनही त्याची सर्व कमतरता हे दशावतारी कलाकार आपल्या श्रेष्ठ दर्जाच्या अभिनयांतून, कलाकृतींतून व आपल्या संभाषणांतून साकार करतात. उदा० राजवाड्यांत राजाने प्रवेश केल्यानंतर राजा जे राज्याचे विस्तृत वर्णन करतो, त्यामुळे रंगमंचावर खराखुरा राजवाडा आहे असा एक प्रकारचा भास होतो. तसेच राणीचे शयनगृह, जंगलातील फुलांफळांनी, डोंगरदऱ्यांनी बहरलेली वनराई, युद्धाच्या वेळची युद्धभूमी सारे कांही मजेशीर व शब्दांच्या कमाईत रंगवलेले असते.

दशावताऱ्यांचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे ते स्त्री भूमिकाही स्वतःच वठवितात. सदरची भूमिकाही ते एवढी उठावदार वठवितात की ते स्त्रीवेशधारी पुरुष आहेत हे कोणीही ओळखू शकणार नाहीत असा त्यांचा अभिनय असतो. परमपूज्य सानेगुरुजींनी सांगितल्याप्रमाणे; ' भारतीय स्त्रिया ह्या आदर्श स्त्रिया असून त्याच पुरुषांना घडवितात.' याचे प्रत्यंतर हे दशावतारी कलाकार आपल्या नाटकांतून साकार करतात. पतिव्रतेसारखे महान तेजस्वी व्रत की जे देवांनाही जिंकणे दुर्लभ आहे तेच नाटकांतून दाखवितात. पतीसेवा ही ईश्वरसेवा मानून पतीच्या सेवेसाठी सदैव तयार राहून त्यांची पूजा स्त्रिया करतात व प्रत्यक्ष परमेश्वराची पूजा दुय्यम मानतात. त्यामुळे परमेश्वराला या स्त्रीवर प्रसन्न होऊन आशीर्वाद दिल्याशिवाय इलाजच नसतो. आणि याचा परिणाम असा होतो की प्रत्यक्ष पतीचा अगदी अटीतटीच्या व कठीण प्रसंगी सुद्धा विजय होतो. आणि जर स्त्री पतिव्रता नसेल तर पती शूर व पराक्रमी असूनसुद्धा होणारा सहज पराभव यातून आदर्श स्त्रीचे श्रेष्ठत्व दशावतारी सिद्ध करतात.

दशावतारी नाटक कलाकारांचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे त्यांचे युद्धप्रसंग हे तर फारच मजेशीर असतात. परस्परांशी युद्ध खेळताना ते तरवारी (धार नसलेल्या); गदा व मल्लयुद्ध अशा प्रकारचा प्रसंग असतो व युद्ध हे विशिष्ट संगीतात खेळले जाते. दशावतारी संगीत हे फार मोहक व मजेशीर असते. गाण्यांत दर्जेदारपणा असतो. संगीतात–

मन मारी भरारी रानपाखरा वाणी
सांग सखे ग सांग मला पत्रात लिहू मी काय तुला
जातो मी लग्नाला द्वारकापुरा
नभ मेघांनी आक्रमिले
जन्मो जन्मी तुम्हीच यावे माझ्या संसारी
रजनीनाथ हा नभी उगवला

यासारखी अधिकाधिक सुंदर गाणी असतात. क्वचित प्रसंगी Classical नृत्यही असते आणि शेवट हा 'सत्यमेव जयते' या तत्त्वानुसार होतो. आजच्या दशावतारी कलाकारांमध्ये विष्णू गांवकर, रंगा खानोलकर, बाबी नालंग, गोविंद तावडे, बाबी कळींगण, आप्पा दळवी, सुरेश गावडे, चंद्रकांत मेस्त्री व त्यांचे वडील भैरवकर, वसंत बोंदरे यांची नावे प्रामुख्याने घ्यावी लागतील.

आपल्या कांही प्रगत अशा कलांमध्ये दशावतारी कला ही एक श्रेष्ठ दर्जाची कला आहे. देशावरील पारंपारिक पद्धतीतील व नऊवारी साड्यांमधील तमाशा बघण्यापेक्षा दशावतारी नाटक पाहण्याने अधिक समाधान लाभेल. दशावतारी कलेचा प्रसार इतर भागात अद्याप झाला नाही. शासनाने ह्या कलेच्या अस्तित्वासाठी आवश्यक प्रयत्न केले पाहिजेत.

# पोटगी

**मीना चव्हाण**
द्वितीय वर्ष कला

वेळ सकाळी दहा वाजण्याची होती. ॲडव्होकेट अरविंद पंचाक्षरी यांचे ऑफिस त्यांच्या अशिलांनी नेहमी सारखे तुडुंब भरले होते. आज ज्यांच्या कोर्टात तारखा होत्या, त्यांना ते आपल्या बुद्धि कौशल्याने मार्गदर्शन करीत होते. शहरातील एक नामांकित वकील म्हणून त्यांना ओळखले जात होते. परंतु एवढी प्रसिद्धि असूनही त्यांनी वकिली न्यायाने कधी पैशांसाठी कोणा अशिलाला परत पाठविले नाही. सामाजिक बांधिलकी ते काही अंशी पार पाडत होते. त्या माणसांच्या गर्दीत स्मिताही हजर होती. वकील साहेबांच्या सांगण्यावरूनच ती आज आली होती — — —

सर्व अशिलांना मार्गदर्शन करून झाले होते. त्यांच्या असिस्टंटने स्मिताला केबीनमध्ये बोलावले. ती आत गेली.

" नमस्कार साहेब — — — "

" या . . . या . . . बसा, काय म्हणता ? "

"साहेब, उद्या माझ्या केसचा निकाल आहे हे आपणास माहितच आहे. परंतु काही अन्य माहिती वगैरे हवी असल्यास सांगा. "

"हे बघा, तुम्ही अगदी निर्धास्त रहा . . . तुम्ही शंभर टक्के केस जिंकणार याबद्दल वादच नाही. तुमच्या मिस्टरांना आता कुठेच वाव नाही. तुम्हांला पोटगी मिळालीच म्हणून समजा. "

" पण साहेब . . . मला एक संशय येतो आहे. त्यांनी राजकीय माणसापर्यंत धाव घेतली आहे. शिवाय ते सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते असल्यामुळे काही उलथापालथ तर करणार नाहीत ना ? . . . मला भीती वाटते आहे ! "

" हे बघा देशपांडे, जोपर्यंत मी स्थीर आहे तो पर्यंत कुठलाही सत्ताधारी माझं काही करु शकत नाही. कारण मी आजपर्यंत माझ्या व्यवसायाशी एकनिष्ठ राहिलो आहे. कुठल्याही शक्तीच्या आहारी गेलेलो नाही. तेव्हा तुम्ही उगाच काळजी करु नका. उद्या अगदी बिनधास्त कोर्टात या — — — "

स्मिताला थोडं हायसं वाटलं. ती आपल्या घरी गेली.

" राजकारण — — — राजकारण ! " ॲड. पंचाक्षरी स्वतःशीच पुटपुटत हसले ! या बाईची केस आपण शंभर टक्के जिंकतो आहोत याबाबत याक्षणीही ते निश्चित होते. परंतु स्मिताने केलेल्या वक्तव्याने त्यांच्याही मनात शंकेची पाल चुकचुकली. न जाणो विरोधी पक्षकार वरपर्यंत सुद्धा पोहोचतील आणि खरोखरच जिला आज सरळ न्यायाची जरुरी आहे अशी स्मिता देशपांडे एक असहाय्य अबला पराभूतही होईल. छे . . . असं कधीच होणार नाही.

त्यांच्या नजरेसमोर एक वर्षापूर्वी आपली कर्म कहाणी सांगत रडणारी स्मिता उभी राहिली . . . स्मिता आपल्या लाडक्या स्वातीसारखी! मुलीसमान! तिची कर्मकहाणी ऐकून तेही सून्न झाले होते . . .

स्मिता मॅट्रीक पर्यंत शिकलेली, आई-वडिलांची एकुलती एक असल्यामुळे तिच्या सर्व हौशी-मौजी

झालेल्या होत्या. वडील गिरणीमध्ये नोकरीला होते. गिरणीत संप झाला आणि अडीच लाख कामगारांबरोबर त्यांच्यावर सुद्धा बेकारीची कुऱ्हाड कोसळली. दोन मुलांचा शिक्षणाचा खर्च आणि मुलीचे लग्न ! या यामुळे त्यांची क्रियाशक्तीच संपत आली परंतु उलथापालथ करून त्यांनी दुसऱ्या वर्षी स्मिताचे लग्न केले. घर बरं होतं. मुलगा सुद्धा चांगला होता. चांगल्या नोकरीला होता. स्मिताचा वर्षभर संसार चांगला चालला आणि तिच्या नवऱ्याची विविध रुपे नजरेस येऊ लागली. त्यात हुंड्याचा राक्षसही होता हे सांगायलाच नको ! सुरुवातीस तिने पुष्कळ सहन केले. पण, प्रकरण मारझोडीपर्यंत जेव्हा येऊ लागले, तेव्हाच संयमी स्मिताने माहेरचा मार्ग धरला. नव्हे तिला हाकलविण्यात आले.

वडिलांची आर्थिक परिस्थिती फारच हलाखीची झाली होती. आणि त्यात लाडक्या लेकीची ही कर्मकहाणी ऐकून ते दिवाणेच झाले. त्यात त्यांना अर्धांगाचा झटका येवून त्यांची जीवनज्योत मालवली.

आणि काही दिवसांनी नातलगांच्या मदतीने तिने निदान आपणास पोटगी मिळावी म्हणून कोर्टात दावा घातला होता. तर तिचा नवरा घटस्फोटासाठी कोर्टाकडे धावला होता.

आणि अशा विचित्र अवस्थेत स्मिता त्या दिवशी अॅड. पंचाक्षरीसमोर उभी होती आपली कर्मकहाणी सांगत. अॅड. पंचाक्षरीही तिची व्यथा ऐकून विरघळले होते. कारण वकील असले तरी ते सुद्धा एक माणूसच होते, नव्हे एका मुलीचे बाप होते ! त्यांनी तिला धीर दिला होता. . .

ट्रिंग ऽ ऽ ऽ ट्रिंग ऽ ऽ ऽ

फोनच्या आवाजाने अॅड. पंचाक्षरी जागे झाले. ते कितीतरी वेळ स्मिताच्याच विचारात होते. . .

" हॅलो, पंचाक्षरी स्पिकिंग . . . कोण आबासाहेब ! नमस्कार ! . . . आज बरी आठवण झाली . . . हाऽ ऽ हा अहो, कसली प्रसिध्दी म्हणता ? शेवटी तुमच्या आशीर्वादानेच एवढी मजल मारली आहे . . . बरं, वहिनी काय म्हणतात ? . . . ठिक ना ? . . . स्मिता देशपांडे ना ? हो – हो ती माझीच अशील आहे. उद्या तिच्या दाव्याचा निकाल आहे . . . हां ? . . . केस ना ? . . शंभर टक्के जिंकणार ! अहो तिची बाजू सरळच आहे . . .

क् . . काय ऽ काय ऽ ? सौम्य चलू ? का बरं ? . . . – तिचा नवरा कार्यकर्ता ? पण आबासाहेब माझ्या व्यवसायाशी त्यांचा काय संबंध . . . ? केस जिंकलीत तर त्रास होईल ? छे . . . छे . . . सॉरी आबासाहेब . . . प्लीज तुम्ही लक्ष घालू नका . . . तुमच्या माझ्या मुलीसमान आहे ती . . . प्लीज, प्लीज. तुम्ही मेहरबानी करा . . . "

घामाघुम होऊन अॅड. पंचाक्षरींनी फोन ठेवला. शेवटी स्मिताचा संशय खरा होत होता. परंतु तेही सांगणे कठीणच होते. शेवटी काय न्यायदेवता ही आंधळी आहे असे जरी म्हटले तरीही ते बरोबर नाही. कारण आज प्रत्येक गोष्ट राजकारणी माणसांच्या हाती जात आहे, हे ही वकीलसाहेब जाणून होते . . . स्त्री मुक्ती – – हुंडाबंदी . . . हे शब्दसुद्धा नको. सभा–संमेलने गाजविणारे, स्त्रियांच्या समस्या आतडी पिळवटून बोलणारे राजकीय अधिकारीच आज स्त्रियांचे बळी घेत आहेत . . . आणि बळी घेणार आहेत . . . वकिलांच्या तोंडून शब्द आले . . . " बघू काय होते ते . . . ! ! " म्हणत ते ड्रेसिंग रुमकडे वळले व त्या दिवसाच्या कोर्ट कामासाठी वळले.

आज स्मिताच्या केसचा निकाल होता. तिने आपल्या कुलदैवताचे स्मरण केले तिला हात जोडून ती आपल्या भावाबरोबर कोर्टात हजर झाली. कोर्ट नेहमीसारखे माणसांनी भरलेले होते. अॅड. पंचाक्षरींच्या मनात संशयाची पाल चुकचुकत होती, तरीही ते वकिली न्यायाने स्मिताला धीर देत होते.

स्मिताच्या केसचा निकाल न्यायाधिशांनी जाहीर केला. निकाल तिच्या विरुध्द लागला होता . . . निकाल ऐकून स्मिताला चक्कर आली होती ! अॅड. पंचाक्षरीही सुन्न झाले होते.

# काही कविता


## चक्रव्यूह



लतिकेने सहज वळावे
त्याहीपेक्षा हळूवारपणे तू मागे वळलीस
क्षणभर नजरा स्थिरावल्या
आपण बोलण्याआधीच ....
एकमेकींना सांगून गेल्या,
खुणावून शांत झाल्या –
किती भाग्यवान ग नजरा,
निर्ढावलेल्या मनालाही लाजवलं त्यांनी
मनातले उद्वेग बाहेर पडलेच नाहीत.
सारं समजण्यापूर्वीच,
या नयनबाणांनी कावा साधला
आपण मनानं कधीच बोललो नाही.
मन मात्र
मनातल्या मनात
गंतत गुरफटत गेलं
जणू, चक्रव्यूहासारखं !

संजय धुरी
प्रथम वर्ष वाणिज्य

## चाफेकळी



होऊन चाफेकळी तू,
हलकेच मज स्पर्शावे !
स्पर्शुनी मनाला
तूच धुंद व्हावे !

होऊन कोकिळा तू,
मज गोड साद द्यावी
जुळवूनी शब्दांनी,
संसाराचे गीत गावे !

होऊन रजनी तू,
कवेत मज घ्यावे
सुर पैंजनांचे,
झंकारत तू यावे !

होऊन सावली तू,
मजसंगे असावे !
पाहता कुठेही,
तुझेच ग रुप दिसावे !

संजय धुरी
प्रथम वर्ष वाणिज्य

## असो ह्यो चाकरमानी

कोकणातलो झिलगो
शिकलेलो नायतर अडाणी

उचलल्यान आपला बोचक्या
की चललो मुंबयक
आवशे मावशेच्या खोलयेत
कसोतरी घुसमटून न्हवता

वरीस सा म्हैने हयथय भटाकता
पण नोकरी खयपन गावत नाय
आदीच थय कितीतरी बेकार
त्येंच्यात आणखी ह्येची येक भर

धा रुपड्यांचां रोजार
वशिल्यान टेंपरवारी न्हवता
खाणावळीतच त्येचो पगार जाता
शेवटी खिशात कायपण नसता

वरसा दोन वरसान गावात येता
झ्याकपाक कपडे घालून भाषा उडवता
दुसऱ्यान केलेला मी म्हणून सांगता
लोकांक वाटता पोर बापसाचा नाव काढता

चाकरमानी म्हणून कोणबी तेंका
चायपानी करुन देता
नोकरेक असूनबी गावातल्याका
कशाक कोण इचारता ?

मुंबयक जाताना त्येच्याकडे
तिकटाक पैसो शिल्लक नसता
मग मागून घरातल्यांकडे
मुंबयची तो वाट धरता

अशी अवस्था चाकरमान्यांची
तरीबी जो तो मुंबयक धावता
हातचा सोडून पळत्याची पाठ धरता
आमचा खुळचाचा कोण आयकता

**दत्तात्रय प्रभू**
द्वितीय वर्ष कला

## कालचक्र

रात्र होती रंगलेली मैफलीत धुंदलेली
साजशृंगार अंधारी शाल अंगी ओढलेली
तारकांची अंबरी पुष्प माला गुंफलेली
चंद्रपुष्पासंगे होती, माथी खोचलेली

दिसागणिक चंद्रपुष्प माथ्यावरून सरकवी
शाल अंगीची चारी दिशा पसरवी
लुकलुकत्या ताऱ्यांवर
अंधराज्ञीचे रात्री साम्राज्य असे वसवी

दाखविण्या अपुल्या अस्तित्वाचे अंश
कालचक्र करितसे चंद्रपुष्पास वश
भ्रमंतीची तयाच्या गती घटे अंश अंश
पुनरपी अस्तित्वास सोशी चौदा दिसांचा दंश

कलाकलाने ओसरे चांदण्याचा पिसारा
त्यावरी विराजे अंधारी दरारा
संधीप्रकाशा हटवी अमावास्येचा इशारा
द्विसप्तकांनी करी हा एकदा हुंकारा

अंधार चांदणे हे चक्र हरदिनी फिरे
नवनवीन साज ते लेवून राग अवतरे
स्वागतास उद्याच्या हळूच पुढती सरे
अंधारातूनी उमलते प्रकाश रूप साजिरे!

**दत्तात्रय प्रभू**
द्वितीय वर्ष कला

# जखम



मैफील संपली, सुर अजुनी न सरले
भैरवी सरली, परि अजून डोळे ओले ।।धृ।।

प्रारंभ जाहला मैफिलीस ज्यावेळी
मी कशी गुंतले कळले मजला नाही
गुंतता हृदय हे जग मी विसरूनी गेले ।।१।।

अनुरागालागी बहार आला जेव्हा
क्षणभंगूर यौवन कळे न मजला तेव्हा
नंदनवनी तारुण्याच्या मग मोर नाचुनी गेला ।।२।।

येता पहाटवारा घेऊन गारव्याला
उमलले कमलदल भृंगही उडूनी गेला
परतून कधीही न आला मी सर्वस्व हरवूनी बसले ।।३।।

मैफील ती सरता कैफही सारा सरला
ती वचने, आणा, शपथा साऱ्या विरल्या
इंद्रधनुपरि स्वप्नही माझे क्षणात विरुनी गेले
विरता विरता काळीज माझे जाळून सखये गेले ।।४।।

**विनायक ठाकूर**
द्वितीय वर्ष कला

# भावना



मानवाच्या हृदयांतरी
भावनांच्या नाना खुणा
पण अमर आहे त्यातही
प्रेमिकांची भावना

बेडरवृत्ती, मस्त धुंदी
याची तिथल्या जाती,
नकळे कशी, कुणाची
जुळतील कुणाशी नाती

जाणही त्यांना नसते
इथल्या वास्तवतेची
भाषा तिथली असते
ती नेत्रकटाक्षाची

मग कधी कुणाला मिळते
नशिबाची साथ,
पण, कधी कुणावर पडतो
दुर्दैवाचा हात.

मनामनांतून उठतात
कितीतरी कल्पना
पण, अमर आहे त्यातही
प्रेमिकांची भावना.

**प्रकाश पाटणकर**
द्वितीय वर्ष कला

## लाट

जशी येते समुद्राच्या भरतीची
प्रचंड लाट
तशीच येते निवडणुकीत
आश्वासनांची लाट
पहिल्या लाटेसरशी येते जशी
मूठभर वाळू
पण दुसऱ्यात जनता सारी
केव्हाही लागे जळू
घोषणा आणि आश्वासने निवडणुकीत
मार्गी पाहे दिनदुबळे
तेव्हा फुटे पाझर माणुसकीला
गाडीत मन हळहळे
पण, निवडूनी येता सत्ता मिळता
होतो आम्ही धुंद
लोभापायी सारी बुद्धि
होते कर्तव्यच्यूत

**संजय धाडी**
तृतीय वर्ष वाणिज्य

## विकास करून घेवूया

ह्यो माझो देवगड तालुको
विकासान समृद्ध नसलेलो
पण विविधतेने नटलेलो
आपलो बारको चिमुकलो
कसो हा तो कोणाकच म्हायती नाय !

सरकार तर लक्षच देत नाय
कोणच हय बगतबी नाय
मग हय विकास होतलो कसलो ?
ह्या माझ्या देवगडात . . . .

जर लवकर रेलवी इली असती
तर लय बरा झाला असता
आधी खयबी लवकर जावक मिळाला असता
लोकांका एक फायदाच झालो असतो !

ह्या देवगडच्या सगळ्या भागात
काय नाय असा म्हणूकच नुको
हा हय लोखंड हा हय पेट्रोल
पण बगता कोण ?
विकास करुक सरकार काय नुको
मग हय दिसतलाय काय ?

म्हणूनच ह्यचो विकास
होत नाय बगा झकास !
काय सरकाराक सांगूचा
कसा ता समजतच नाय . . . . .

म्हणूनच आता सगळ्यांका सांगतय
एकजुटीन पुढे येवया
सरकारक मालवणीवाल्यांचो
दाखवया चांगलोच हिसको
आणि करुन घेवया विकास देवगडचो !

**श्रीकांत गावकर**
तृतीय वर्ष कला

## ग्रहण

पंजाबला ग्रहण लागले
ग्रासले भारताला
सुपीकतेची नापीक झाली
जमीन विटली रक्ताला.
मंदिर बनले युद्धभूमी
झाले शस्त्रांचे कोठार
दिनदुबळ्या पतितांचे
मुडदे पडती भर रस्त्यात.
माणूस झाला माणसाचा वैरी
उडवती गोळीबाराच्या फैरी
माणुसकीला मुकला माणूस
या आसुरी स्वप्नापायी
यवनांना फितूर होऊनी
लाथाडती या मायभूमीला
पेटवूनी प्रांतवाद हा
तेल ओतती जातीयवादी
फुंकर घालण्या सदैव असती
दळभद्री हे राजकारणी
क्षणोक्षणी ही भडके आग
तरी कुणाला नसे जाग
कधी सुटणार हे कलंकी ग्रहण
नकळे मजला आज ।।

**संजय धाडी**
तृतीय वर्ष वाणिज्य

## प्रवासी



मी एक प्रवासी
प्रवास करता करता फक्त
रस्ते बदलत राहिलो.
नशिबात लिहिले होते म्हणून
तसाच चालत राहिलो.
फुलासारखा नाजूक हात
माझ्या खांद्यावर होता.
मात्र माझे पाय निखाऱ्यावरूनच
चालत राहिले !
या माझ्या न संपणाऱ्या प्रवसात
तोच एक प्रकाश होता.
स्वत:चे डोळे तिने दिवे म्हणून
दिले होते.
ती आली कोठून, गली कोठे ?
हे मला कळलेच नाही.
मात्र साऱ्या आयुष्यभर
मी हळहळतच राहिलो.

**पंढरीनाथ शिरवडकर**
प्रथम वर्ष कला

# अमृताचा स्वाद !



प्रकाशाच्या सागरात
    अंधाराचे बेट आहे.
जाई जुईच्या बागेत
    कंटकाची वाट आहे.
रजनीच्या प्रासादात
    स्वप्नातले भूत आहे.
मिलनाच्या आवेगाला
    संशयाचा तट आहे.
मदोन्मत्त यौवनात
    वार्धक्याची झाक आहे.
जीवनाच्या समाधीत
    मरणाची हाक आहे.
प्रकाशाच्या सागरात
    अंधाराचे बेट आहे.
तरीही, मुक्ततेच्या फळात
    अमृताचा स्वाद आहे !


**पंढरीनाथ शिरवडकर**
प्रथम वर्ष कला

# सत्याच्या शोधात

सत्याच्या शोधात जेथे तू होतास
    तेथूनच तुला दूर फेकले गेले
आरोप प्रत्यारोप लादले गेले
    जहरी शिक्षेचा तुला बळी केला
ज्या ठिकाणी तुझा जन्म झाला
    तेथेच तुला दोषी ठरविले
सत्य, हे असत्य मानले गेले
    त्याचे कारण . . . . ?
तुझा वाली कोणी नसल्याने
    तू स्वतः दुबळा असल्याने
लोकांनी तुला पायदळी तुडविले
    परंतु सत्य पटल्यावरती
तेच लोक तुला डोक्यावर घेऊन नाचले
    तुझ्यावर फुलांचा वर्षाव करू लागले
मात्र तुझे शव पडले तेव्हा
    सुगंधी फुले वहाया लागले
तुझी पूजा करू लागले
    तुझी स्तोत्रे गाऊ लागले !

**श्रीकांत गावकर**
तृतीय वर्ष कला


## स्नेहसंमेलन - छायावृत्त



प्रमुख पाहुणे
महाराष्ट्राचे विख्यात वक्ते
प्राचार्य शिवाजीराव भोसले.



प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करताना
संस्थेचे सभापती
श्री. अमृतराव राणे




व्याख्यान ऐकण्यात तल्लीन झालेला श्रोतृवृंद

# स्नेहसंमेलन - छायावृत्त



चांदणे शिंपीत जा.
←



रंगले कोळी नृत्य
←



↑
भांगडा



↑
कु. नंदा निकम
वैयक्तिक नृत्य-प्रथम क्रमांक

## स्नेहसंमेलन - छायावृत्त




तीन एकांकिका

मन्या सज्जना !

दि मेन विदाऊट शॅडोज





मिसेस चौधरी चंद्रावर जातात

मुरळी नृत्य



# केल्याने देशाटन . . .




## महाविद्यालयाची पन्हाळा सहल

भीमथडीहुनि चहुंमुलखांवर फिरले
धारकरी ।
भीमथडीवर चहुंमुलखांतुनि जमले
वारकरी ।

## वारणा बझारला भेट

' विना सहकार नही उद्धार '






## इतिहास विभागाची रायगड भेट

करी रायगड रायरिचा तो
जिजाईचा तान्हा !
कोंडाण्याचा करी सिंहगड
मालुसरा तान्हा !

# भेटीगाठी




देवगडचे सरपंच श्री. बाळासाहेब ढोके
पुस्तक संच वितरण समारंभप्रसंगी
←


उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीचा पुरस्कार
मिळविलेल्या डॉ. आठवले यांचा
सत्कार करताना प्राचार्य →




वार्षिक पारितोषिक वितरण
समारंभप्रसंगी देवगडचे आमदार
श्री. आप्पासाहेब गोगटे
↓



# निरोप



प्राचार्यांसमवेत तृतीय वर्ष कला विद्यार्थी



प्राचार्यांसमवेत तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थी

सामाजिक क्रांती जवळ आणणारे
वाङ्मय लेखकांच्या हातून निर्माण होणार
नाही असे नाही, पण त्या आधी एक क्रांती
होणे आवश्यक आहे. ती क्रांती आम्हां
लेखकांच्या हृदयांत व्हायची आहे !

–वि. स. खांडेकर

# कनिष्ठ विभाग

# असमतोल : पर्यावरणाचा . . . काही टिप्पणे

## १) हवेचें प्रदूषण

**वर्षा जोशी**
**बारावी वाणिज्य**

**" अणूतून मुक्त झालेल्या शक्तीनं सगळं काही बदललं आहे ! "**

चमचमणाऱ्या चांदण्यांनी भरुन गेलेलं आकाश रात्रीच्या वेळी पहात बसणं हा अतीव आनंदाचा अनुभव असतो. या चांदण्या म्हणजे जिचा अंत लागत नाही अशा विश्वाच्या पोकळीत असणारे तारे. सूर्य हा असाच एक तारा. सभोवती ग्रहगोलांनी धरलेला फेरा.

सूर्याला जशी ग्रहमालिका आहे तशी या आकाशगंगेतल्या, या विश्वातल्या दुसऱ्या एखाद्या ताऱ्याला आहे का, या गोष्टीचं माणसाला फार कुतूहल आहे. साहजिकच आहे ते ! कारण . . . माणसाला परग्रहावरच्या जोडीदाराला भेटण्याची उत्कट इच्छा आहे.

पण माणसाच्या दुर्दैवानं अजून त्याला आपला जोडीदार सापडलेला नाही. माणसासारखा जोडीदारच काय, पण अगदी प्राथमिक अशा प्रकारची जीवसृष्टी असेल असं वातावरणही त्याला अन्यत्र कुठे आढळलेलं नाही. आपल्या सूर्यमालेत तर नाहीच नाही.

या सृष्टीतील विविध वायूंचे चक्र, पाण्याचं चक्र इ. सर्व गोष्टींची माहिती माणसाला आता कुठं होऊ लागली आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, ही सर्व माहिती माणसाला मिळत आहे ती या गोष्टींचा विध्वंस करीत ! एखाद्या मुलानं यांत्रिक खेळणं कसं काम करतं हे पाहण्यासाठी म्हणून ते उघडून-उचकटून पार मोडून टाकावं, तसं माणसाचं झालं आहे. आपल्या न संपणाऱ्या गरजा भागवताना आपण किती प्रचंड नुकसान करीत आहे आणि त्यातून मुळावरच घाव कसा बसत आहे हे पाहण्यासारखं आहे.

कर्ब–द्वि–प्राणिल वायू हा मानव आणि इतर प्राण्यांच्या दृष्टीनं एक निरुपयोगी वायू आहे. असं शाळेपासून आपल्याला शिकवलं गेलं आहे. नुसता निरुपयोगीच नव्हे, तर 'घातक' आहे असंही आपण शिकलो. हे म्हणणं चुकीचं नसलं तरी हा वायू तितकाच उपयोगीही आहे, हे मात्र आपल्याला कधीच सांगितलं गेलं नाही. पृथ्वीवरचं तपमान हे बरचसं या वायुच्या वातावरणावरील प्रमाणावर अवलंबून आहे. त्यामागचं शास्त्रीय तत्त्व थोडक्यात असं : सूर्यामुळे जी उर्जा आपल्याला मिळते ती लघु तरंग–लांबीची असते. कर्ब-वायू ती थेट पृथ्वीवर येऊ देतो. पण त्याचबरोबर पृथ्वी जी दीर्घ तरंग–लांबीची उर्जा प्रक्षेपित करते ती मात्र या कर्बवायू कडून अडवली जाते. त्यामुळे कर्बवायू नसता तर पृथ्वीचं जे तपमान असतं, त्यापेक्षा खूपच जास्त तपमान सध्या आहे.

पण गेल्या शतकाच्या मध्यापासून औद्योगिकरणानं वेग घेतल्यानं, तसेच जंगलं जाळून अधिकाधिक जमीन

शेतीसाठी वापरण्यात येऊ लागल्यानं कर्बवायूचं प्रमाण सतत वाढतच आहे. १८५० या वर्षी १ लाखात २६ भाग एवढं असलेलं हे प्रमाण सध्या लाखात ३४ भाग तर्क होईल. नुसत्या संख्येचा विचार केला तर हे प्रमाण फार नाही असं कुणालाही वाटेल. पण त्याचे परिणाम किती व्यापक होतील हे पाहण्यासारखे आहे.

कर्बवायूच्या या वाढीमुळे पृथ्वीवरचं तपमान सरासरी ३° सेल्सिअसनं वाढेल–विषुववृत्तापाशी १° से. तर ध्रुवापाशी ७° से.! यामुळे पृथ्वीवरचं पावसाचं मान खूपच बदलेल. सध्या प्रचंड धान्योत्पादन करणारे अमेरिका, रशियातील युक्रेन यांसारखे भाग हे दुष्काळी होतील. सध्या वाळवंटी असणारे आफ्रिकेतले आणि भारतातले बरेचसे भाग मात्र पावसाचं प्रमाण वाढून धान्याची कोठारं होतील.

तपमानवाढीचा मुख्य परिणाम होईल तो समुद्राची पातळी वाढण्यात. उत्तर ध्रुवावरचं बर्फ वितळून समुद्राची पातळी ५ ते ७ मीटरनं वाढेल. यामुळे कॅलिफोर्निया, मेक्सिको आफ्रिकेतील किनारी देश, भारताचे पूर्व–पश्चिम किनारे, हॉलंडसारखे देश हे सर्व समुद्रांकडून गिळले जातील! दक्षिण ध्रुवावरचं बर्फ लगेच वितळणार नाही, पण त्याची एकसंधता संपून प्रचंड आकाराचे हिमनग पाण्यातून वाहू लागतील. एक दोन शतकांत तेही वितळून आणखी काही जमीन पाण्याखाली जाईल.

भोगवस्तूंचं प्रचंड प्रमाणात उत्पादन करण्यासाठी प्रचंड प्रमाणावर इंधन लागतं. कारखान्यांत आणि औष्णिक वीज निर्मिती केंद्रात इंधन जाळल्यावर जसा कर्बवायू बाहेर पडतो, तसेच गंधकवायू आणि नत्रवायूही बाहेर पडतात. पावसाच्या पाण्यात ते मिसळतात व त्यांपासून गंधकाम्ल आणि नत्राम्ल तयार होतं. पावसाच्या पाण्याबरोबर ही आम्लं खाली येतात. या आम्लांची जमिनीतल्या पोषक द्रव्यांशी रासायनिक क्रिया होते आणि या द्रव्यांचं निरुपयोगी द्रव्यांत रूपांतर होतं. तसंच विविध धातूंशीही या आम्लयुक्त पावसाची रासायनिक क्रिया होऊन ते गंजतात. मथुरेच्या तेलशुद्धीकरण कारखान्याचा परिणाम ताजमहालाच्या संगमरवरावर होत आहे.

आम्लयुक्त पाण्यामुळे झाडांची पानं मोठ्या प्रमाणावर गळतात व त्यांची वाढही खुंटते. त्यांच्यावर किडीचा परिणामही लवकर होतो. मध्य युरोपातील अनेक जंगलं अशा पावसानं नष्ट झाली आहेत. हेच आम्लयुक्त पावसाचं पाणी नद्या, तळी यांत जातं. त्यामुळे अनेक प्रकारचे मासे मरतात. काही वनस्पती मात्र आम्लयुक्त पाण्यात अधिक जोमानं फोफावतात. अशा वनस्पतींनी तळी भरून जाऊन त्यांचं संतुलन बिघडतं. अशा या आम्लयुक्त पावसाची परदेशांत निर्यातही होते. ब्रिटनमध्ये कोळशाचं उत्पादन खूप असल्यानं तिथं कोळशावर चालणारी औष्णिक वीज निर्मिती केंद्रंही बरीच आहेत. या केंद्रांमधून बाहेर पडणाऱ्या कर्ब–गंधक व नत्रवायूंची निर्यात वाऱ्याच्या प्रवाहांमुळे नॉर्वे व स्वीडन या देशांत होते. खुद्द नॉर्वेतल्या प्रदूषणापेक्षा हे आयात झालेलं प्रदूषण अधिक असतं.

कीटकनाशकांच्या हवेतून केल्या जाणाऱ्या फवारणीचे परिणामही घातक होतात. ही कीटकनाशकं जिथं तयार केली जातात ते कारखाने हेही पर्यावरणाला धोकादायक असतात. १९८५ च्या डिसेंबरात घडलेली भोपाळ दुर्घटना भारत कधीही विसरू शकणार नाही. मुंबईचा चेंबूर भाग तेलशुध्दीकरणाच्या व इतर कारखान्यांमुळे 'गॅस चेंबर' बनल्याचं आपण गेली कैक वर्षं वाचतो – ऐकतो – अनुभवतो आहोत. या कारखान्यांमधूनही अनेकवेळा क्लोरिन व इतर घातक वायूंची गळती झाली आहे. पृथ्वीच्या पृष्ठापासून २० ते २६ कि. मी. या पट्ट्यात ओझोन वायूचा थर आहे. अवकाशातून येणाऱ्या घातक अतिनील किरणांना थोपवणारं हे कवच आहे. या वायूचे शत्रू म्हणजे क्लोरिन आणि नत्रवायू कारखान्यांतून हे वायू हल्ली मोठ्या प्रमाणावर हवेत सोडले जातात. ओझोनचं प्रमाण कमी झालं तर अतिनील किरणं पृथ्वीपर्यंत पोहोचून त्वचेच्या कर्करोगाचं प्रमाण वाढेल; प्राणी आंधळे आणि नपुसक होतील.

प्रगतीचं एक मोजमाप म्हणून मोटारगाड्यांची दरमाणसी संख्या सांगितली जाते. अमेरिका, जपान आणि काही युरोपीय देश यांत हे प्रमाण २–३ माणसांमागे एक गाडी इतकं पडतं. या मोटारींच्या

पेट्रोलमधे 'टेट्रा एथिल लेड' हे द्रव्य मिसळलेलं असतं. त्यामुळे पेट्रोलचं ज्वलन चांगलं होतं. पेट्रोल जळल्यावर त्यातलं शिसं धुरातून बाहेर पडतं. दरवर्षी असं २,२५,००० टन शिसं वाहनांच्या धुरातून बाहेर पडतं. पाश्चात्य देशांत याविरुद्ध लोकमत संघटित झाल्यामुळे तेल कंपन्यांना पेट्रोलमधील शिसं कमी करणं भाग पडलं. शरीराच्या प्रत्येक किलोग्रॅम वजनामागे दर दिवशी ६ मायक्रोग्रॅम शिसं चालू शकतं असं तज्ज्ञ म्हणतात. मुलांच्या बाबतीत हे प्रमाण आहे १.२ मायक्रोग्रॅम. वारा नसेल किंवा खूप थंडी, धुकं वगैरे असेल तर यापेक्षाही प्रचंड प्रमाणात शिसं रक्तात जातं. शिशाचा दुष्परिणाम मज्जासंस्थेवरही होतो. तसेच वाहनांच्या धुरातील कार्बन-मोनॉक्साइड (Co) वायू, कार्बन डायॉक्साइड ($Co_2$) बनण्याच्या प्रयत्नात रक्तातला प्राणवायू शोषून घेतो.

शांततामय सहजीवनाऐवजी युद्धखोरी हे जडवादी विचारसरणीचं महत्त्वाचं लक्षण आहे. माणसामधे हिंसक प्रवृत्ती प्रथम पासून असली, तरी त्या प्रवृत्तीला जडवादी विचारसरणीनं आणि 'तांत्रिक प्रगती' नं किती भयंकर पातळीला नेलं आहे हे 'रासायनिक युद्ध' आणि अणुयुद्ध या प्रकारांवरून दिसून येईल. पैकी पहिल्या प्रकारचं युद्ध व्हिएटनाममधे खेळलं गेलं असल्यानं त्याचे भयंकर परिणाम सर्व जगानं पाहिले आहेत. अमेरिकनं व्हिएटनामवर अनेक घातक रासायनिक द्रव्यं विमानांतून फवारली. या विषांमुळे पिकं आणि झाडं लगेच जळून गेली. पाणीही विषमय होऊन सर्व मासे मेले. मानवी गर्भात विकृती निर्माण होऊन गर्भपाताचं प्रमाण वाढलं. जी दुर्दैवी बालकं जन्माला आली, त्यांच्यात तीन पाय असणं, एकच डोळा नाकाच्यावर असणं, दोन डोकी असणं, हिरड्या नसणं, हृदय दुर्बल असणं अशा असंख्य विकृती होत्या. एकूण १० वर्षांच्या काळात ७ कोटी टन विष व्हिएटनामवर फवारलं गेलं. युद्धानंतर व्हिएटनामी लोकांच्या नशिबी आलेल्या विपन्नतेची कल्पनाही करता येणार नाही! हवा ही सर्व प्राणिमात्राची अगदी प्राथमिक गरज आहे. त्या हवेचं इतक्या प्रचंड प्रमाणावर विविध मार्गांनी आपण प्रदूषण केलं आहे की, विचारता सोय नाही. केवळ एकच गोष्ट अजून शिल्लक राहिली आहे—अणुयुद्ध. त्यावेळी काय होईल याची ही झलक :

अणुयुद्धाची एक लहानशी चुणूक हिरोशिमा व नागासाकिच्या रुपात सर्वांनी अनुभवली आहेच. त्यावेळी जो 'लिटल बॉय' नावाचा अणुध्वम् वापरला होता त्याची शक्ती होती १३ किलोटन; म्हणजेच ०·०१३ मेगॅटन. जगात आजच्या घटकेला असणाऱ्या अण्वस्त्राची शक्ती आहे, या लिटल बॉयच्या १२ लक्ष पट : १५,००० मेगॅटन ! ही शक्ती सर्व पृथ्वीचा विध्वंस करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या शक्तीच्या कैक पटीनं अधिक आहे.

यातली १ टक्के अण्वस्त्रं जरी वापरली गेली तरी त्यांतून पृथ्वीवर हिमयुग प्रारंभेल. कारण त्यांच्या स्फोटातून धूर धूळ, राख, इतर कचरा आणि इतर वस्तूंचे अवशेष हे इतक्या प्रचंड प्रमाणावर हवेत पसरतील की, सर्वत्र सूर्यप्रकाशाऐवजी भयाण अंधार पसरेल. अनेक महिने हा अंधार टिकेल. झाडांना सूर्यप्रकाश न मिळाल्याने प्रकाश-संश्लेषणाची क्रिया पूर्णपणे थांबेल. म्हणजेच प्राणवायूंचा पुरवठाही उबदार उन नसल्यानं तपमान शून्याखाली २०° ते ४०° से. असेल.

या हिमयुगात गोठून बरीचशी लोकसंख्या मरेल. उरलेल्यांना मेलेल्यांचा हेवा वाटेल, कारण मृत्यूनं त्यांची सुटका न केल्याने यमयातना सोसण्याचं दुर्भाग्य त्यांच्या नशिबी असेल. त्यांना शुद्ध हवा—पाणी-अन्न काही-काही मिळणार नाही. किरणोत्सर्जनामुळे अनेक रोग त्यांना होतील.

एक भयाण भेसूर भीषणता या पृथ्वीवर पसरेल. अन् त्या वेळी जिवंत असलेल्या माणसांना समजेल की, विश्वातल्या अब्जावधी ग्रहगोलांना जे भाग्य लाभलं नव्हतं, ते या प्रगत जीवसृष्टीचं भाग्य या पृथ्वीला लाभलं होतं. या जीवसृष्टीचा तीच एकमेव आधार होती. माणूस हा या जीवसृष्टीचा परमोच्च बिंदू होता; पण त्याला मात्र ही गोष्ट समजूनही उमजली नाही. प्रचंड हाव, सत्तापिपासा या आसुरी वृत्तींपायी त्यानं हा मूलाधारच नाहिसा केला.

अन् मग आजूबाजूची उद्ध्वस्त संस्कृती आणि जळलेली–चिधड्या झालेली प्रेतं पहात ते मृत्यूची वाट बघत बसतील !

'आइनस्टाइननं म्हटलं आहे– 'अणूतून मुक्त झालेल्या शक्तीनं सगळं काही बदललं आहे; बदललेली नाही ती आपली विचार–प्रणाली. जर मानवजात वाचायची असेल, तर एका पूर्णपणे नव्या विचारसरणीची आता आवश्यकता आहे.'

ही विचारसरणी म्हणजे अर्थातच एकात्मतेची, बंधुत्वाची, स्नेहभावाची, सहकार्याची विचारसरणी. आपण ती किती आचरतो यावरच सगळं काही अवलंबून आहे.

## २) पाण्याचे प्रदूषण


…ाता मेस्त्री
अकरावी वाणिज्य


**"समुद्री चहुकडे पाणी, पिण्याला थेंबही नाही."**

कोणे एके काळी पृथ्वीवरची माणसंसुद्धा इतकी न्यायी, दयाळू, वत्सल होती म्हणे ! सर्व भूतमात्रांविषयी त्यांना प्रेम होतं. आपल्या इतकाच त्यांनाही जीव प्रिय आहे असं सर्वजण मानीत. ही सृष्टी केवळ माणसांसाठी त्यातल्या एखाद्या गटासाठी नाही; इतर प्रत्येक जिवाचा तिच्यावर मानवाइतकाच अधिकार आहे, असंही ही माणसं मानीत म्हणे ! सर्वांविषयी त्यांच्या अंतरी आत्मौपम्यभाव होता म्हणे ! पण आज . . .

मानवानं या समुद्रात ओतली आहे अणुशक्ती केन्द्रातली किरणोत्सर्गी राख ! दुसऱ्या महायुद्धानंतर अणुशक्तीचा उपयोग खूप मोठ्या प्रमाणावर केला जाऊ लागला. अणू–इंधन वापरून झाल्यावर जी राख उरते, तीही किरणोत्सर्गी असते. तिचं काय करायचं, ती कुठं ठेवायची असा प्रश्न शास्त्रज्ञांना पडला. त्यांनी तो भारतीय पद्धतीनं सोडवला–म्हणजे घरातला कचरा रस्त्यावर टाकून ! ही सगळी राख त्यांनी मोहोरबंद टाक्यांत भरून समुद्रात टाकून दिली. या गच्च बंद केलेल्या टाक्या पुढे फुटल्या–गळू लागल्या, ही गोष्ट वेगळी.

तेलशुद्धिकरणाचे कारखाने हे बहुधा सागरकिनारी उभारले जातात. त्यांच्या गटारांतून वाहणारी रासायनिक द्रव्यं समुद्रालाच जाऊन मिळतात. कारखान्यांतल्या साठवणीच्या टाक्या गळू लागल्या तर त्यातलं तेलही समुद्रातच जातं. दरवर्षी असं सुमारे २ लक्ष टन तेल समुद्राचं प्रदूषण करतं.

तेलवाहू जहाजांची गळती आणि अशा जहाजांना होणारे अपघात, यामुळेही सागर–पृष्ठावर तेल पसरतं. विस्तृत पृष्ठभागावर तेल पसरण्यामुळे खालच्या पाण्याचा हवेशी संपर्क तुटतो. त्यामुळे पाण्यात मिसळणाऱ्या प्राणवायूचं प्रमाण खूपच कमी होऊन जलचर आणि पाणवनस्पती गुदमरतात. तेलातील काही रासायनिक घटक घातक असतात, ते सागरी जीवसृष्टीचा नाश करतात.

आकाशातून पडलेलं बरचसं पाणी विविध मार्गांनी समुद्राला जाऊन मिळतं. हे सगळे जलप्रवाह माणसानं प्रदूषित करुन टाकले आहेत. नद्यांच्या तीरावर वसलेली शहरं दिवसेंदिवस फुगू लागली आणि त्यांनी आपली सर्व घाण नद्यांमध्येच सोडायला प्रारंभ केला.

शहरं म्हटली की कारखाने आलेच. या कारखान्यांमधून अनेक रसायने धातुंची संयुगं अशा घातक गोष्टी नद्यात सोडल्या जातात. पारा, शिसं, कॅडमियम, असेनिक इ धातू ( heavy metals ) पाण्यातील जीवनचक्रात समाविष्ट होतात. भक्षकांच्या प्रत्येक वरच्या स्तरात त्याचं प्रमाण वाढत जातं. जपानमध्ये, १९५० मध्ये अशी एक घटना घडली की, किनाऱ्यालगत असणाऱ्या एका कारखान्यानं पाऱ्याची संयुगं असलेली द्रव्यं गटारांतून समुद्रात सोडली. ती वनस्पतींच्या माध्यमातून माशांच्या

शरीरांत गेली. हे मासे खाण्यात आल्यामुळे 'मिनामाटा' नावाचा रोग होऊन ३५०० लोक मेले. हल्ली शहरांतून घरोघरी कपडे धुण्यासाठी 'डिटर्जंट साबण' वापरले जातात. त्यातील फॉस्फेट्स जेव्हा धुण्याच्या पाण्याबरोबर वाहून जाऊन नद्या, तळी समुद्र यांना जाऊन मिळतात, तेव्हा पाणवनस्पतींना त्यांचा खतासारखा लाभ होतो. यामुळे त्यांची संख्या प्रचंड प्रमाणावर वाढते.जेव्हा या वनस्पती मरतात, तेव्हा त्यांच्या कुजण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर प्राणवायू लागतो. यामुळं पाण्याची, प्राणवायूची गरज वाढते. परिणामतः पाण्यातला प्राणवायू संपतो आणि बाकीचे जीव त्याअभावी मरून जातात. न्यूयॉर्क शहर आणि न्यूजर्सी संस्थानांच्या प्रदेशांतून दरवर्षी अशी एक कोटी टन द्रव्यं समुद्रात सोडली जातात. त्यामुळे १२०० वर्गमैल क्षेत्रफळांतील मासे आणि इतर जलचर सागराच्या एकूण प्रदूषणांपैकी सुमारे ८५ टक्के प्रदूषण हे मानवानं जमिनीवर चालवलेल्या उद्योगांमुळें होतं. यात मुख्य वाटा आहे शेतीत वापरल्या जाणाऱ्या खतं आणि कीटकनाशकांचा. सर्व जीवन या कीटकनाशकांनी किती विषमय केलं आहे पहा.

१९८१ मधें जगात कीटकनाशकांमुळे विषबाधा होण्याचे ७,५०,००० अपघात झाले. एकूण उत्पादनांपैकी केवळ १५ टक्के कीटकनाशकांचा उपयोग तिसऱ्या जगातील देशांत होतो. पण विषबाधेच्या अपघातांपैकी ५०टक्के आणि मृत्युपैकी ७५टक्के वाटा या देशांचा आहे!

भारताप्रमाणंच तिसऱ्या जगातल्या आणि आफ्रिकेतल्या अनेक गरीब देशांत हिच परिस्थिती आहे. एकीकडे अज्ञान, निरक्षरता यांमुळे घातक रसायनांचा उपयोग कसा करावा हे न समजून पाण्याचं प्रदूषण होत आहे, तर दुसरीकडे दारिद्र्य, प्रचंड लोकसंख्या यांमुळे हेच पाणी वापरण्याशिवाय जनतेला गत्यंतर नाही. जे पाणी पिण्यासाठी वापरायचं, त्यातच मलमूत्राचं विसर्जन करायचं, जनावरं धुवायची, अशानं रोगराई पसरते. तिसऱ्या जगात अशुद्ध पाण्यामुळे रोगग्रस्त असणाऱ्यांचं प्रमाण भयावह आहे. डोळ्यांचे विकार आणि आंधळेपणा ५० कोटी, हिवताप–८० कोटी, हत्तीरोग–२५ कोटी याशिवाय इतर रोग म्हणजे पटकी, कावीळ, कुष्ठरोग' पिवळा ताप व विषमज्वर. सर्वात भयंकर रोग म्हणजे हगवण! दरवर्षी ६० लक्ष मुलं हगवणीनं मरतात. हे प्रमाण दर ताशी १००० एवढं आहे.

जागतिक आरोग्य संघटनेनं १९८१ ते ९० हे आरोग्य दशक म्हणून अंमलात आणायला प्रारंभ केला आहे. अब्जावधी लोकांना आरोग्य प्रदान करणारी ही योजना आहे. तिचा खर्च बराच आहे. जगातील राष्ट्रं अवघ्या २१ दिवसांत शस्त्रास्त्रांवर जो खर्च करतात, त्या रकमेत या योजनेचा संपूर्ण खर्च भागेल ! पण . . . .

नेहमीप्रमाणे सगळ्या चांगल्या गोष्टी घडण्याच्या आड एक 'पण' येतो. माणसाची भोगवादी प्रवृत्ती. खतं, कीटकनाशकं यांच्या सहाय्यानं त्यानं निसर्गाशी चालवलेला लढा; शस्त्रास्त्र आणि युद्ध यांतून सत्तासमतोल साधण्याचा त्यानं चालवलेला वेडेपणा या सगळ्यामुळे पाण्यासारखी एक अत्यावश्यक गोष्टही शुद्ध, स्वच्छ, निर्मळ, नैसर्गिक स्वरूपात मिळणं अशक्य झालं आहे.

'ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी लेऊन' बसलेले ओहोळ व नद्याही आता नाहीत. आज जे काही वाहतं ते 'सांडपाणी' आहे. मग, ते आकाशातून पडणारं आम्लयुक्त पावसाचं पाणी असो वा पृथ्वीवरच्या नदी-नाल्यांतून वाहणारं खत, कीटकनाशकं, रासायनिक द्रव्यं यांनी दूषित झालेले पाणी असो ! पूर्वी 'समुद्री चोहीकडें पाणी पिण्याला थेंबही नाही' असं म्हटलं जायचं पण आज केवळ समुद्रातल्याच नव्हे; तर जगातल्या बहुतेक सर्वच पाण्याच्या बाबतीत हे खरं आहे असं म्हटलं तर चुकीचे ठरू नये!

# ३) जमिनीची धूप

**विद्या नलावडे**
बारावी कला

**" एका बीजा केला नाश ।
मग भोगिले कणीस ।।"**

' एका बीजा केला नाश । मग भोगिले कणीस ' असं तुकोबांचं एक वचन आहे. उच्च अशा आत्मिक आनंदासाठी किरकोळ भौतिक सुखाचा त्याग करावा लागतो असा या वचनाचा अर्थ असला तरी वाच्यार्थही तितकाच महत्त्वाचा आहे. एक बी जमिनीत पेरावं अन् चार महिन्यांनी पहावं तर त्यातून शेकडो बीजे असलेलं कणीस धरलेलं असतं. यांत्रिक आणि तांत्रिक प्रगतीची प्रौढी मिरवणाऱ्या विसाव्या शतकातल्या मानवाला अजून न उलगडलेला हा साधासुधा नैसर्गिक चमत्कार आहे.

हा चमत्कार ज्या अनेक कारणांमुळे घडून येतो त्यापैकी एक आहे जमीन. 'मातीमोल होणं' या सारख्या वाक्प्रचारांतून माती किंवा जमीन म्हणजे किंमत नसलेली गोष्ट असं सांगितलं जात असलं, तरी वस्तुस्थिती तशी नाही. सर्व जिवांचं भरण–पोषण करणारी ती जीवनधारी जननी आहे. आपल्याकडचा खेडूत तिला ' काळी आई ' म्हणतो ते काही खोटं नाही.

जमिनीचा वरचा सहा इंचाचा थर हा पृथ्वीवरच्या जीवनाच्या दृष्टीनं सर्वात महत्त्वाचा. असंख्य जीवजंतूंची वस्ती या थरात असते. एक हेक्टर क्षेत्रात सुमारे ३० कोटी जीवजंतू असतात. (ज्यात सूक्ष्मजीव अळ्या, किडे यांचा समावेश असतो.) वजनाचा विचार केला तर एक हेक्टर जमिनीत राहणाऱ्या जिवाणूंचं वजन ६००० कि. ग्रॅ. भरतं. दर हेक्टरी माणसांचं वजन काढलं तर ते अवघं १८ कि. ग्रॅम. असतं. वजनांच्या या प्रमाणावरून जमिनीतल्या जिवंतपणाचं प्रत्यंतर कुणालाही येऊ शकेल.

अन् हे प्रचंड संख्येनं असलेले जीव जमिनीत आहेत, म्हणूनच सर्व प्राण्यांचं जीवन सुरळीत चालू आहे. कारण, स्वतःचं अन्न स्वतःच तयार करणारा पृथ्वीवरचा जो एकमेव घटक–हिरव्या वनस्पती, त्यांना आवश्यक असणारी सगळी पोषक द्रव्यं हे जीवजंतू पुरवतात. हवेतला नत्रवायू जमिनीत स्थिरावणं, प्राण्यांचे व वनस्पतींचे मृतदेह कुजवून त्यांतली द्रव्य जमिनीत मिसळणं अशा अनेक मार्गांनी वनस्पतींना हवी असणारी द्रव्यं जमिनीत तयार करण्याचं आणि मिसळण्याचं काम हे जीव करतात. गांडुळासारखे प्राणी खालची माती वर आणून हे सर्व मिश्रण एकजीव करतात. या प्रक्रियांनाच जमिनीचा ' कस वाढणं ' असं म्हणतात.

जीवजंतूंच्या सांघिक प्रयत्नांतून ही प्रक्रिया सतत चालू असली तरी तिचा वेग मात्र फार कमी असतो. अगदी मुळच्या खडकांपासून कसण्याजोगी जमीन तयार व्हायची असेल, तर तिला १००० ते १०,००० वर्षं लागतात. अगदी पडीक किंवा हलक्या जमिनीचा कस सुधारायचा म्हटला तरी त्याला ४०–५० वर्षं लागतात. याच्या उलट त्याच जमिनीची धूप मात्र काही तासांच्या अवधीतही होऊ शकते. याला कारणीभूत अर्थातच मानव, म्हणजे तुम्ही-आम्हीच. कारण असं की, ही धूप होऊ न देण्याची निसर्गानं नीट योजना केली आहे, पण माणसाला ती मान्य नाही. आधी आपण यासंबंधीची काही आकडेवारी पाहू, अन् मग या धुपेची कारणमीमांसा करू.

नेपाळमधून प्रतिवर्षी २,५०,००० टन माती धुपली जाते नि गंगेला मिळते. हिमालयाच्या इतर भागांतूनही अशीच मोठ्या प्रमाणावर माती धुपली जाते. ही माती (गाळ) बंगालच्या उपसागरात नेऊन ओतली जाते. त्याठिकाणी ५० लक्ष हेक्टर क्षेत्रफळाचं एक नवीन बेट तयार होत आहे. जमिनीच्या धुपेचं सर्वात कमी प्रमाण, युरोपात आहे. वर्षाला १०० अब्ज टन माती तिथे धुपते. तर सर्वांत जास्त प्रमाण आहे आशियात, वर्षाला २५०० अब्ज टन, अमेरिकेतील जमिनीची धूप वर्षाला १०० अब्ज टनांहूनही अधिक आहे. आणि आकारानं अमेरिकेच्या (स. संस्थाने) एकषष्ठांश असलेला इथिओपियाही तेवढीच माती समुद्राला अर्पण करतो.

सध्याच्याच वेगानं जमिनीची धूप चालू राहिल्यास सन २००० पर्यंत आणखी जितकी जमीन लागवडीखाली येणार आहे. तिचं वाढीव उत्पादन हे जमीन धुपून गेल्यामुळे कमी झालेल्या उत्पन्नाची कशीबशी भरपाई करेल.

# केल्याने होत आहे रे....

**दया खाडिलकर**
अकरावी वाणिज्य.

पर्यावरणाचा समतोल ढळल्यामुळें जें अनेक वाईट परिणाम घडतात, ज्या समस्यांना तोंड दयावे लागते ती हाताळण्यासाठी पुढील अुपाय-योजनांची आवश्यकता आहे.

'चिपको' सारखी आंदोलने उभारुन प्रचंड प्रमाणावर चाललेल्या वृक्षतोडीला प्रथम आळा घातला पाहिजे. वृक्षरोपाचा कार्यक्रम युद्धपातळीवर हाती घेतला पाहिजे सर्वांनी यामध्ये सहभागीं होण्याची गरज आहे.

सर्व प्राणीमात्रांच्या जीवनाला प्राणवायू अत्यावश्यक आहे. तो आपणास वनस्पतीच्या उच्छ्वासांतून प्राप्त होतो. कारण वनस्पती आपले अन्न तयार करण्यासाठी कर्बद्विप्राणील वायू हवेतून शोषून घेतात. म्हणून प्राणवायू उपलब्धतेसाठी वृक्ष संवर्धनाची गरज आहे.

जमिनीवर जंगलाचे आच्छादन असल्यास पाऊस पडण्यास मदत होते. पावसाचे पाणी जमिनीत शोषले जाऊन ते भूपृष्ठाखालून वहाते. यामुळे पाण्याचे प्रदूषण कमी होते. पाणलोट क्षेत्राचे संरक्षण होऊन धरणाचे आयुष्य वाढेल. अपेक्षित विद्युत-निर्मिती होईल व त्यामुळे औदयोगिक विकासात खंड पडणार नाही.

खनिज, खनिजतेले, पाणी यांचे नैसर्गिक साठे पूर्णपणे न खर्चता त्यांचे जतन केले पाहिजे आणि ते साठे टिकवून ठेवले पाहिजेत.

इंधनासाठी मोठ्या प्रमाणावर जी जंगलतोड केली जाते ती थांबवून सौरशक्ती, वाऱ्यापासून मिळणारी उर्जा, सागरी लाटांपासून प्राप्त होणारी उर्जा, बायोगॅस इ. पासून इंधनाचे नवीन मार्ग शोधले पाहिजेत.

प्रत्येकाने आपल्या भोवतालच्या नैसर्गिक पर्यावरणाचे जतन केले पाहिजे. वने, नद्या, तळी यांचे प्राकृतिक स्वरुप टिकविले पाहिजे. पपशुक्षी, एकूणच जीवसृष्टीवरील आपण दयार्द्र असले पाहिजे.

यांत्रीकीकरण, औद्योगिकरण इ. कारणांमुळे पर्यावरणाचा समतोल ढळला आहे हे खरे असले तरी माणसाची वृत्ती बदलली आहे. जोवर माणूस निसर्गाच्या सहवासात रहातो तोवर त्याला निसर्गातील आपल्या स्थानाची जाणीव असते. आपण निसर्गाचा घटक आहोत असे त्याला वाटत असते. पण, आज मानव शरीरानेच नव्हे तर मनानेही निसर्गापासून दूर गेल्याने त्याचे व निसर्गाचे नातेच दुरावले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

पर्यावरणाचा ढासळणारा समतोल साधण्यासाठी आजच्या वाढत्या कारखानदारीला व औद्योगिकरणाला विरोध करून चालणार नाही. कारण विज्ञानावर आधारित मानवी विकासाचे चक्र आपण उलटच्या गतीने फिरवू शकणार नाही आणि ते तसे फिरवणे इष्टही नाही. वेदकाळात शेती, पशुपालन इत्यादीवर आधारित जी अर्थव्यवस्था होती, तिचा पुरस्कार करून पर्यावरणाचा समतोल साधू शकू असे म्हणणाऱ्यांच्या भोळेपणाची कीवच करावी लागेल. म्हणून आज आपण एवढेच केले पाहिजे की,

औद्योगिकरण करताना निसर्गसंपत्तीची धूळधाण होऊ नये. विज्ञानाच्या मदतीने मानवाने स्वतःचा विकास साधत असताना निसर्ग अविकृत राहिला पाहिजे; पर्यावरणाचे संतुलन राहिले पाहिजे याची खबरदारी घेणे हे आपले कर्तव्यच आहे.

पर्यावरणाचा ढळणारा समतोल राखण्यासाठी आज तर आपण दक्ष राहिलेच पाहिजे पण ज्या काळी ही समस्याच अस्तित्वात नव्हती, त्यावेळीही या बाबतीत किती सखोल विचार केला जात होता, हे वराहपुराणातील पुढील श्लोकांवरुन ध्यानी येते –

"यावत् भूमंडलात धत्ते,
सशैल वनकाननम् ।
तावत् तिष्ठंति मोदिन्यां,
संतति : पुत्र पौतृकी ।।
देहंते परमं स्थानम्,
यत सुरैरपित दुर्लभम् ।
प्राप्नोति पुरुषो नित्यं,
महामाया प्रसादत : ।।"

याचा अर्थ असा की–जोपर्यंत या धरतीवर पर्वत, वनसंपदा, सरोवरे आहेत तोपर्यंतच तुम्ही, तुमची मुले व तुमची नातवंडे सुखाने जगतील आणि ज्यांना हा विचार समजेल त्यांना महामायच्या (आदिशक्तीच्या) म्हणजेच निसर्गाच्या प्रसादाने देवदुर्लभ असे परमस्थान प्राप्त होईल.

हाच वारसा घेऊन आपण एकच खूणगाठ मनाशी नेहमी ठेवली पाहिजे, की भावी पिढ्यांसाठी या पर्यावरणाचे आपण विश्वस्त आहोत आणि कोणतेही विकासाचे पाऊल उचलताना आपल्याला याचा विसर पडता कामा नये.

# एडस् एक महाभयंकर रोग

**मधुबाला मुणगेकर**
अकरावी कला

Acquired Immune Deficiency Syndrome (AIDS)

Rock Hudson या Hollywood च्या सुप्रसिद्ध सिनेकलावंतास प्रथम एडस्ने मरण आले व त्यानंतर पाश्चात्य देशांत १९८० साली एका नव्या रोगाची नोंद झाली. झपाट्याने या रोगाचा जोर वाढत गेला. आता या रोगाने गंभीर स्वरुप धारण केले आहे व त्यामुळे सर्व आधुनिक जगात आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या रोगाची लागण झालेल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व लागण झालेल्या रोग्यांमध्ये मृतांची संख्या १०० टक्के आहे. ऑस्ट्रेलियात या रुग्णांचे प्रमाण दर दहा महिन्याला दुपटीने वाढत आहे. या रोगावर सध्या इलाज उपलब्ध नाही. शास्त्रज्ञांच्या प्रदीर्घ प्रयत्नांना अजूनही यश येत नाही. या रोगावरचा परिणामकारक उपचार अजूनही दृष्टिपथात नाही.

जगाला हलवून सोडणाऱ्या या रोगाची प्रथम नोंद लॉस एंजेल्स, न्यूयॉर्क येथे झाली. सेंटर फॉर डिसीज कंट्रोल, अँटलांटा, युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिकेच्या प्रकाशकांनी आपल्या महत्त्वाच्या अधिकृत अहवालात याचा उल्लेख Morbidity and Mortality Weekly Report (गंभीर व प्राणघातक आठवड्याचा अहवाल) असा केला आहे.

सुरुवातीला रुग्णांच्या छातीत बिघाड निर्माण होतो. त्याचे निदान, 'झपाट्याने वाढणारा छातीचा आजार' व 'न्यूमोसिस्टिम न्युमोनिया' असे केले जाते किंवा त्वचेचा कर्करोग जो झपाट्याने इतर अवयवांत पसरतो, त्याला 'कापोसीज सरकोमा' असे म्हणतात. रुग्णांची संख्या जेव्हा दिवसेंदिवस वाढू लागली, तेव्हा शास्त्रज्ञांचो संशोधनाची सुरुवात मोठ्या रुग्णालयांतून होऊ लागलो सर्व रुग्णांची प्रतिकारशक्ती सामान्य रेषेखाली घसरली होती. याच कारणामुळे उपचाराला रुग्ण प्रतिसाद देत नव्हते त्यांची प्रकृती उपचाराच्या नियंत्रणाखाली येत नव्हती. परिणामी बरेच रुग्ण दगावले.

थोड्याच दिवसात या रोगाला 'अॅक्वायर्ड इम्यून डेफिशियन्सी, सिंड्रोम, असे नाव देण्यात आले आणि लगेच 'एडस्' या संक्षिप्त नावाने हा रोग प्रचलित झाला. त्याचबरोबर समलिंगी संभोगी पुरुषांना या रोगापासून विशेष धोका असल्याचेही स्पष्ट झाले.

काळाबरोबर अनेक शहरांतून 'एडस्' या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याची नोंद होत गेली. इतर देशांप्रमाणे ऑस्ट्रेलियातही तुरळक घटनांची नोंद झाली. सिडने या शहराचा या ठिकाणी प्रामुख्याने उल्लेख करण्याचे कारण हे की, सिडने हे शहर दक्षिण गोलार्धामधील समलिंगी संभोग्यांची राजधानी मानले जाते.

या रोगाने पछाडलेले रुग्ण निदान झाल्यानंतर दोन महिन्यांच्या काळातच दगावू लागले. त्यामुळे या रोगाचे प्राणघातक स्वरुप लक्षात आले. सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अधिकाऱ्यांना त्यांच्यावरील प्रतिबंधाच्या जबाबदारीची जाणीव झाली.

रोगाचे कारण समजल्याशिवाय प्रतिबंधाची उपाययोजना करता येत नाही. संसर्गाचे स्वरुप व अज्ञात अवयव रचना यांचा शोध ही प्रतिबंध उपायांची गुरुकिल्ली असते. रोगजंतुमुळे हा रोग होतो. या समस्येचे उत्तर दोन वर्षातच मिळाले. अमेरिका व फ्रान्समधल्या संशोधकांनी हा रोगजंतू विभक्त करण्यात यश मिळविले. त्याला त्यांनी मोठे नाव दिले- "ह्युमन टी सेल लिम्फोट्रॉपिक व्हायरस टी टाईप थ्री" (Human T-cell Lymphotropic Virus Type III HTLV – III) किंवा फ्रेंचांनी पॅरिसमध्ये 'लिंफाडो व्हायरस' किंवा (एल्. ए. व्ही. द.) असे या रोगजंतूंना नाव दिले. हे दोन्हीही रोगजंतू एकच असावेत असे संशोधकांना वाटते. या नावातील विविधतेच्या गोंधळामुळे १९८६ साली त्यापूर्वीची सगळी नावे टाकून या रोगजंतुला 'ह्युमन इम्युनोसप्रेस्संट व्हायरस' किंवा (HIV–I) असे नाव आंतरराष्ट्रीय स्तराबर देण्यात आले. यात नवीन संशोधन होणे शक्य आहे. त्यात फरक आढळून आला तर त्याबद्दल II व III हे आकडे जोडता यावेत म्हणून 'I' या आकड्यांची नावापुढे योजना करण्यात आलेली आहे.

पाश्चात्य देशांत हा रोगजंतू व त्याचे अस्तित्व नवीन असले तरी आफ्रिकेतल्या माकडांत हा रोगजंतू बऱ्याच वर्षांपासून सुप्तावस्थेत अस्तित्वात होता, असे संशोधनातून आढळून येते. माकडांतून हळूहळू मानवांत त्यांचा प्रसार झाला. मूळ रोगजंतु HTLV–I हळूहळू जसजसा झायरे व हायतीतील नीग्रो लोकांत पसरत गेला तसा त्या रोगजंतूतही बदल होत गेला. हायती हे न्यूयार्क मधील समलिंगी संभोग्यांचे आश्रयस्थान आहे. तेव्हा त्या रोगाचा प्रसार अमेरिकेत न्यूयॉर्कमध्येही झाला व पश्चिम किनाऱ्यावरील शहरांत व कॅलिफोर्नियातही झाला. तेथून सरळ आफ्रिकेतून या रोगाचा प्रसार युरोपमध्ये झाला. युरोपमधे वाढत्या प्रमाणात या रोगाची नोंद झाली आहे.

बाह्यवरणामुळे व आंतरगाभ्यामुळे या रोगजंतुला 'रीट्रोव्हायरस' या नावाने संबोधले जाते. रोग्याच्या दुषित वीर्यामधून साथीदाराच्या इंद्रियामधे या रोगजंतुंचा प्रवेश होतो. तेथून त्याचा शरीरात प्रवेश होतो. अशा रीतीने या रोगाचा प्रसार होतो. गुदद्वाराच्या अस्तरात रक्ताचा पुरवठा विपुल होत

असतो. त्यामुळे तेथून या रोगजंतूंचा झपाट्याने शरीरात प्रवेश होतो.

## शरीराची या रोगाला प्रतिक्रिया

प्रथम आपण शरीराची रोगजंतुंना कशी सर्वसाधारण प्रतिक्रिया होत असते हे पाहू. गोवर, कांजण्या, गालगुंड आणि इतर आजार रोगजंतूंमुळेच उद्भवतात.

हे रोगजंतू जेव्हा शरीरात प्रवेश करतात तेव्हा या त्रासदायक बाह्यशत्रूंच्या आक्रमणावर विजय मिळविण्यासाठी शरीर दोन मार्गांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करते.

पहिल्या प्रतिक्रियेला ( Humoral Immunity ) 'ह्युमोरल इम्युनिटी' म्हणतात. या प्रक्रियेत शरीरात प्रतिकारक द्रव्ये निर्माण होतात. त्यामुळे अतिक्रमण करणाऱ्या शत्रूचा नाश होतो व परिस्थिती पूर्ववत होते. दुसऱ्या प्रतिक्रियेला (Cellular Immunity) 'सेल्यूलर इम्युनिटी' म्हणतात. थायमस ग्रंथींमुळे ज्या रक्तपेशी " T 4 - Limphosites " (टी ४ लिम्फोसाइटस्) निर्माण होतात. त्या अक्षरश: या शत्रूला गिळंकृत करतात. त्यांचा नाश करतात.

शरीराची अशी या बाबतीत दुहेरी संरक्षण योजना आहे. त्यामुळेच इतर सर्वसामान्य रोगजंतूंचा आजार लवकर बरा होतो. एकदा शरीरात प्रतिकारद्रव्ये निर्माण झाली की ते तसेच शरीरात कायमचे रहातात. पण 'एडस्च्या' रोगजंतूंचे तसे नाही. हा ( HIV ) रोगजंतू T4 Limphosites ( टी ४ लिम्फोसाइटस् ) वर चालून जातो व त्यांचा नाश करतो. तेव्हा Cellular Immunity या प्रकारच्या शक्तीची पिच्छेहाट होते. जरी शरीरात प्रतिकारद्रव्ये तयार होत असली तरी त्यांची शक्ती (HIV) संसर्गावर विजय मिळविण्यास अपुरी पडते. प्रतिकारक द्रव्यांचे रक्तांत वितरण होत असते. (HIV) रोगजंतूही अनिर्बंधपणे रक्तांत रहातात.

जसजसे दिवस जातात तसे अधिकाधिक $T_4$ रक्तपेशींचा नाश होत रूग्णाची प्रतिकार क्षमता रेंगाळते. एकंदर शक्तीमुळे ज्या इतर रोगजंतूचा सर्वसामान्यपणे नाश होतो, त्यांनाही उर्जितावस्था प्राप्त होते. त्यांचीही पुनर्निर्मिती व्हायला लागते. असे दोन निरपराध जंतू, जे नंतर परिणामी घातक ठरतात त्यामध्ये Pnumosystic Carni ( निमोसिस्टिक कार्नी ) हा एक आहे. यामुळे गंभीर स्वरुपाचा न्यूमोनिया होतो व त्यांत रूग्णांचा मृत्यू होतो.

दुसरी अवस्था 'कापोसीज सार्कोमा' ची असते. या अकार्यक्षम त्वचेची लक्षणे १०० वर्षांपूर्वी डॉ. मॉरिटझ कापोसीने नोंद करुन ठेवली आहे. हा व्हिएन्नाचा त्वचा रोगतज्ज्ञ होता. 'एडस्' रुग्णांमध्ये झपाट्याने पसरणारा कर्करोग निर्माण होतो व त्वचेतून शरीरांतर्गत अवयवांत लगेच तो पसरतो. हा प्राणघातक कर्करोग आहे त्यामुळे अनेक रुग्ण मृत्यूमुखी पडलेले आहेत.

या सविस्तर कथनावरुन या रोगाचा प्रादुर्भाव कसा होतो हे आपल्या लक्षात आलेच असेल. काही लोकांमुळे व त्यांच्या सवयीमुळे 'एडस्' चा धोका कसा निर्माण होतो हे आपण पाहिले आहे.

## १. समलिंगी संभोगी

या रोगाने पीडित पुरुषाच्या शरीरातील सर्व द्रव्यांत 'एडस्चे' रोगजंतू असतात. मुख्यत: त्याच्या वीर्यात असतात व हे वीर्य गुदद्वारा मार्गे शरीरात गेल्याने त्याचा प्रसार लवकर होतो. शरीराच्या सर्व द्रवांत हे रोगजंतू असतात– रक्त, अश्रू, लाळ व वक्षस्थलातील दूध.

## २. रक्तवाहिन्यांमधून

या रोगाचे दूषित रक्त दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात घातले तर या रोगाची लागण दुसऱ्या व्यक्तीला होते. सर्व प्रकारच्या रक्तांमध्ये हे प्रदूषण होऊ शकते.

### ३. मादक पदार्थांचे सेवन

मादक द्रव्याच्या अवैध सेवनाने या रोगाचा प्रसार सर्वमान्य आहे. विशेषतः हे मादक पदार्थ आपल्या शीरांमधून घेतले तर दूषित सुईच्या वापरण्याने या रोगाचा प्रसार होतो.

### ४. भिन्नलिंगी संभोग

पुरुषांकडून स्त्रियांमधे या रोगाचा प्रसार अलिकडे जलद होत चालला आहे. स्त्रीही नंतर या रोगाने पछाडली जाते व नंतर त्या स्त्रीकडून पुरुषांमधे या रोगाचा प्रसार होऊ शकतो. वेश्याव्यवसायात हा धोका अधिक असतो.

### रक्त चाचण्या

रक्त चाचण्यांतून एडस्चे रोगजंतू स्पष्टपणे दिसून येतात. सुरुवातीच्या व्यवस्थेत काही आठवडे हे रोगजंतू रक्तात दिसून येत नाहीत व चाचण्या नकारात्मक असतात. या अवस्थेतील रक्तामुळे रोगप्रसार होण्याचा मोठा धोका असतो.

प्रत्येक रक्तपेढीत रक्त चाचण्या काटेकोरपणे केल्या जातात. आपण समलिंगी समागमी नाही याची रक्तदात्याने रक्तपेढीत निवेदन करण्याची विनंती केली जाते. पहिली चाचणी ' ELISA ' पद्धतीची असते. त्यामध्ये जर होकारात्मक परिणाम दिसून आला तर पुनःचाचणी घेतली जाते. या चाचणीतूनही होकारात्मक परिणाम आढळला तर दुसरी एक चाचणी घेतली जाते. तिला WESTERN BLOT (वेस्टर्न–ब्लॉट) म्हणतात. ही एक अतिशय संवेदनशील चाचणी आहे. यातूनही होकारात्मक निष्कर्ष निघाला तर रक्त खात्रीने दूषित झाले आहे असे समजायचे.

काही घटना अशा आहेत की रोगाने पीडित रुग्णाला वापरलेली सुई नकळत (अनवधानाने) तंत्रज्ञ, परिचारिका अथवा डॉक्टराकडून शरीरात टोचली जाते. तेव्हा त्यात खरं तर ' एडस् ' चा धोका निश्चित आहे. अशा वेळी त्यांच्या रक्त चाचण्या काळजीपूर्वक वेळोवेळी घेतल्या जातात. पण अशा घटना थोड्या आहेत.

### लक्षणे –

सुरुवातीला या रोगाची लक्षणे इतकी महत्त्वाची नसतात. ५–६ दिवस अंगात बारीक ताप येतो. थोडा घाम येतो. रस ग्रंथींना सूज येते. हगवण लागते. त्वचेवर बारीक पुरळ येतो. ही सारी लक्षणे दोन आठवड्यात नाहिशी होतात. रुग्ण काही आठवडे किंवा बरेच दिवस खडखडीत बरा दिसतो.

गरमीप्रमाणे एडस्चा रोगजंतू धीमेपणाने आपले कार्य करीत असतो. हळूहळू $T_4$ या संरक्षक पेशींचं बळ तो कमी करत असतो व शरीराची प्रतिकारशक्ती नष्ट करीत असतो.

लागण झालेल्या १०० रुग्णांपैकी १० ते २० रुग्णांमध्ये एडस् या रोगाची पूर्ण वाढ होते व ते दगावतात. या सर्व प्रक्रियेस ५–६ आठवडे लागतात. यातल्या ३० रुग्णांना Lymphadonopathy Syndrome होतो. त्यांची इतर लक्षणे ताप, घाम, हगवण, रसग्रंथींना सूज, यकृतास व स्प्लीनला सूज ही असतातच, पण यांतून रुग्ण बरे होतात. बाकीचे ४०–५० रुग्ण बरे होत असताना दिसतात.

ज्या रुग्णांचा मृत्यू होतो त्यांचा मृत्यू प्रासंगिक संसर्गामुळे होतो. कमकुवत प्रतिकार शक्तीमुळे दुसऱ्या जंतूबाधाना जोर चढतो. हा जोर इतका वाढतो की त्यामुळे रुग्ण दगावतो. आता असे निदर्शनास आले आहे की, HIV रोगजंतूंचा मज्जातंतूनांही संसर्ग होतो. मध्य मज्जाव्यवस्थेत त्यांची वाढ झपाट्याने होते व रुग्ण दगावतो. त्याला Senile Dementia नावाचा मेंदूचा आजार होतो. अशा रीतीने मानसिक गुंतागुंत निर्माण झाली तर त्यामुळे सार्वजनिक आरोग्यात मोठी समस्या निर्माण होईल, असे सरकारी आरोग्य खात्यातील कर्मचाऱ्यांना वाटते.

### प्रतिबंधक उपाय

या रोगाच्या ज्ञानाचा प्रचार करणे हा एक प्रमुख प्रतिबंधक उपाय आहे, असे आरोग्य खात्यातील कर्मचाऱ्यांना वाटते. समलिंगी व भिन्नलिंगी

समागम्यांना या रोगाचं खरं स्वरूप स्पष्ट करून सांगितलं पाहिजे. कशामुळे हा रोग उद्‌भवतो व तो कसा पसरतो याचं ज्ञान त्यांना असणं आवश्यक आहे. लैंगिक जीवन सुरक्षित व्हावं यासाठी हे करायचे आहे. अनेकांशी लैंगिक संबंध आल्याने या रोगाचा धोका वाढतो. त्यामुळे रोगाची लागण व्हायला व त्याचा प्रसार होण्यास मदत होते. निरोधकासारखी साधने वापरल्याने धोका कमी होतो. रोगजंतुंच्या प्रसाराला आळा बसतो. म्हणूनच या साधनांच्या वापराला उत्तेजन दिले जात आहे.

इंजेक्शनच्या सूया निर्जंतुक न करता शीरेतील इंजेक्शनसाठी वापरल्याने काय धोका निर्माण होतो, याचेही स्पष्टीकरण आता केलेच आहे. काही शहरात विशेषत: ॲम्स्टरडॅममध्ये सरकार एका वापरलेल्या सुईच्या बदल्यात चार निर्जंतुक सूया देते. ( ही सवलत मादक पदार्थांचे सेवन करणाऱ्यांनाच आहे.) नव्या एडस्‌ची लागण झालेल्यांचे प्रमाण सध्या कमी आहे. याचा अर्थ मुक्त लैंगिक जीवनास हा अधिकृत परवाना आहे असे समजू नका. पण लोंढा थोपविण्याचा हा एक मार्ग आहे.

'एडस्'ची तुलना 'हिपॅटिटिस' (यकृतदाह)शी करण्यात येते. हा रोगजंतुसुद्धा समलिंगी समागम्यांत सामान्य आहे. तरीसुद्धा ' एडस् ' चा रोगजंतू हिपॅटिटिस ' ब ' च्या मानाने १/१०० संसर्गजन्य आहे. याचाच अर्थ त्याच्या प्रचाराचा धोका इतका तीव्र नाही. जरी तसं असलं तरी 'एडस्' या रोगाची लागण व्हायला फक्त ०.००००४ मिली ग्रॅम दूषित रक्ताची गरज असते. जरी हे रोगजंतू लाळेत, अश्रुबिंदूत, स्तनदुग्धात असले तरी या मार्गाने या रोगाचा प्रसार होण्याचा धोका कमी उद्‌भवतो. साध्या चुंबनात तर धोका नाही. नैसर्गिक समागमात नाही म्हटलं तरी थोडा धोका आहे.

या रोगावर अजूनही परिणामकारक उपचार उपलब्ध नाही. प्रतिबंधक लसींचे इतक्यात उत्पादन होण्याची शक्यता नाही. 'एडस्' या रोगजंतूंच्या बाह्यावरणात बदल होऊन त्याची प्रतिद्रव्यजनक रचना बदलून जाईल. प्रतिबंधक लस जरी तयार केले तरी त्यामुळे गाभ्याचे (membrane) स्वरुप बदलणे शक्य होईल का? " आधुनिक आपत्ती " " दखलपात्र संसर्ग " "सिडनीतील साथ" हे वर्तमानपत्रांतील मथळे खरे आहेत. पण ते सिडनीत आणि जगाच्या फक्त प्रमुख शहरातच.

सर्वसामान्य लैंगिक जीवन उपभोगणाऱ्याला व एकाच साथीदाराशी संबंध ठेवणाऱ्यांना (मादक पदार्थांचे सेवन न करणाऱ्या) 'एडस्' चा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाही, ही नाण्याची एक चांगली बाजू आहे.

# अंधश्रद्धा : एक यक्ष प्रश्न !

**निमा काळे**
**बारावी कला**

अंधश्रद्धा म्हणजे एखाद्या गोष्टीवर खूप प्रमाणात विश्वास ठेवणे. या विश्वासातील घडामोडी कुठल्यातरी दैवी शक्तीच्या सामर्थ्याने, आशीर्वादाने घडतात असा खूप लोकांचा समज असतो. लोकांनी स्वत:ला पडणाऱ्या सर्व गोष्टींचा, प्रश्नाचा विचार स्वत:च्या बुद्धीने केला पाहिजे. तसेच विवेकाच्या चिकित्सक बुद्धिच्या आधारे त्याची सोडवणूक केली पाहिजे. वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे अंधश्रद्धेच्या विरोधात वाटचाल चालू रहाणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपापल्या कुवतीनुसार मार्गक्रमण करणे हितावह आहे.

अंधश्रद्धेपासून विज्ञान दृष्टिकडे घेऊन जाणारी ही दिशा कोणती हे समजावून घेण्यासाठी प्रथम अंधश्रद्धेचे मानसशास्त्र समजावून घेणे आवश्यक आहे.

बुद्धी व भावना या दोन्हींच्या साह्याने माणसाचे जीवन घडते. व्यक्तिमत्वात त्याचे संतुलन असावे लागते. हे संतुलन असणारा माणूसही पूर्ण बुद्धिनिष्ठ पद्धतीने विचार करतो असे नाही. तोही छोटचा-मोठ्या अनेक समजुती स्वतःशी बाळगून असतो. त्या अवैज्ञानिकच असतात. परंतु केवळ तेवढ्यामुळे तो अंधश्रद्धाळू बनला असे होत नाही. मात्र बुद्धी व भावना याचे हे संतुलन एका मर्यादेपलिकडे बिघडले की, बुद्धी गहाण पडते. माणूस भावनेची शिकार बनतो आणि तो भावनावश होऊन जातो. उदा. रस्त्यावर खाचखळगे असतात. त्यावरून वाहने धक्के खात जातात. ज्यांची बांधणी म्हणजे मूळ सांगाडा व त्याची जुळणी या दोन्ही गोष्टी मजबूत असतात. ती वहाने दीर्घकाळ टिकतात. तसेच जीवनातील रस्त्याच्या खाचखळग्यांवरुन जातानाही ज्या व्यक्तिमत्वात वातावरणातील जडणघडणीमुळे कणखरपणा आलेला असतो ती टिकतात. पण वाहनांची बांधणी–जुळणी मजबूत असूनही आपण त्याची खूप दक्षता घेतो. धक्क्याची तीव्रता खूप कमी होते. बहुसंख्य व्यक्ती ही स्वतःला असेच काहीतरी समजून ठेवतात. म्हणजेच अंधश्रद्धा बाळगतात. जीवनमार्गावरच्या आशा, निराशा, अडचणी, अपेक्षाभंग या धक्क्यांतून त्यामुळे व्यक्तीला स्वतःचे संरक्षण करता येते.

आजच्या जीवनातले अनेक धक्के हे सामाजिक परिस्थितीतून आलेले असतात. नोकरी, जोडीदार, घर शिक्षण, औषधोपचार या सर्वच बाबतीत बहुसंख्यांच्या पदरी तीव्र निराशा येते. त्यातून सावरणे व आयुष्य जगणे तर अटळ असते. मग लोक कुणी भविष्य, मंत्रतंत्र, पुनर्जन्म, अनेक प्रकारच्या पोथ्या यांचा अंधश्रद्धेसारखा उपयोग करतात. खरे तर त्यांच्या दुःखाचे कारण समाजव्यवस्थेत असते. त्यांच्या सामाजिक दुःखाचे निराकरण करणारी व्यवस्था निर्माण होऊ शकते. पण त्यासाठीचा झगडयाचा मार्ग खडतर व लांबचा असतो. यशस्वी कधी होईल याची खात्री नसते लोकांना त्यामध्ये स्वतः मोडून पडण्याची भीती वाटते. त्याऐवजी अंधश्रद्धा मनाशी बाळगून जगणे सोईचे वाटते. अंधश्रद्ध माणसाला बदलताना म्हणूनच उपहासापेक्षा आत्मियतेची आणि क्रोधापेक्षा करुणेची गरज असते. व्यक्तीची ही अंधश्रद्धाळू वृत्ती शिक्षणाने नाहिशी होत नाही. तो व्यक्तीच्या विचार करावयाच्या पद्धतीचा व जडण घडणीचा भाग आहे. त्यामुळे सुशिक्षित मंडळीही अंधश्रद्धेचे बळी झालेले आढळतात.

समाज व्यवस्थेमुळे भोगावयास लागणारी दुःखें जसजशी कमी होतील त्या प्रमाणात अंधश्रद्धा कमी होत जाईल हे खरे. पण त्यांचे निर्मूलन होणे कठीण आहे. मानवी जीवनातले अपेक्षाभंगाचे क्षेत्र इतक्या विविध कारणांनी व्यापलेले आहेत की, त्यासाठी अंधश्रद्धेचा वापर करण्याची गरज माणसाला वाटतच राहणार. प्रत्येक व्यक्ती वास्तव समजावून घेण्याएवढी मानसिकदृष्टचा प्रगत झाली आणि व्यवहारात तसे आचरण करू लागली तरच अंधश्रद्धा मुळातून खणून काढता येईल.

अनेक अंधश्रद्धा अज्ञान, अडाणीपणा, शकून–अपशकुनांच्या कल्पनांचे खेळ यांतून आलेल्या असतात. जखम झालेल्याने भात खाल्ला तर जखमेत 'पू' होतो यासारख्या आरोग्यविषयक अनेक चुकीच्या समजुती, पोलिओग्रस्त मुलांच्यावरच्या अवैज्ञानिक अंधश्रद्ध उपचार पद्धती याबाबत लोकांना नीटपणे डोळस करता येते. अंधश्रद्धेतून होणारी वंचना थांबविता येते. पिसाळलेला कुत्रा चावल्यानंतर अज्ञानापोटी व चौदा इंजिक्शने टाळण्याच्या भीतीपोटी माणसे गोळ्या घेतात आणि मृत्यूला आमंत्रण देतात. साप चावल्यानंतर अनेकदा व्यक्ती हॉस्पिटलआधी मांत्रिकाकडे किंवा देवळात नेल्या जातात. चावलेला साप विषारी असेल तर नंतर डॉक्टरकडे त्याला आणीपर्यंत वेळ टळून गेलेली असते. या स्वरुपाच्या अंधश्रद्धा मोडून काढण्यास लोकांचा अनुकूल प्रतिसाद लागतो.

पाल चुकचुकणे, मांजर आडवे जाणे, एखादी विधवा स्त्री वाटेत आडवी येणे अशा शकून-अपशकून ठरविणाऱ्या एक ना दोन हजारो समजुती देशाच्या विविध भागात विविध प्रकारच्या आढळतात. या गोष्टी माणसांना मनाच्या विरुद्ध वाटतात आणि अंधश्रद्धेपासून दूर नेतात. बुवाबाजी, भुताखेताने झपाटणे, देव अंगात येणे हे प्रकार सध्या खूप प्रमाणात दिसून येतात. बुवांचे तथाकथीत चमत्कार हातचलाखीचे वा करामतीचे कमी जास्त प्रकार आहेत. हे लोकांना चटकन पटते. अगदी सत्य साईबाबाच्याबाबत देखील. "सोन्या चांदीच्या वस्तू हवेतून काढून भक्ताला देणारे बाबा, या गरीब देशात पुन्हा सुवर्णयुग का आणत नाहीत? कुठल्याच कस्टमला याची चौकशी करावे असे का वाटत नाही?" असे जर उद्‌गार काढले तर लोकांचा याला पूर्ण पाठिंबा असतो. परंतु कोणताच चमत्कार न करणारे अनेक बाबा, स्वामी, सिद्धपुरुष, गुरु, महाराज असतात. लोकांचा त्यावर प्रचंड विश्वास असतो. कोणत्या मानसिकतेतून या बाबांची निर्मिती होते यांची सर्वसाधारण चिकित्सा करण्यामुळे जनजागृती होते हे खरे आहे. परंतु त्यापलिकडे जाऊन या बाबांचा, देवर्षींचा मुखभंग करणे अवघड असते. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचा वैचारिक पाया सर्वसामान्यांत विस्तारित होत जाणे हेच त्यावरचे खरे उत्तर आहे.

भुताने झपाटणे म्हणजे काय या गोष्टीची जाणीव चळवळीतील कार्यकर्त्यांनी, लोकांना सतत द्यावयास हवी. अशा लोकांना योग्य मानसोपचार मिळेल, समाज याबाबत डोळस व सहानुभूतीपूर्ण बनेल, यासाठीही शक्य ते सर्व प्रयत्न करायला हवेत. भूत दाखविण्याचा दावा करणारे जे असतात, त्यांच्या जाहीर मुलाखती घेऊन, त्यांना आव्हान देऊन त्यांचा फोलपणाही जगजाहीर करावयास हवा. परंतु तरीही दुर्बल मानसिक धारणा व त्रासदायक कौटुंबिक सामाजिक परिस्थिती यातूनच हे प्रकार व्यक्तीला सोसावे लागतात, याचे भान व अवधान ठेवूनच ही आघाडी लढवावी लागते.

अंधश्रद्धेइतकाच विज्ञाननिष्ठा व अध्यात्मविषयक दृष्टिकोन हाही एक महत्त्वाचा वादविषय बनला आहे.

विज्ञानावरील निष्ठा म्हणजे विज्ञाननिष्ठा. विज्ञानाच्या उदयालाच धर्म संस्थापकांचा आणि धर्मोपदेशकांचा विरोध होता. धर्मश्रद्धा आणि विज्ञाननिष्ठा या परस्पर विरोधी प्रवृत्ती आहेत, अशी त्यांची धारणा होती. सृष्टीचे रहस्य हे धर्मग्रंथांनी स्पष्ट केले आहे. हे सर्वांनी स्वीकारावयास हवे, असा त्यांचा आग्रह होता. यापेक्षा वेगळ्या पद्धतीने सृष्टीच्या व्यवहाराची उकल करणे हे श्रद्धाहिनतेचे लक्षण होते. विज्ञानाने बुद्धितत्वाच्या सहाय्याने या रहस्याचा भेद करण्यास प्रारंभ केला. निरीक्षण, प्रयोग, प्रमाण यांवर ही पध्दती अवलंबिलेली होती. या पध्दतीत एक काटेकोर तर्कसंगती असते आणि यातून सार्वकालिक, निरपवाद सिद्धांत निघतात. प्रयोगाने सिद्ध होऊ शकेल तेच सत्य ही भूमिका विज्ञाननिष्ठ जीवनदृष्टिच्या केंद्रस्थानी असते. सत्य नुसते प्रयोग सिद्ध नव्हे तर सामुदायिक व वस्तुनिष्ठ असते, अशी धारणा असते. घटनेतील सत्य शोधणे हे करताना भावना, विचार मध्ये येऊ न देता तर्कांच्या, बुद्धिच्या आधारे सतत कार्यशील रहाणे म्हणजे विज्ञाननिष्ठा. याच दृष्टिने जीवनाकडे बघणे, जीवनाची आखणी करणे, जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी या दृष्टीचा अंगिकार करणे, याच दृष्टिने जीवनाचे भले होईल हा विश्वास बाळगणे म्हणजे विज्ञाननिष्ठा. या पद्धतीनेच सत्य सापडेल हा विश्वास ते शोधण्याची तीव्र इच्छा आणि याच मार्गाने प्रश्नावर तोडगा निघून मनुष्य अधिक सुखी होईल हा विश्वास या जीवन रहाटीचा गाभा असतो.

याउलट अध्यात्म म्हणजे नेहमीच्या वास्तवापेक्षा वेगळ्या वास्तवाचा विश्वास. आपले अस्तित्व हे मनुष्य समाज व जग यांच्याहून दूर आहे. ते माणसाची बुद्धी, इंद्रिये आणि याच्या पलिकडे आहे. हे जे तत्वचैतन्य त्यांच्याशी माझे आंतरिक, रक्ताचे नाते आहे अशी श्रद्धाशील भावना अध्यात्मवादी विचार करण्याची असते. अध्यात्मिक ओढीत परमार्थाची ओढ येते. आत्मा आहे काय, तो अविनाशी आहे काय इ. विषयक प्रश्न अध्यात्मिक माणसांना पडतात अशा स्वरुपाचे ज्ञान हे संपूर्णपणे व्यक्तीगत आहे. म्हणूनच पूर्णतः व्यक्तिनिष्ठ आहे. ही गोष्ट निरीक्षण, प्रयोग, प्रमाण, तर्क, याने

तिपादता येत नाही. म्हणून त्यांना विज्ञाननिष्ठेचे निकष कसे लावणार, असे या बाजूच्या लोकांचे म्हणणे असते. व्यक्तीगत जीवनात पावित्र्य शुचिता यासाठी धडपडणे आणि परमेश्वराची भक्ती करणे हा अध्यात्मनिष्ठेचा आणखी एक प्रकार आहे. अध्यात्मनिष्ठा व आजच्या प्रस्थापित वर्गांपैकी कोणत्यातरी एका धर्मावरील व देवावरील श्रद्धा हे समीकरण एखादा अपवाद वगळता सर्वांच्या मनात पक्के असते. ही तथाकथीत अध्यात्मनिष्ठा व्यवहारात अंधश्रद्धानाच खतपाणी घालते. अध्यात्मिक दृष्टीने मानवाचे कल्याण होईल ही श्रद्धाळू जनांची धारणा असते. पण व्यवहारात तसे दिसत नाही. उलट अध्यात्मवादाने अन्याय व विषमत्तेचे पोषण केलेले बहुसंख्य वेळा दिसते. ही सृष्टी नियमांनी बद्ध आहे असे विज्ञानवादी मानतो. परंतु सृष्टी नियमांच्याद्वारा आपल्याला इश्वराच्या अंतिम सत्तेचे स्वरुप दिसते, असे अध्यात्मवादी मानतो. एवढे मानल्यावर एखादा अपवाद वगळता गप्प बसत नाही, तर आपल्यासाठी, आपल्या अपेक्षेसाठी, समाजासाठी, त्यांच्या सुख:दुखासाठी भल्या बुऱ्यांसाठी इश्वराने स्वत:च्या सृष्टिनियमरुपी आविष्कारात बदल करावेत असे तो मानतो. अशी अपेक्षा बाळगणे हिच अंधश्रद्धा आहे. कर्मकांड, ध्यानधारणा, होमहवन, मंत्रतंत्र हे सर्व त्याचे दृष्य स्वरूप आहे. यांतूनच अध्यात्माच्या नावाखाली उघडउघड अंधश्रद्धेचा प्रचार चालू होतो. त्याच्याशी दोन हात करण्याची तयारी ठेवावीच लागते.

❀ ❀ ❀

---

# काळापैसा : अर्थव्यवस्थेचा कर्करोग

**सुचेता परब**
अकरावी वाणिज्य

पैसा, पैसा आणि पैसा. मग तो काळा असो वा पांढरा, पैशाविषयी मानवाला नेहमीच आकर्षण वाटत आले आहे. पैशांसाठी वाटेल ते मार्ग शोधून काढले जातात. मग साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की, पैशांमध्ये अशी कोणती जादू आहे की ज्याच्याभोवती सर्व मानवी जीवन गुंफले आहे.

पैसा हे देण्याघेण्याचे व्यवहार पूर्ण करण्याचे एक साधन आहे. परंतु अलीकडे पैसा हे संपत्ती संचयाचे साधन मानले जाते. अगदी सुरूवातीला वस्तूविनिमय पद्धती होती. या पद्धतीत एका वस्तुच्या मोबदल्यात दुसरी वस्तू मिळत असे. पण यामध्ये अनेक अडचणी येऊ लागल्यामुळे वस्तु, धातू, धातूंची नाणी, नोटा व अलीकडे चेक्स्, ड्राफ्ट पैसा म्हणून वापरले जातात. आजचा पैसा मानवी समाजाच्या प्रगतीबरोबर अनेक टप्प्यांमधून उत्क्रांत होत आलेला आहे. याठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की, काळा पैसा हा पैशाच्या उत्क्रांती मधील टप्पा नाही. तसेच तो रंगरुपाने काळा असत नाही किंवा आकारानेही विचित्र असत नाही. मग नेमका काळा पैसा याचा अर्थ काय?

काळा पैसा ही अशी गोष्ट आहे की जिच्याविषयी सर्वांनाच थोडी-फार माहिती असते, परिचय असतो. पण त्याविषयी उघड बोलणे टाळले जाते. काळापैसा

म्हणजे असा पैसा की जो व्यक्तीने बेकायदेशीर मार्गाने मिळविलेला असतो. बेकायदेशीर व्यवहार, लाचलुचपत ही भ्रष्टाचाराची उगमस्थाने आहेत. सरकारला फसवून, खोटे हिशेब दाखवून काळा पैसा मिळविला जातो. उदा० एक व्यक्ती एका वर्षात १०० लक्ष रुपये उत्पन्न मिळवित असेल तर त्या व्यक्तीला सरकारचा उत्पन्न कर म्हणून आज भारतात जवळजवळ त्यापैकी ५० लक्ष रुपये द्यावे लागतात. मग ती व्यक्ती आपले उत्पन्न १०० लक्ष न दाखवता त्यापेक्षा कमी दाखवते. अशा प्रकारे जे उत्पन्न दाखवले जात नाही, त्यालाच काळा पैसा म्हणतात. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाल्यामुळे व्यापारी, उद्योगपती, विक्रेते वस्तुंच्या किंमती वाढवून भरमसाट उत्पन्न मिळवतात. रॉकेल–सिमेंट यासारख्या वस्तुंच्या खरेदी-विक्री संबंधी काळापैसा निर्माण होतो. सरकारी जकात चुकवून आयात-निर्यात व्यापारांमध्ये काळापैसा निर्माण करता येतो. आज काळा पैसा इतका परिचित झाला आहे की,एखाद्या व्यक्तीला प्रामाणिकपणे जगायचे असेल त्या व्यक्तीला जीवन जगणे अवघड होईल. एखाद्यावेळेस मी लाच घेत नाही असे सांगता येईल, पण मी लाच देत नाही असे मात्र म्हणता येणार नाही. उदा०—आपण सिनेमा बघायला गेलो आणि तिकीट मिळालं नाही तर आपण काळाबाजार (तिकीटांचा) करणाऱ्या लोकांकडून तिकीट घेतो. म्हणजे एक प्रकारे आपण लाचच देत असतो. एखादी व्यक्ती प्रामाणिक असली, गुणवत्ता प्रधान असली तरी त्या व्यक्तीला नोकरी मिळेलच याची खात्री नाही. कारण वशिल्यांची अडाणी तट्टे आधीच जागा अडवून बसलेली असतात ना ! आणि ह्या काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांना आपल्या पुढच्या चार पिढ्यांसाठी आत्ताच पैसा साठवून ठेवण्याची घाई असते आणि यांचे हे सगळे बेत तडीस जाण्यासाठी इतर लोक उपाशी मरत असतात.

काळापैसा हा प्रामुख्याने राज्यकर्त्यांकडे निर्माण होतो. अलीकडे सरकारही यात सहभागी असल्याचे उघडकीस आले आहे. फेअरफॅक्स प्रकरण व बोफोर्स प्रकरण ही त्यांची जिवंत उदाहरणे आहेत. भारतात काळापैसा किती आहे याचा अंदाज घेण्यासाठी सरकारने १९८३–८४ मध्ये राजा चलैया यांच्या अध्यक्षतेखाली 'काळापैसा शोधन समिती' नेमली होती. या समितीने आपल्या अहवालात म्हटले होते की, भारतात दरवर्षी ३७००० कोटी रुपये काळापैसा कर चुकविल्यामुळे निर्माण होतो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या २१ टक्के उत्पन्न हे काळ्या पैशाचे आहे. भारतातील काळापैसा शोधून काढून त्याचा नायनाट करणे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्याचाच प्रयत्न आहे.

अलीकडे भारतातील काळापैसा लपवण्यासाठी लोकांना नवीन माल उपलब्ध झाला आहे. तो म्हणजे स्वीस बँक. स्वीस बँक हे काळ्या पैशाचे कोठार मानले जाते. जगातील कोणत्याही व्यक्तीला या बँकेत खाते उघडता येते. खात्यासाठी कोड नंबर दिले जातात. गुप्तता हे या बँकेचे खास वैशिष्ट्य आहे. खात्यासंबंधी कोणालाही माहिती पुरविली जात नाही. बोफोर्स प्रकरणी किंवा संरक्षण विषयक इतर साहित्य खरेदी करताना घेतलेली लाच या बँकेत आहे, असे सर्वत्र चर्चिले जाते. सिनेसृष्टीत आपले नाव व पैसा कमावलेला अमिताभ व त्याचा भाऊ अजिताभ यांनी घेतलेली लाच या बँकेत आहे हे सर्वांना माहित आहेच. या बँकेत बिनदिक्कतपणे काळापैसा ठेवायची सोय आहे. काळापैसेवाले व्यापारी, राज्यकर्ते यांना स्वीस बँक म्हणजे प्रत्यक्षात दिसलेला स्वर्ग वाटतो.

अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात काळा पैसा निर्माण झाल्यामुळे सरकारी धोरणे यशस्वी होत नाहीत. त्यांचे गंभीर परिणाम अर्थव्यवस्थेला भोगावे लागतात. लोकांची श्रद्धा, मूल्ये याकडे पाहण्याची दृष्टी बदलते. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न अधिक तीव्र होतो. एकंदरित देशाच्या अर्थव्यवस्थेला एक प्रकारचा कर्करोगच लागतो.

सरकारने काळापैसा नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. पण सरकार सत्तेवर येण्यासाठी काळा पैसाच जबाबदार असल्यामुळे सरकार काळा पैसा संपूर्ण नष्ट करण्यास असमर्थ ठरले आहे. सरकारने जरी एखादा कायदा निर्माण केला तरी भारतात त्या कायद्याला पळवाट ताबडतोब शोधून काढली जाते. काळ्या पैशाच्या बाबतीतही तेच आहे. काळा पैसा हा 'पांढरा

करून वापरला जातो. उदा० मालमत्ता खरेदी करणे, देणग्या देणे इ.

काळा पैसा नष्ट करायचा असेल तर प्रामाणिक लोकांनी एकत्र येऊन चर्चा केली पाहिजे. त्याचे गांभीर्य लोकांना पटवून दिले पाहिजे. प्रसंगी क्रांतीचा मार्ग अवलंबिला पाहिजे. पण भारतातील आजच्या परिस्थितीकडे पाहिले असता क्रांती होईल असे वाटत नाही. यासाठी लोकांची नीतीमत्ता सुधारली पाहिजे. लोकांचे मन परिवर्तन झाले पाहिजे. थोडक्यात, बाह्य बंधनांनी लोकांची काळ्या पैशांपासून सुटका होणार नाही. पण आजच्या पैशांवर चालणाऱ्या या दुनियेत काळ्या पैशांपासून सुटका करण्यासाठी सगळेच लोक प्रयत्न करतील असे वाटत नाही. यामुळे असे म्हणावे लागेल की एकवेळ मानवाला झालेला कर्करोग बरा होईल, पण हा भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेला 'कर्करोग' बरा होईल की नाही याविषयी मनात शंका उद्‌भवते.

# लोपला पक्षितज्ज्ञ-' डॉ. सलीम अली '

**वर्षा बिडये**
अकरावी कला

**आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षितज्ज्ञ डॉ. सलीम अली यांच्या निधनाची वार्ता निसर्गसंरक्षण व वन्यजीवन संरक्षण चळवळीला धक्कादायक आहे. या लेखात या विलक्षण पक्षीमित्राची ओळख करून देण्यात आली आहे.**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षितज्ज्ञ डॉ. सलीम अली यांच्या निधनाची वार्ता निसर्गसंरक्षण व वन्यजीवन संरक्षण चळवळीला धक्कादायक आहे. त्यांच्या निधनामुळे एक थोर पक्षीशास्त्रज्ञ व वन्यजीवन संरक्षण चळवळीचा प्रणेता हरपला आहे.

" पक्षी निरीक्षण हा साहसपूर्ण कधी आनंद तर कधी निराशा पदरी पाडणारा छंद आहे " असे उद्‌गार काढणाऱ्या सलीम अलींनी वयाची नव्वदावी ओलांडून एक्क्याण्णव्या वर्षात पदार्पण केल्यानंतर सुद्धा आपला पक्षीनिरीक्षणाचा ध्यास, उत्साह व छंद जोपासला होता. दुर्मिळ पक्ष्यांचा शोध घेण्यासाठी भ्रमंती केली होती. पण आज ही भ्रमंती विराम पावली असली तरी " सलीम अली म्हणजेच पक्षी निरीक्षण व पक्षी निरीक्षण म्हणजेच सलीम अली " हे समीकरण मात्र त्यांनी नव्या पिढीसमोर ठेवले आहे.

या सुप्रसिद्ध पक्षितज्ज्ञाचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ मध्ये मुंबईतील गिरगाव–चर्नीरोड वरील, आज गजबजलेली वसाहत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खेतवाडी येथे झाला. विद्यार्थी दशेत असताना, उत्कृष्ट वागणुकीबद्दल त्यांना ' आपले प्राणी मित्र ' हे पुस्तक बक्षीस मिळाले. ते वाचल्यानंतर त्यांच्या मनात पक्षीसृष्टी व पक्षीजीवनाबद्दल आवड निर्माण झाली. सेंट झेवियर कॉलेजातून महाविद्यालयीन शिक्षण आटोपल्यानंतर ब्रह्मदेशात त्यांनी सुरुंग लावण्याचा व्यवसाय केला. दरम्यान १९१९ मध्ये तेहमीनाशी त्यांचा निकाह झाला. १९२१ मध्ये सलीम अली मुंबईला परत आले व त्यांनी पक्षीशास्त्राचा अभ्यास केला कॉलेजात जीवशास्त्र शिकविणारे फादर ब्लॅटर हे 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' चे सदस्य असल्यामुळे त्यांच्या सहकार्याने सलीम अलींचा या संस्थेत

प्रवेश झाला. त्यावेळी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटींमधील पक्ष्यांचे नमुने प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये ठेवले जात. तेथे मार्गदर्शक म्हणून सलीम अलींनी दोन तीन वर्षे काम केले. त्यानंतर अभ्यासानिमित्त युरोपच्या दौऱ्यावर असताना सलीम अलींनी ब्रिटिश म्युझियममध्ये प्रशिक्षण घेतले. तसेच भारतीय पक्ष्यांविषयी माहिती असणाऱ्या, बर्लिन विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागातील पक्षितज्ज्ञ डॉ. एर्विन स्ट्रेसमॅन यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षिशास्त्राचा अभ्यास केला. १९३० मध्ये बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीची आर्थिक स्थिती ढासळल्यामुळे सलीम अलींची नोकरी गेली. त्यांनी मुंबई जवळील किहीम भागातील या पक्षांचे निरीक्षण केले. निरीक्षणानंतर त्यांनी लिहिलेल्या प्रबंधाला जगभर प्रसिद्धी मिळाली. नोकरी गेल्यानंतही सलीम अलींनी स्वखर्चाने पक्षीनिरीक्षणासाठी भ्रमंती केली. इंदूर, भोपाळ, ग्वाल्हेर, हैद्राबाद, त्रावणकोर, कोचीन व भागलपूर संस्थानांच्यावतीने त्या त्या संस्थानातील पक्ष्यांचे निरीक्षण करून त्यांनी पुस्तके लिहिली.

स्वातंत्र्योत्तर काळात बॉम्ब नॅचरल हिस्ट्री सोसायटीशी संबंधित अनेक इंग्रज अधिकारी भारत सोडून निघून गेले. त्यामुळे या संस्थेची आस्था हलाखीची झाली होती. आर्थिक स्थिती डबघाईला आली असताना सलीम अलींनी या संस्थेच्या मुखपत्राचे संपादक म्हणून सूत्रे हाती घेतली व संस्थेला उर्जितावस्था प्राप्त करून दिली. त्यांचे प्राणपाखरू उडेपर्यंत ते या संस्थेचे अध्यक्ष होते. तसेच १५ सप्टेंबर १९८३ ला त्यावेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या उपस्थितीत संस्थेची शताब्दी करण्याचा मानही सलीम अलींना मिळाला.

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने भारतातील निसर्गसंपत्ती वाचविण्याचे अमोल कार्य केले असून वन्यप्राण्यांच्या शिकारीवर बंधने घालण्यातही यश मिळविले आहे. या कार्यात सलीम अलींचा सिंहाचा वाटा आहे. पक्षी निरीक्षणासाठी तर त्यांनी सर्व भारत पालथा घातला.

पूर्वी भारतात डोंगराळ लावा, जेरडॉनचा कोसरे, ब्लेविटचा जंगली पिंगळा, गुलाबी डोक्याचे बदक या सारख्या पक्ष्यांची नोंद विविध ठिकाणी केली गेली होती. पण हे पक्षी अचानक दुर्मिळ झाले. या पक्ष्यांच्या संशोधनासाठी सलीम अलींनी अनेक प्रयत्न केले, सलीम अलीना त्यांच्या कर्तृत्वाबद्दल अनेक पुरस्कार मिळाले. भारत सरकारने १९५८ मध्ये पद्मभूषण व १९७६ मध्ये पद्मविभूषण ही उपाधी देवून त्याचा गौरव केला. तसेच १९६७ मध्ये ब्रिटिश पक्षितज्ज्ञ मंडळातर्फे त्यांना सुवर्ण पदक मिळाले. १९६९ मध्ये वन्य प्राणी संरक्षणाबद्दल जॉन फिलीप स्मृती पुरस्कार मिळविणारे ते पहिले भारतीय असून, नेदरलँडच्या राजकुमारातर्फे गोल्डन आर्क तर १९७६ मध्ये वर्ल्ड वाईल्ड लाइफ फंडतर्फे वन्यप्राणी संरक्षण व संवर्धनाचे सर्वात मानाचे जे. पाल गेट्टी या पारितोषिकाचेही ते मानकरी ठरले. १९८१ मध्ये बांगला देशाच्या एशियाटीक सोसायटीचे सुवर्णपदक त्यांनी मिळविले. त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव व्हावा म्हणून १९८५ मध्ये राष्ट्रपतींद्वारा त्यांची राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली.

आपला पक्षी निरीक्षणाचा छंद जोपासत असताना सलीम अलींना जे अनुभव आले ते त्यांनी पुढील पिढीसाठी ग्रंथबद्ध करुन ठेवले आहेत. त्यांनी १९४१ लिहिलेले 'द बुक ऑफ इंडियन बर्डस' हे पुस्तक अतिशय गाजले असून त्याच्या ११ आवृत्त्या निघाल्या. त्यानंतर बर्डस ऑफ कच्छ, इंडियन हिल बर्डस्, बर्डस् ऑफ त्रावणकोर अँड कोचीन, बर्डस ऑफ सिक्कीम, फिल्ड गाईड टू द बर्डस ऑफ इंडिया अँड पाकिस्तान इत्यादी ग्रंथसंपदा त्यांनी लिहिली. 'पिक्टोरिअस' या पुस्तकाचे प्रकाशन बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या शताब्दी महोत्सवी प्रसंगी इंदिरा गांधी यांच्या हस्ते झाले तर १९८५ मध्ये डॉ. सलीम अली यांनी 'द फॉल ऑफ अ स्पॅरो' हे आत्मचरित्र लिहून प्रकाशित केले. यात त्यांनी आपल्या प्रदीर्घ पक्षीनिरीक्षणाचा अनुभव सांगितला आहे.

सलीम अलींच्या मते भारतात सुमारे १,२०० जातींचे पक्षी असून ते ७५ कुळांचे व २० गणांचे प्रतिनिधित्व करतात. त्यांचे निरीक्षण करण्यासाठी तरुणांनी पुढे यावे असा त्यांचा आग्रह होता. देशातील निसर्ग

मंडळाची व बर्डस् वॉचिंग क्लबची वाढती संख्या तसेच त्या माध्यमातून विद्यार्थी व तरुण जोपासत असलेला पक्षी निरीक्षणाचा छंद पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले होते.

सलीम अलींचा पक्षीनिरीक्षणाच्या संदर्भातील उत्साह, त्यांची चिकाटी व जिद्द भारतातील तरुण मनाला प्रेरणा देणारी ठरेल. त्यांचे पक्षीनिरीक्षणाचे स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

# हास्याचे उपचारातील स्थान

**मनिषा वेलणकर**

बारावी कला

हसता-हसता तुमचे आरोग्य तुम्ही संपादन कराल का? या लेखात दिलेल्या पुराव्याकडे पहा आणि तुम्हीच काय ते ठरवा.

तुम्हांला सर्दी असो वा कर्करोग. हास्य तुमच्या आजारपणात तुम्हांला सुखद व बिनखर्चाची साथ देते. तुम्हाला नवल वाटेल. पण तुमच्या डॉक्टरना यात काही नवल वाटणार नाही. वैद्यकीय क्षेत्रातल्या अधिकाधिक लोकांना हास्याच्या या औषधी गुणाची जाणीव होत आहे. खळखळून मनमुराद हसण्याचे महत्त्व पटते आहे. हास्य हा निसर्गाचा वैद्य आहे.

" हास्याचा सर्व रोग्यांवर फार खोलवर परिणाम होतो मग तो कितीही गंभीर असो " असे ' अमेरिकन जर्नल ऑफ सायको थेरपी ' न्यूयॉर्क हॉस्पिटलमध्ये काम करीत असलेले संशोधक डॉ. ए. के. शापिरो लिहितात. तुमच्यात वास करणाऱ्या डॉक्टरला क्रियाशील बनवून ' प्लॅसेबो इफेक्ट ' घडवून आणायची ही निसर्गाची पद्धत आहे. निसर्ग आपल्या पद्धतीने रोग बरा करतो. हास्यही हेच करते. हास्य आपल्या गुणकारीपणाने तुमचे आरोग्य पुनर्प्रस्थापित करण्यास मदत करते.

गेल्या अनेक वर्षांत, हसता हसता आरोग्य संपादन केलेली बरीच उदाहरणे जॅक्सनविला, फ्लोरिडाचे डॉ. रेमंड ए. मूडी यांनी पाहिलेली आहेत. ' लाफ अफ्टर लाफ ' या आपल्या पुस्तकात ते मिठाईच्या कारखान्यात काम करणाऱ्या, आपली नोकरी जाईल या भीतीने दबलेल्या व त्या सतत दबावाने डोकेदुखीला बळी पडलेल्या इसमाची कहाणी सांगितली आहे. एका भेटीत त्याने डॉ. मूडींना सांगितले की, " एका प्रसंगी मशीनसमोर काम करीत असताना मिठाई इतक्या झटपट मशीनमधून बाहेर पडली की मला आवराआवर करणे मुष्किलीचे झाले. मी अर्धा मिठाईत बुडून गेलो. हे तो सांगत असता डॉ. मूडींना हसू आवरेना. ते हसू लागले व म्हणाले, " तो प्रसंग किती गंमतीचा असेल नाही ? " हे ऐकून त्या मनोरुग्णालाही गंमत वाटली व तोही हसू लागला त्या दोघांमध्ये एका विशिष्ट प्रकारचे नाते तयार झाले आणि रुग्णाच्या जगण्यात फरक पडला.

डॉ. मूडीनी ९५ वर्षे वयाच्या माणसाची एक गोष्ट सांगितली. या माणसाने मृत्यूच्या भयाने आपले खाणे-पिणे सोडून दिले होते. मृत्यू इतका त्याला अटळ वाटत होता. त्यानंतर त्यांच्याकडे एक विदूषक आला. त्याने त्या वृद्धाचा तरुणपणातल्या विदूषकाचे

चित्र त्याच्यासमोर साकार केले. तरुणपणाच्या आठवणींनी त्याचे मन आनंदून गेले. त्याच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. नंतर तो विदूषकाच्या हावभावांना मोठ्याने हसून दाद देऊ लागला. एका यकःश्चित विदूषकाने त्याच्या मनावरील मृत्यूच्या भयाने दडपण दूर केले व त्याला काही अधिक दिवसांचे जीवन मिळवून दिले.

हास्यात मानसिक तणाव दूर करण्याची शक्ती असते, त्याबरोबरच काही शरीरशास्त्राचे फायदेही असतात. हसताना पोटाचे, छातीचे व खांद्याचे स्नायू आकुंचन पावतात व एका जागेवर धावल्याने जो व्यायाम होतो, तशा प्रकारचा व्यायाम हसण्यामुळे होतो असे स्टॉनफोर्ड युनिव्हर्सिटीचे डॉ. विल्यम फाय यांचे म्हणणे आहे.

निरनिराळ्या रुग्णालयांतून डॉक्टर्स हास्याचा उपचार म्हणून वापर करीत आहेत. अॅटलांटा जॉर्जियाचे जांडेल बॉडनेक्स यांनी नॉर्मन कझिनचे " The anotomy of an illness " हे पुस्तक वाचले. त्या पुस्तकात सूचविलेले हास्योपचार, डे कालब कॅन्सर हॉस्पिटलला अत्यंत उपयुक्त आहे असे वाटले. मिस्टर कझिनच्या प्रख्यात नव्या पुस्तकात, शरीराचा झपाट्याने ऱ्हास करणाऱ्या एका भयंकर आजाराच्या अनुभवाचा उल्लेख आहे. डॉक्टरनी या आजारातून ५०० पैकी एखादा रोगी बचावण्याची शक्यता असते असे बोलून दाखविले. कारण त्यांच्या पाठीच्या कण्याला इजा झाली होती. ते बिलकूल हलू शकत नव्हते. त्यांच्या पाठीतून सारख्या कळा येत होत्या. कझिनने हास्याकरवी व अॅस्कॉर्बिक अॅसिड करवी या आजाराशी मुकाबला करायचे ठरवले.

त्यांचे डॉक्टर विलियम होट्झेंग नवा उपचार करावयास तयार झाले. प्रथम त्यांनी रोजच्या २४ गोळ्यांचा अॅस्पिरीनचा उपचार, १२ फेनिलबुटाझोन, कोडिन, कोल्चिसिन आणि झोपेच्या गोळ्या बंद केल्या. त्याऐवजी हास्याची मोठी मात्रा आणि अॅस्कॉर्बिक अॅसिड घ्यायला सुरुवात केली. सुरुवातीला १० ग्रॅम व नंतर २५ ग्रॅमचा डोस ते घेऊ लागले. आठव्या दिवशी काहीही त्रास न होता ते अंगठा हलवू लागले.

दहा मिनिटे खळखळून हसल्यामुळे दोन तास गाढ झोप लागते. असे कझिनला कळून आले. त्यांनी विनोदी बोलपट पहाण्याचा सपाटा चालविला व खूप मोठमोठ्याने हसू लागले तेव्हा त्यांच्या बरोबरच्या उपहारगृहात ते राहू लागले व लवकरच ते आपल्या कामावर रुजू झाले. १९६४ च्या त्यांच्या आजारानंतर दहा वर्षांनी त्यांना त्यांचे एक डॉक्टर भेटले. त्या डॉक्टरचा हात त्यांनी इतक्या जोराने दाबला की, डॉक्टरांनी हात सोडण्याची काझिनना विनंती केली.

ही हास्योपचाराची बातमी ऐकून जांडेल ब्रॉडनेक्स अतिशय प्रभावित झाली, तिने हूस्टनमधील सेंट जोसेफ हॉस्पिटलमधून तीन वर्षांत बोकाळलेल्या हास्योपचाराची जितकी माहिती मिळवता आली, तितकी त्यांनी ती मिळवली. तिने डीकॅल्ब हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांना अशी एक खास खोली पुरविण्याची विनंती केली. तिने त्यासाठी जर निधी उभा केला तर ते खोली पुरवतील असे अधिकाऱ्यांनी तिला आश्वासन दिले. तिने निधी जमा करावयास सुरुवात केली. तिच्या विनंतीला मान देऊन डॉ. डब्ल्यू. डब्ल्यू. लायवली यांनी १५,००० डॉलर्स त्या निधीसाठी दिले. तिचे स्वप्न साकार झाले.

त्या खोलीला मिसेस् ब्रॉडेक्सनी 'लयव्हली रुम ' असे नाव दिले आहे. ही खोली ४७ रुग्णांना ठेवता येईल इतकी मोठी होती. त्यांनी ती आपल्या कल्पनेप्रमाणे सजविली. अर्थात् त्या खोलीची सजावट कर्क रुग्णालयाला साजेशी नव्हती. तुम्ही त्या खोलीत शिरताच पियानोवादन तुमचे स्वागत करील. अत्यंत लोकप्रिय संगीत पियानोवर वाजत असेल. कॅसेटवर " येरे घना, येरे घना " सारखे गीत वाजत असेल ते ऐकायला रुग्णांनी कॅसेटभोवती गर्दी केली असेल.

टेबलावर अनेक खेळ मांडलेले असतील. एक चोपन पड्याचा टी. व्ही. सेटही असेल. व्हिडिओवर "पिक पथर " हा चित्रपट चालला असेल. बाजूला गप्पा, विनोद, हसणे, खिदळणे चालले असेल. पिवळ्या सफेद व फिकट रंगाच्या फुलांनी वातावरण जिवंत व प्रफुल्लीत होते. रुग्ण आपल्या दुःखी मनोदशेतून बाहेर येईल यात शंकाच नाही.

विनोदी वृत्तीला वैद्यकीय उपचारात अधिकाधिक महत्त्वाचे स्थान प्राप्त होत आहे. कर्करोगाच्या संस्था व संशोधन केंद्रे विनोदाचा उपचार म्हणून किती उपयोग करता येतो याचे संशोधन करीत आहेत.

विनोदाचा आपणाला जीवनात किती फायदा झाला हे 'मेरी के कॉस्मेटिकच्या' मेरी के नी निवेदन केले. मेरी के वर एकदा बिकट प्रसंग आला. त्यांचा पती त्यांना सोडून गेला. तेव्हा दोन मुलांच्या पोषणाचा भार त्यांच्यावर पडला. त्यातच डॉक्टरांनी मेरी के ला थोड्याच दिवसांत अपंगत्व येईल असे भाकीत केले. मुलांना घेऊन आर्थिक अडचणींतून दिवस काढणे मेरीला अशक्य वाटू लागले. " आता मी काय करू ?' तिने स्वतःलाच प्रश्न विचारला " चेहरा हसरा ठेव व तुझ्या मालाची विक्री होईल असा विश्वास ठेव. " तिने निश्चय केला. आपणच विचारलेल्या प्रश्नाला आपण उत्तर दिले. तिने आपला व्यापार वाढविला. अधिक विक्रेत्या मुलांची भरती केली. त्यांना चेहरा हसरा ठेवायला शिकविले. आता मेरी के चे कामगार गुलाबी गाडींमधून फिरताहेत इतकी मेरी के ची चलती आहे.

ग्रेनविल म्हणतो, " माणूस हाच फक्त हसणारा प्राणी आहे. पण आपणाला त्याची किंमत फार उशीरा कळून आली. विशेषतः त्याचा आपल्या आरोग्यावरचा परिणाम ओळखायला बराच काळ लागला. "ॲनाहोमी ऑफ मेलांकोली " या पुस्तकात ४०० वर्षांपूर्वी रॉबर्ट बर्टन म्हणतो, " विनोदामुळे रक्त सळसळते, शरीराला तरतरीतपणा येतो आणि तो कोणतेही काम करण्यास तत्पर होतो." इमानुडलकांट म्हणतो, 'जो माणूस अगदी खळखळून हसतो आणि ज्याला मलावरोधाचा विकार आहे असा माणूस अद्याप माझ्या पहाण्यात आला नाही.

मानसिक तणाव ही या युगातील एक गंभीर समस्या मानली जाते. या परिस्थितीत 'हास्य' या नैसर्गिक उपचाराकडे दुर्लक्ष करून चालेल का? आपण खळखळून हसू या ! खूप खूप हसू या !

❀ ❀ ❀

## दोन शब्दांत दोन संस्कृती

अद्ययावतपणा – विज्ञाननिष्ठा किंवा पुरातनपणा – अपरिवर्तनीय शब्दनिष्ठा हा प्रकृतीचा गुण आहे. विशिष्ट जातीचा अथवा देशाचा तो गुणधर्म नव्हे. अपौरुषेय धर्मग्रंथांचे पूजक, पुरातनपणाचे बंदे गुलाम होतात, प्रकृती आणि काळ धर्मग्रंथांना रद्दबातल असताना केवळ त्याच ग्रंथांना मानणाऱ्यांची संस्कृती अप्रगतच राहते. यासाठीच हिंदुराष्ट्राने श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची मानसिक बेडी तोडली पाहिजे. चार शतकांपूर्वी युरोप अशाच बेडयांत होता, तेव्हा दुर्गतीस पोहोचला. पण तोच युरोप अद्ययावत, विज्ञाननिष्ठ बनताच आमच्यापुढे चार हजार वर्षे गेला. विश्वविजयी झाला.

## विनोदाचे तत्त्वज्ञान

दुःखाकडे खेळकर वृत्तीने सर्वप्रथम पाहून त्यांना हसविणारा हा विनोदाचा जनक होय. तोच विनोदाचा आद्य हेतू आहे. काव्य आणि विनोद यांच्या दृष्टिकोणात अंतर आहे. दुःखातून कवी करुण रस निर्माण करतो तर विनोदकार त्यास हास्यरसात बुडवितो विनोदाचा विरंगुळा नसता तर माणसे दुःखाच्या प्रचंड भाराने वेडी झाली असती. विनोद चिंतेचा जंतू मरतो आणि आनंदवर्धक जीवन द्रव्याचा पुरवठा करतो. मरणाचे भय कमी करण्यासाठी विविध धर्मांनी मोक्षाचा मार्ग सुचविला तर अपूर्ण जीवन गोड करून घेण्यासाठी महान तत्त्वज्ञान विनोदाने शिकविले. अपरिहार्य मरणाची थट्टा उडवून विनोद त्याचे भय कमी करतो.

## माणूस आणि मत

भाकरी वाटोळी असली तरी तिची गोडी वाटोळी असत नाही. त्याप्रमाणे मनुष्याचे मत जरी कदाचित दूषित असले तरी आतला माणूस दूषित नसतो. नदीचे वळण अगर भाकरीचा आकार ही बाह्य परिस्थितीने बनलेली असतात. त्याप्रमाणे मनुष्याच्या मनाचेही आहे. म्हणूनच मताचा विचार करताना माणूस बाजूला राखला पाहिजे.

# कविता

## माझी मशाल पेटती ठेवणार का ?



खरोखरच मी एकदा पेटून उठणार !
पेटती मशाल घेऊन बंड पुकारणार,
अन्याय, अत्याचार जाळून काढणार,
सत्याच्या शोधासाठी हवे ते कष्ट सोसणार,
पण तुम्ही एक करणार का ?
माझ्या मशालीत थोडेसे तेल ओतणार का ?
अहो, मी सर्वत्र भेदाभेदांची होळी करणार,
कुठे सापडेल ते सत्य गोळा करणार,
सुरूवात मी माझ्या पासूनच करणार,
माझ्याच मशालीने मी पण होरपळणार,
पण तुम्ही एक करणार का ?
पेटवता पेटवता मीच पेटले तर,
माझी मशाल पेटती ठेवणार का ?
एवढीच माझी विनंती आहे,
तेवढी मान्य करणार का ?

**वहिदा खान**
अकरावी कला

## जगजीवन

क्षणभंगूर, जीवनरहस्य,
विलोप पावते, बुडबुड्या तैसे,
जीवन रेषाखंड, अनंत बिंदू टिपून राहती

जातीवाद हा डोकावतो,
माणूस माणसाच्या जीवावर उठतो,
जीवनाचा आस्वाद न समजे,
जगायचे म्हणून जगतात माणसे,
समस्या उभ्या असती, उणीवा भरून काढती

विसरून जावा हेवा, मत्सर,
कुणी नाही अमर,
मोठेपण हरवून जाईल,
क्षणात किमया लुप्त होईल
घ्यावा परामर्श आनंदाचा, कुणासाठी ?

जग हे क्रांतीयुगाचे,
प्रेमी युगुलांचे,
प्रेम द्यावे, प्रेमी मनाला,
तुटून पडावे त्याच्या जीवाला,
हरपले भान, विसरलो दान, जगासाठी

कोणी कोणाचे नाही जगात
इथेच ठेऊन जाईल स्वर्गात
हाच जीवनाचा मंत्र जपावा, आपणासाठी.

**दयाळ पुरळकर**
बारावी वाणिज्य

## ये, मेघराजा ये !

ये, मेघराजा ये ! तुझं स्वागत असो ! !

हरणाच्या गतीनं,
पित्याच्या मायेनं,
सरसरत्या आवाजानं,
आम्हा फुलवाया ये,
ये, मेघराजा ये ! तुझं स्वागत असो ! !

व्याकुळला शेतकरी,
ओढ असे अंतरीची,
डोळे वर लावूनी वाट पाही,
तुझ्या आगमनाची,
ये, मेघराजा ये ! तुझं स्वागत असो ! !

धरणीमाता आसुसली,
जणू नववधूच होती ती,
श्रावणातले स्वप्न रंगवूनी,
पाही वाट रे तुझी,
ये; मेघराजा ये ! तुझं स्वागत असो ! !

होताच तुझे आगमन,
प्रफुल्लित होतील सजीव जनं,
धरणीची उडेल खरी धांदल,
नांदेल स्वर्ग सुख रे,
ये, मेघराजा ये ! तुझं स्वागत असो ! !

**भगतसिंग माने**
बारावी वाणिज्य

## श्रावणमास

श्रावणमास येताही तो धुंद आसमंत हा चहूकडे.
लपाछपीचा खेळ खेळती पाऊस आणि ऊन
सप्तरंग मग उधळतात ते अवकाशाच्या ग्रहात
मन हे आनंदित होते पाहुनी का त्या दृश्यास
धरती लेते हिरवा शालू लाजत हसते गालात
मधेच सुमने वाकुनी करिती अभिवादन त्या धरतीस
पानावरचे थेंब पाहता भास होई हा मोत्यांचा
मग हे मनाला नवल वाटते पाहुनी त्या दृश्यास
लताकुंज त्या आनंदाने नृत्य करिती परोपरी
वाटे जणू अप्सराच आल्या स्वर्गाहूनी भूतलावरी

**विमल बापट**
बारावी कला


## कुहू कुहू - - -

कुहू कुहू गा कोकिळे, कुहू कुहू गा
गांजलेल्या या मनाला,
क्षणिक विरंगुळा देऊन जा.
काय नातं तुझं नि माझं,
सांगता येणं कठीण आहे.
पण काळोखाच्या दाट खाईत,
प्रकाश सुखाचा ठेवून जा.
कुहू कुहू गा कोकिळे, कुहू कुहू गा.

दिवसामागून दिवस जातात,
हे नवीन असतं का कोणाला ?
पण सुख दुःखाच्या साथ संगीतात,
लेकर सुखाची सोडून जा.
कुहू कुहू गा कोकिळे, कुहू कुहू गा

**भगतसिंग माने**
बारावी वाणिज्य

# फूल !



वेणीत फूल घालावे
परमेश्वर चरणी फुलाला वाहावे
फुलाने पूजा दगडाची होई
परंतु या फुलाची पूजा कोण करी ?
जन्मता हसावे
राग येता रूसावे
मरण येताही हसावे
शेवटी एकलीने उरावे
मधही चाखुनी पहावा
फुलाचे हे सुगंधी तराणे !
व्हावी स्वपुजा
आस नसे जीवा
या फुलाच्या स्पर्शाने
दगडही पावन व्हावा !
सुवास देऊनी सुवासिक व्हावे
सुगंध घेऊन सुगंधी रहावे
हे या फुलाचे गाणे
शेवटी उरावे तरावे असे जिणे ! !

**चेतना सातम**
बारावी वाणिज्य

# धुंद



धुंदित गाऊनी मस्तीत राहूनी
हा मोर तालात नाचणारा रानात आला
या स्मरणात राहणाऱ्या वेलीस बहर आला
जाई-जुई कुंद सुवास घेऊनी आल्या ।।

सायंकाळ ही प्रसन्न झाली मुद्रा
दमुनी रवी हा अस्तास गेला
तो चंद्र खुलणारा क्षितीजावरून आला
कामकाज आटोपून दारात बसणाऱ्या
त्या विलासी सखीचा रावा कुठून आला ।।

सुगंधात पोर्णिमेची रात्र चांदण्याची
गालावरी, ओठात गुलाबी रंगीत साज आला
बहरूनी रानवारा मिठीत तृप्त होता.
अंगणीचा प्राजक्ता मोहरूनी आला
मनी रुतला स्पर्श ओळखीचा
अंगात यौवनाचा बहरुनी गंध आला

**चेतना सातम**
बारावी वाणिज्य

## गुन्हा ?

का येतेस स्वप्नामध्ये
माझ्या तू पुन्हा पुन्हा ?
रस्त्यामध्ये हसलो म्हणून,
तो का झाला माझा गुन्हा ?
नाजूक इवल्याशा ओठावरती
प्रीतीचे फूल फुलावे,
नयनीचे दाहक बाण
तुझेच मी का झेलावे ?
सदा खुणविते तुझे मला
ते काळे-काळे डोळे,
पण का खेळावे तूच सांग नां,
ते भावनेचे वेडे चाळे ?
पुन्हा अशा करू नकोस
डोळ्यांच्या तू खुणा मला,
रस्त्यामध्ये हसलो म्हणून
तो का झाला माझा गुन्हा ?

**राजाराम आडकर**
बारावी वाणिज्य

## शोधण्यासाठी . . .

भटकत होतो 'मी' ?
शोधण्यासाठी माझ्या,
हरवलेल्या त्या आठवणी
पण सापडली मज ती एकच वाट,
जिने दाखविली आम्हांस,
प्रीतीची पाऊलवाट.
पहिल्या प्रथम भेटलेले ते
नैराश्येचे डोंगर 'ज्यात'
भटकत होतो कितीतरी दिवस
कळत–नकळत त्यानेच दाखवलेली 'ती'
निवण्याची पुढची वाट.
गोड, अवीट, मधुर, मस्त
बहरलेल्या प्रीतीच्या वृंदावनात
ज्याने दिला होता आसरा
भावनेच्या त्या दोन हृदयास.
आसुरलेल्या पापण्यास भरलेल्या ओठास
या क्षणासाठीच तर भटकत होतो 'मी'
मिळविण्यासाठी, शोधण्यासाठी माझ्या
त्या हरवलेल्या आठवणी

**दुधवडकर व्ही. एम.**
बारावी वाणिज्य

# वाटचाल...

## १९८७–८८

## वरिष्ठ विभाग

१९८७–८८ या वर्षीही महाविद्यालयाने शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा विभागात स्पृहणीय यश संपादन केले. हे यश महाविद्यालयाच्या भावी उत्कर्षास प्रेरणादायी ठरेल यात शंकाच नाही.
महाविद्यालयात आयोजिलेले विविध उपक्रम पुढीलप्रमाणे–

**राष्ट्रीय सेवा योजना :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याची जाणीव व्हावी या हेतूने 'राष्ट्रीय सेवा योजना' या विभागाचे कार्य महत्वाचे आहे. यावर्षी एकूण २०४ विद्यार्थ्यांनी या विभागात नाव नोंदणी केली आहे. या विभागामार्फत साने गुरुजी कथामाला, अल्पबचत, वृक्ष संवर्धन, एक निरक्षर साक्षर कर, उपकुलगुरु निधी जमा करणे, श्रम शिबीर, सामाजिक–आर्थिक सर्वेक्षण, सामाजिक कार्यात सहभाग इ. उपक्रम यशस्वीपणे राबविले जात आहेत. श्री पंढरीनाथ चव्हाण या स्वयंसेवकाने ग्रामीण अन्तर्गत महाविद्यालयांतुन सर्वाधिक निधी जमा केल्याबद्दल मुंबई विद्यापीठाने त्याला प्रथम क्रमांकाचे बक्षीस दिले. पिरोज जाचक, सरिता नाईकसाटम, चारुशीला रानडे, राजेश खानविलकर, सुरेंद्र लांबोरे, दत्तात्रय प्रभू हे विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून काम करीत आहेत. प्रा. आनंद जरग, प्रा बोराटे, प्रा. बलवान यांच्या सहकार्याने प्रा. सुरेश सोनटक्के यांनी या विभागाची जबाबदारी सांभाळली.

**वाङमय मंडळ :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने वाङमय मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. फेब्रुवारीमध्ये एक निबंध स्पर्धा घेण्यात आली. निबंधाचे विषय होते–'अंधश्रद्धा निर्मूलनात विद्यार्थ्यांचे कार्य काय असावे ?' व ' रिडल्स ऑफ राम अँड कृष्ण इन हिन्दुइझम– हे परिशिष्ट वगळावे की वगळू नये. ' सदर स्पर्धेत मंगल राणे व माधुरी जोशी या अनुक्रमे प्रथम व द्वितीय आल्या. वाङमय मंडळाची जबाबदारी प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर यांनी सांभाळली.

**संतोष कुलकर्णी**
विद्यार्थी प्रतिनिधी

**रसराज मंडळ :**

विद्यार्थ्यांच्या साहित्यिक गुणांना वाव देण्यासाठी 'रसराज' हे दालन उघडले आहे. या मंडळामार्फत विद्यार्थ्यांकडून विविध विषयांवरील लेख लिहून घेऊन भित्तीपत्रकाद्वारे त्याला प्रसिद्धी दिली जाते. या मंडळाचे उद्‌घाटन देवगडचे सुप्रसिद्ध डॉ. भा. वा. आठवले यांच्या हस्ते झाले. याच कार्यक्रमास जोडून डॉ. आठवले यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या व रसराजच्या संयुक्त विद्यमाने सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे आमच्या 'रसराज' या वार्षिकांकाने महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसच्या सांस्कृतिक विभागामार्फत नागपूर येथे आयोजित केलेल्या राज्यपातळीवरील महाविद्यालयीन 'प्रियदर्शनी वार्षिकांक' स्पर्धेत उत्कृष्ट अंक म्हणून

बहुमान मिळविला. रसराज मंडळाची जबाबदारी प्रा. विनायक पाटील व प्रा. आनंद जरग यांनी सांभाळली.

**मिलिंद देशपांडे**
विद्यार्थी प्रतिनिधी

### ग्रंथालय :

महाविद्यालयाचे ग्रंथालय अत्यंत सुसज्ज असून महाविद्यालयाच्या इमारतीच्या मध्यभागी सर्व सोयींनीयुक्त ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये विविध विषयांशी संबंधित एकूण ११ हजार संदर्भग्रंथ व क्रमिक पुस्तके असून त्यांची किंमत सुमारे २ लाख रू. आहे. या शिवाय ६० नियतकालिके व १४ दैनिके घेतली जातात. सुमारे ८० टक्के विद्यार्थ्यांना पुस्तक पेढी मार्फत नाममात्र रक्कम भरून पुस्तक संचाचा पुरवठा केला जातो. तर सर्व प्रथम वर्गात उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वर्षभर वापरण्यासाठी मोफत पुस्तक संच दिले जातात. ग्रंथ, फर्निचर, नियतकालिके यासाठी महाविद्यालयाने आजपर्यंत सुमारे ३॥ लाख रु. खर्च केले आहेत. ग्रामीण भागातील हे महाविद्यालय असल्याने नाममात्र अनामत रक्कम घेऊन एम्. ए., एम्. कॉम्. करणाऱ्या विद्यार्थ्यांना आमच्या ग्रंथालयाचा लाभ घेता येतो. आतापर्यंत आमच्या ग्रंथालयाचा लाभ घेऊन सुमारे २० विद्यार्थी एम्. ए./ एम्. कॉम. झाले आहेत व यावर्षी १५ विद्यार्थी लाभ घेत आहेत.

### स्टाफ अॅकॅडमी :

महाविद्यालयातील प्राध्यापकांत वैचारिक देवाण-घेवाण व्हावी, विविध ज्वलंत विषयांवर चर्चा घडून यावी या हेतूने स्टाफ अॅकॅडमीची स्थापना करण्यात आली आहे. यावर्षी स्टाफ अॅकॅडमीचे पहिले पुष्प प्रा. सुरेश सोनटक्के यांनी गुंफले. त्यांनी 'सामाजिक शास्त्रांमध्ये संशोधनाची कार्यपद्धती' या विषयावर व्याख्यान दिले. प्रा. श्रीकृष्ण बोराटे यांनी 'मान्सून' या विषयावर द्वितीय पुष्प गुंफले.

### भूगोल मंडळ :

नव्यानेच स्थापन करण्यात आलेल्या भूगोल मंडळाच्या उद्घाटनाचा समारंभ दि. ३ ऑगस्ट रोजी पुणे विद्यापीठातील डॉ. एस्. आर. जोग यांच्या हस्ते पार पडला. 'पर्यावरणाच्या समस्या' या विषयांवर त्यांनी सविस्तर कल्पना दिली. प्रा. रवींद्र बोरसे हे या मंडळाचे प्रमुख आहेत.

### प्लॅनिंग फोरम :

'लघु उद्योगातील आजची बदलती दिशा' या विषयावरील व्याख्यानाने प्लॅनिंग फोरमचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या प्रा. डॉ. सौ. शांता पंडित यांच्या हस्ते झाले. प्रा. शिवाजीराव पाटील यांनी या मंडळाची जबाबदारी सांभाळली.

**खेमराज परब**
विद्यार्थी प्रतिनिधी

### पुस्तक संच वितरण समारंभ :

महाविद्यालयात १९८६-८७ या शैक्षणिक वर्षात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुस्तक संच वितरण समारंभ देवगडचे सरपंच श्री बाळासाहेब ढोके यांच्या हस्ते वर्षारंभीच पार पडला. या प्रसंगी श्री ढोके यांनी अकरावी ते पदवी पर्यंतच्या दहा वर्गांतून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५० प्रमाणे २५०० रु. ची बक्षिसे जाहिर केली.

### सहल :

या वर्षी महाविद्यालयाची सहल कोल्हापूर, वारणा, पन्हाळा या ठिकाणी जावून आली. प्रा. गावडे व प्रा. पोवार यांनी सहलीचे आयोजन केले. इतिहास विभागाची सहल १६ जानेवारी रोजी रायगड, कोयना पोफळी इ. ठिकाणी जावून आली. प्रा. गोलतकर यांनी सहलीचे आयोजन केले.

**खेमराज परब**
विद्यार्थी प्रतिनिधी

## विविधा :

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांत विविध कलागुणांचा विकास होण्यासाठी या मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळामार्फत डॉ. महेश सावंत यांचे कथाकथन व श्री. ना. वा. रानडे यांचे काव्य वाचन हे कार्यक्रम आयोजित केले होते. या मंडळाची जबाबदारी प्रा. गोठोस्कर यांनी सांभाळली.

**दत्तात्रय प्रभू**
**पिरोज जाचक**
विद्यार्थी प्रतिनिधी

## जिमखाना विभाग :

महाविद्यालयाच्या क्रीडापटूंनी याही वर्षी चांगली कामगिरी बजावली. रत्नागिरी येथे आयोजिलेल्या आन्तरविद्यापीठ अॅथलेटिक्स स्पर्धेत मनोहर जोईल हा उंच उडीत प्रथम व विद्यापीठात तृतीय आला. तसेच १५०० मी. धावण्याच्या स्पर्धेत खेमराज परब– प्रथम, भालाफेकमध्ये प्रदीप खवळे - प्रथम, ४०० मी. रिलेमध्ये प्रथम, तसेच विविध स्पर्धांत द्वितीय व तृतीय क्रमांकांची अनेक बक्षिसे महाविद्यालयाने मिळविली. महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेत जनरल चॅम्पीयनशीप खेमराज परब याने मिळविली तर महिला विभागातील जनरल चॅम्पीयनशीप ज्योती तानवडे हिने मिळविली. प्रा. गोलतकर यांनी जिमखाना विभाग प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली.

**जितेंद्र उपरकर**
विद्यार्थी प्रतिनिधी

## सांस्कृतिक मंडळ

सांस्कृतिक मंडळामार्फत स्नेहसंमेलनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यात नाटक, एकांकिका व विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमांचा समावेश होता.

**वैभव बिडये**
विद्यार्थी प्रतिनिधी

## निवडणूक :

महाविद्यालयाची १९८७–८८ या शैक्षणिक वर्षाची निवडणूक शांततेने पार पडली. या निवडणुकीत वर्ग प्रतिनिधीपदावर निवडून आलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे –

| | |
|---|---|
| प्रथम वर्ष कला | संतोष कुलकर्णी |
| प्रथम वर्ष वाणिज्य | जितेंद्र उपरकर |
| द्वितीय वर्ष कला | दत्तात्रय प्रभू |
| द्वितीय वर्ष वाणिज्य | खेमराज परब |
| तृतीय वर्ष कला | मिलिंद देशपांडे |
| तृतीय वर्ष वाणिज्य | वैभव बिडये |

महाविद्यालयातील वरिष्ठ विभागाचा जनरल सेक्रेटरी म्हणून दत्तात्रय प्रभू, विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून पिरोज जाचक यांची निवड झाली. वरील सर्व प्रतिनिधींनी महाविद्यालयाच्या प्रत्येक उपक्रमांत उत्साहाने भाग घेतला. निवडणूक प्रमुख म्हणून प्रा. गोलतकर व प्रा. मधुकर गावडे यांनी काम पाहिले.

## प्रसिद्धि :

महाविद्यालयात वेळोवेळी जे विविध कार्यक्रम आखण्यात आले, त्या कार्यक्रमांना साप्ता. देवदुर्ग, साप्ता. अणूरेणू व वार्ताहर यशवंत पोकळे यांनी प्रसिद्धि देवून सहकार्य केले. या विभागाची जबाबदारी प्रा. विनायक पाटील यांनी सांभाळली.

**वैभव बिडये**
विद्यार्थी प्रतिनिधी

# कनिष्ठ विभाग

महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाने यावर्षीही आपली शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक विभागाची गौरवशाली परंपरा कायम राखली. महाविद्यालयाची अलका मालशे ही १२ वी वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी ऑक्टोबर परीक्षेत मुंबई विभागात सर्वप्रथम येऊन अभिमानास्पद यश मिळविले. क्रीडा क्षेत्राची कामगिरीही चांगली आहे. महाविद्यालयाच्या सर्वांगीण होत असलेल्या प्रगतीचे दृष्य परिणाम म्हणजे महाविद्यालयात विद्यार्थी संख्या वाढलेली असून ११ वी कला शाखेच्या दोन तुकड्या पडलेल्या आहेत. संख्या व गुणवत्ता या दृष्टीने महाविद्यालयाची प्रगती लक्षणीय आहे. आयोजित केलेले उपक्रम खालीलप्रमाणे-

**वाङमय मंडळ :**
विद्यार्थ्यांना साहित्याची आवड निर्माण व्हावी म्हणून या विभागाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळामार्फत एक कथाकथन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेत अनुक्रमे दया खाडिलकर, संगीता कोयंडे, रवींद्र नेने अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने यशस्वी झाले. परीक्षक म्हणून प्रा. विनायक पाटील व प्रा. पोवार यांनी काम पाहिले.

त्याचप्रमाणे "आजच्या विद्यार्थ्याला सामाजिक जाणीव आहे का?" या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत भाग्यश्री इचलकरंजीकर प्रथम व रवींद्र नेने द्वितीय क्रमांकाने यशस्वी झाले, तर निबंध स्पर्धेत दया खाडिलकर, वर्षा जोशी, सुचीता परब व नीता काळे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने यशस्वी झाल्या.

**उमेश वाडेकर**
**विद्या नलावडे**
विद्यार्थी प्रतिनिधी

**आस्वाद :**

विद्यार्थ्यांना विविध क्षेत्राचा आस्वाद घेता यावा म्हणून या विभागाची स्थापना करण्यात आली आहे. या विभागामार्फत 'बालगंधर्वांच्या स्त्रीभूमिका' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. यात काही विद्यार्थिनींनी बालगंधर्वांच्या नायिकांची विविध रुपे सादर केली. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. महेश सावंत हे होते.

**उमेश वाडेकर,**
**विद्या नलावडे**
विद्यार्थी प्रतिनिधी

**रसराज भित्तीपत्रक :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा विद्यार्थीप्रिय असा हा उपक्रम आहे. सदर भित्तीपत्रकाचे एकूण ५ अंक यावर्षी सादर करण्यात आले असून त्यात 'बालगंधर्व विशेषांक,' 'पर्यावरण' 'शैक्षणिक कोडे विशेषांक,' 'विज्ञान विशेषांक' व 'कविता विशेषांक' असे बहुविध अंक सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद या उपक्रमाला चांगला मिळाला.
वाङमय मंडळ, आस्वाद व रसराज भित्तीपत्रक या विभागांची जबाबदारी प्रा. लता वळसंगकर यांनी सांभाळली.

**विद्या नलावडे**
विद्यार्थी प्रतिनिधी

**सांस्कृतिक मंडळ :**

या विभागामार्फत नृत्य, नाट्य, गाणी व इतर कार्यक्रम सादर करण्यात येतात. अशाच स्वरुपांचा एक मनोरंजनपर कार्यक्रम सादर करण्यात आला. प्रा. सकटे व प्रा. डी.बी. पाटील यांनी या विभागाचे काम पाहिले.

**राजेश पोकळे**
विद्यार्थी प्रतिनिधी

**राष्ट्रीय एकात्मता परिसंवाद :**
प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय एकात्मता सप्ताहानिमित्त महाविद्यालयात एक 'राष्ट्रीय एकात्मता परिसंवाद' आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रा. गोलतकर, प्रा. गोठोस्कर, प्रा. लता वळसंगकर, प्रा. प्रवीण सकटे, प्रा. पी. बी. पाटील, प्रा. माळी व प्रा. डी. बी. पाटील यांनी आपले विचार मांडले.

**निवडणूक :**

कनिष्ठ महाविद्यालयाची वार्षिक निवडणूक वर्षारंभीच जुलै महिन्यात शांततेने पार पडली. या निवडणुकीत अकरावी कला शाखेत सुरेंद्र मणचेकर, १२ वी कला शाखेत दामोदर जोशी, अकरावी वाणिज्य विभागात राजेश पोकळे व बारावी वाणिज्य शाखेत उमेश वाडेकर हे निवडून आले. कनिष्ठ महाविद्यालयाचा जनरल सेक्रेटरी म्हणून उमेश वाडेकर व विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून विद्या नलावडे यांची निवड झाली. निवडणूक प्रमुख प्रा. प्रकाश उपाध्ये व प्रा. एस. एस. पाटील यांनी काम पाहिले.

**क्रीडा विभाग**

क्रीडा विभागातील कार्य देखील यावर्षी उत्कृष्ट झाले. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक खात्यामार्फत मालवण येथे झालेल्या जिल्हा पातळीवरील हिवाळी क्रीडास्पर्धेत विठोबा गोलतकर हा लांब उडीत प्रथम, व गीता मेस्त्री हिने १०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक मिळविला. त्यांची विभागीय पातळीवर कोल्हापूर येथे निवड झाली.

सिंधुदुर्ग येथील क्रीडा स्पर्धेत गीता मेस्त्री, वर्षा बिडये, वनिता खाडिलकर, मधुबाला मुणगेकर यांनी १०० मीटर रिलेत द्वितीय क्रमांक पटकावला.
सिंधुदुर्ग महिला क्रीडा स्पर्धेत
विद्यार्थिनींनी खो–खो व कबड्डीमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. गीता मेस्त्री, वनिता खाडिलकर, वर्षा बिडये यांची राज्यस्तरीय पातळीवर बीड येथे निवड झाली.

गीता मेस्त्री व विठोबा गोलतकर यांची वार्षिक क्रीडास्पर्धेत जनरल चॅम्पीयनशीपसाठी निवड झाली. या विभागाची जबाबदारी प्रा. माळी यांनी सांभाळली

**सुरेंद्र मणचेकर**
विद्यार्थी प्रतिनिधी

---

# पारितोषिके

## १९८७-८८

### १) कै. काशीबाई शंकर तावडे (पूर्वाश्रमीच्या काशीबाई नलावडे) पारितोषिके–

अ) एफ् . वाय्. बी. कॉम. च्या परीक्षेत मुलींमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक रुपये ७०/–

कु. लोंबर मिलन गजानन

ब) एफ्. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत मुलींमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक रुपये ७०/–

कु. नाईकसाटम सरिता भगवंतराव

### २) कै. सौ. यशोदा रघुनाथ भिडे पारितोषिके–

अ) बारावी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २५/–

श्री. बर्वे श्रीकांत गोविंद

ब) एफ्. वाय्. बी. कॉमच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये २५/–

श्री. ठाकूर उमेश यशवंत

क) एस्. वाय्. बी. कॉम्. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये २५/–

श्री. सारंग अनील बापू

ड) टी. वाय. बी. कॉम. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये २५/–

कु. नेने माधुरी श्रीधर

### ३) सौ. सुधा रघुनाथ व रघुनाथ सदाशिव भिडे पारितोषिके–

अ) १२ वी कॉमर्सच्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये २०/–

श्री. गावकर अरविंद राजाराम

ब) एफ्. वाय्. बी. कॉम्. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये २०/–

कु. लोंबर मिलन गजानन

क) एस्. वाय्. बी. कॉम. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये २०/–

कु. जाचक पिरोज रामचंद्र

ड) टी. वाय्. बी. कॉम्. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये २०/–

कु. पारकर पद्मजा सदानंद.

### ४) कै. हरी वामन लिमये पारितोषिके –

अ) बारावी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४०/–

श्री. बर्वे श्रीकांत गोविंद

ब) टी. वाय्. बी कॉम्. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४०/–

कु. नेने माधुरी श्रीधर

### ५) कै. लक्ष्मण वामन लिमये पारितोषिके–

अ) बारावी आर्टसच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ३५/–

कु. दामले हेमलता वामन

ब) टी. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ३५/–

कु. बनकर कमल रामचंद्र

### ६) कै. मंगेश गणेश पिंगे (कुलकर्णी) वरेरी, पारितोषिक –

महाविद्यालयातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ७५/–

श्री. सारंग अनिल बापू

### ७) कै. श्री. सुधीर श्रीपाद झांटचे पारितोषिक –

वाणिज्य शाखेतील शेवटच्या पदवी परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ७५/–

कु. नेने माधुरी श्रीधर

### ८) डॉ. शांताराम सिताराम शिरसाट पारितोषके –

अ) बारावी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४५/–

श्री. बर्वे श्रीकांत गोविंद.

ब) एफ्. वाय्. बी. कॉम. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४५/–

श्री. ठाकूर उमेश यशवंत

## ९) कै. वामन सिताराम शिरसाट पारितोषिके –

अ) बारावी आर्टस्च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४५/–

कु. दामले हेमलता वामन

ब) एफ. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४५/–

कु. नाईकसाटम सरिता भगवंतराव

## १०) डॉ. भा. वा. आठवले पारितोषिक

एस्. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये २०/–

कु. चोपडेकर देवयानी वसंत

## ११) श्री. बाळकृष्ण पर्शराम उर्फ मामा जोशी पारितोषिके –

अ) बारावी आर्टस्च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४०/–

कु. दामले हेमलता वामन

ब) बारावी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४०/–

श्री. बर्वे श्रीकांत गोविंद

क) एफ्. वाय. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४०/–

कु. नाईकसाटम सरिता भगवंतराव

ड) एस्. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४०/–

कु. चोपडेकर देवयानी वसंत

इ) टी. वाय. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ५०/–

कु. बनकर कमल रामचंद्र

फ) एफ्. वाय्. बी. कॉम. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४०/–

श्री. ठाकूर उमेश यशवंत

ग) एस. वाय्. बी. कॉम् च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ४०/–

श्री. सारंग अनिल बापू

ह) टी. वाय्. बी. कॉम्. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रूपये ५०/–

कु. नेने माधुरी श्रीधर.

## १२) श्री. बाळकृष्ण पर्शराम उर्फ मामा जोशी पारितोषिके -

अ) १२ वी आर्टस्च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रूपये २०/–

कु. नेने संगीता माधव

ब) १२ वी कॉमर्सच्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रूपयें २०/–

श्री. गावकर अरविंद राजाराम

क) एफ्. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रूपयें २०/ –

श्री. खाडये मनोजकुमार वसंत.

ड) एस् वाय्. बी. ए. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रूपये २० / –

कु. घाडी उषा सिताराम.

इ) टी. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रूपये २०/–

कु. साटम माधुरी महादेव

फ) एफ्. वाय्. बी. कॉम्. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रूपये २०/–

कु. लोंबर मिलन गजानन.

ग) एस्. वाय्. बी. कॉम्. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रूपये २०/–

कु. जाचक पिरोज रामचंद्र

ह) टी. वाय्. बी. कॉम्. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रूपये २०/–

कु. पारकर पद्मजा सदानंद

**१३) अ) कै. जानकीबाई रामचंद्र बोडस पारितोषिक –**

टी. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रूपये ११०/

कु. बनकर कमल रामचंद्र

**ब) कै. रामचंद्र गणेश बोडस पारितोषिक**

टी. वाय्. बी. कॉम. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ११०/-

कु. नेने माधुरी श्रीधर

**१४) कै. सौ. लक्ष्मीबाई मुरलीधरराव सोनटक्के पारितोषिक –**

टी. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत अर्थशास्त्र प्रमुख विषय घेवून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये २५/–

कु. कोरगावकर सिंधू भास्कर

**१५) श्री. विठ्ठलराव कांबळे पारितोषिक**

१२ वी परीक्षेत कला व वाणिज्य या शाखेतून मराठी या विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये २५/–

कु. दामले हेमलता वामन

**१६) कै. सौ. उषा भास्कर बोडस पारितोषिक**

१२ वी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ११०/–

श्री. बर्वे श्रीकांत गोविंद

**१७) ज्ञानेश्वर पारितोषिक**

प्राचार्य गोपाळराव मयेकर यांच्या नावाने १२ वी परीक्षेत मराठी विषयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास प्रा. धुमाळ यांचेतर्फे पारितोषिक रुपये १००/–

कु. दामले हेमलता वामन

**१८) कै. भास्कर सोतीराम कोरगावकर वकील पारितोषिक**

१२ वी च्या परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ३०/–

कु. दामले हेमलता वामन<br>श्री. राणे विजय बाळकृष्ण } विभागून

**१९) कै. साबाजी नारायण मांजरेकर व श्रीमती जानकीबाई साबाजी मांजरेकर पारितोषिके**

अ) १२ वी कॉमर्सच्या परीक्षेत अकौंटन्सी या विषयात सर्वप्रथम आल्याबद्दल पारितोषिक रुपये १५/–

श्री. बर्वे श्रीकांत गोविंद

ब) टी. वाय्. बी. कॉम्. च्या परीक्षेत अकौंटन्सी या विषयात सर्वप्रथम आल्याबद्दल पारितोषिक रुपये १५/–

कु. पारकर पद्मजा सदानंद

२०) श्री शां. कृ. पंतवालावलकर पारितोषिके –

अ) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या बारावी कॉमर्सच्या परीक्षेत इंग्रजी या विषयात महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु १००/–

श्री. राणे विजय बाळकृष्ण

ब) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या बारावी आर्टस्च्या परीक्षेत इंग्रजी या विषयात महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक रुपये १००/–

कु. दामले हेमलता वामन

क) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या १२ वी कॉमर्सच्या परीक्षेत अकौंटन्सी विषयात महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये १००/–

श्री. बर्वे श्रीकांत गोविंद

ड) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या बारावी कॉमर्सच्या परीक्षेत अकौंटन्सी विषयात महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक रुपये १००/–

कु. भिडे उज्वला हरी

इ) एप्रिल मध्ये घेण्यात आलेल्या टी. वाय्. बी. ए. च्या परीक्षेमध्ये सर्व विषयांत महाविद्यालयात मुलांमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये १००/–

श्री. चव्हाण सदानंद भगवान

फ) एप्रिल मध्ये घेण्यात आलेल्या टी. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत सर्व विषयांत महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक रुपये १००/–

कु. बनकर कमल रामचंद्र

ग) एप्रिल मध्ये घेण्यात आलेल्या टी. वाय्. बी. कॉम. च्या परीक्षेत सर्व विषयांत महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये १००/–

श्री. तारी गजानन नागू

म) एप्रिल मध्ये घेण्यात आलेल्या टी. वाय. बी. कॉम. च्या परीक्षेत सर्व विषयांत मुलीत महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक रुपये १००/–

कु. नेने माधुरी श्रीधर

भ) एप्रिलमध्ये घेण्यात आलेल्या अकरावी आर्टस्च्या परीक्षेत सर्व विषयांत प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक रुपये १००/–

कु. बर्वे संगीता रामचंद्र

न) एप्रिलमध्ये घेण्यात आलेल्या अकरावी कॉमर्सच्या परीक्षेत सर्व विषयांत प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक रुपये १००/–

कु. राणे संगीता दत्तात्रय

र) एप्रिलमध्ये घेण्यात आलेल्या एफ. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत ‘ कम्युनिकेशन स्कील ’ या विषयात महाविद्यालयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये १००/–

कु. कदम सुषमा मुकुंद

२१) कै. सौ. प्रियवंदा रामचंद्र पाटणकर पारितोषिके–

अ) प्रथम वर्ष कला या परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये १००/–

कु. कदम सुषमा मुकुंद

ब) प्रथम वर्ष कला परीक्षेत भूगोल या विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये १००/–

कु. नाईकसाटम सरिता भगवंतराव

क) प्रथम वर्ष कला या परीक्षेत अर्थशास्त्र या विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिके रुपये १००/–

कु. नाईकसाटम सरिता भगवंतराव

ड) प्रथम वर्ष कला या परीक्षेत इतिहास या विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस पारितोषिक रुपये १००/–
कु. नाईकसाटम सरिता भगवंतराव

इ) प्रथम वर्ष कला या परीक्षेत इंग्रजी (वैकल्पिक) या विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस पारितोषिक रुपये १००/–
कु. राणे एम. बी.

**२२) कै. डॉ. शंकर हरी बापट पारितोषिक**

मार्चमध्ये झालेल्या १२ वी कला या वर्गात इंग्रजी विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–
कु. दामले हेमलता वामन

**२३) कै. जयराम रामकृष्ण दातार पारितोषिक**

टी. वाय. बी. ए. च्या परीक्षेत इतिहास विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रुपये ५०/–
कु. बनकर कमल रामचंद्र

**२४) कै. चं वि. बावडेकर स्मृती पारितोषिक**

१२ वी परीक्षेत मराठी विषयात कला–वाणिज्य शाखेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास श्री श्रीपाद काळे (वाडा) व श्री मधु मंगेश कर्णिक (मुंबई) यांचेकडून संयुक्त पारितोषिक रु. १००/–
कु. दामले हेमलता वामन

**२५) कै. हरी सदाशिव लेले पारितोषिक**

१) टी. वाय. बी. ए. च्या परीक्षेत अर्थशास्त्र विषय घेऊन प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २५
कु. कोरगांवकर एस. बी.

२ टी वाय. बी. कॉम. च्या परीक्षेत अकौंटन्सी या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २५/
कु. पारकर पद्मजा सदानंद

---

# शिष्यवृत्त्या--

**१) कै. दत्तात्रय भास्कर पाटणकर शिष्यवृत्त्या–**

अ) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या बारावी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल शिष्यवृत्ती रूपये १५०/–
श्री. बर्वे श्रीकांत गोविंद

ब) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या एफ्. वाय् बी. कॉम्. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल शिष्यवृत्ती रुपये १५०/–
श्री. ठाकूर उमेश यशवंत

क) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या एस् वाय्. बी. कॉम्. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल शिष्यवृत्ती रूपये १५०
श्री. सारंग अनिल बापू

**२) श्रीमती लक्ष्मीबाई दत्तात्रय पाटणकर शिष्यवृत्ती –**

अ) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या १२ वी आर्टस्च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनीस शिष्यवृत्ती रुपये १५०/–
कु. दामले हेमलता वामन

# S. H. KELKAR & CO. LTD.

Manufacturers of
Fragrances, Flavours & Aroma Chemicals

: OFFICE :

**Devkaran Mansion, 36, Mangaldas Road,**
**BOMBAY - 400 002**

PHONES : 299609 & 319130

TELEX : 011-3450

: FACTORY :

**Lal Bahadur Shastri Marg, Mulund,**
**BOMBAY - 400 080**

PHONES : 5612241 & 5612242

TELEX : 011-71960

TELEGRAMS : " SACHEWORKS " Mulund, Bombay.